१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ NAVAKAL

• पुणे, रविवार ७ डिसेंबर, २०२५ • वर्ष-५, अंक-७९, पाने-८, किंमत : ₹ ७

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 79, Marathi - Daily - Pune, 7 December, 2025 Page- 8 Price- Rs. 7/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

'जय भीम' या शब्दाची सुरुवात कशी झाली?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# गिरीश महाजनांचा झाडे तोडायचा अट्टाहास हैदराबादहून १५ हजार रोपे आणणार

■ नाशिक

**नाशिकच्या तपोवन साधुग्राम परिसरात कुंभमेळ्यासाठी वृक्षतोड करण्याच्या विरोधात वातावरण पेटलेले असताना मंत्री गिरीश महाजन यांनी झाडे तोडणारच ही भूमिका पुन्हा स्पष्ट करीत इतरत्र पर्यायी झाडे लावण्यासाठी १७ हजार रोपे हैदराबाद येथून खरेदी करणार असल्याचे सोशल मीडियावर पोस्ट केले. यामुळे संताप अधिकच वाढला असून, आता रात्रीही पर्यावरणप्रेमी झाडांच्या रक्षणासाठी तपोवन परिसरात गस्त घालणार आहेत. इतकेच नव्हे तर या वृक्षतोडीच्या विरोधात न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली आहे. गिरीश महाजन हे कितीही अट्टाहास करीत असले तरी विरोधकांच्या रेट्यामुळे त्यांना तपोवन येथे बांधण्यात येणाऱ्या प्रदर्शन हॉलसाठी जारी केलेली निविदा मागे घ्यावी लागली.**



**पर्यावरणप्रेमी,** नागरिक, मनसे आणि कलाविश्वासह विविध स्तरांतून वृक्षतोडीला जोरदार विरोध सुरू आहे. तरीही वृक्षतोड करून पर्यायी ठिकाणी झाडे लावायची यासाठी कुंभमेळ्याची जबाबदारी असलेले मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः हैदराबादच्या राजमुद्री येथे जाऊन १५ फुटांची तब्बल १५ हजार देशी झाडे निवडल्याची कबुली दिली. राजमुद्री येथून जी झाडे आणली जाणार आहेत त्यात पिंपळ, वड, जांभूळ, आंबा, लिंबू यांचा समावेश आहे. महाजन यांनी आपल्या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सिंहस्थ नगरी नाशिक येथे १५ हजार वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. यासाठी वड, पिंपळ, जांभूळ अशा अनेक देशी प्रजातीची १५ फूट उंच वाढ झालेली रोपे हैदराबाद येथून मागवण्यात येणार आहेत. तपोवनातील १० वर्षांच्या आतील वृक्षांची तोड न करता त्यांचे पुनर्रोपण करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. नाशिक शहरातील पेलीकन पार्क येथे आज वृक्षारोपणाच्या कार्यक्रमासाठी नियोजित जागेची मी पाहणी केली. या जागेसह शहरातील इतरही अनेक ठिकाणी लोकसहभागातून वृक्षारोपण करण्यात येणार आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळा डिजिटल व हरित कुंभमेळा असावा यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. प्रशासनाने नवी रोपे लावण्यासाठी दूरच्या जमिनीत खड्डे खणले. मात्र हे खड्डे एकमेकांच्या अगदी जवळ आहेत. शिवाय ते पाहिजे तितके खोल खणलेले नाहीत.

» पान २ वर










# पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीचा अंगार

## बाबरी मशीद बांधणार हजारो विटा आणल्या

■ कोलकाता



**पश्चिम बंगालमध्ये २०२६ साली विधानसभा निवडणुका आहेत. यामुळेच इथे राजकारण तापू लागले आहे. आज तृणमूल काँग्रेसचे बंडखोर आमदार हुमायून कबीर यांनी मुर्शिदाबादच्या बेलडांगा भागात बाबरी मशीद बांधण्याचा निर्धार करीत मशिदीची पायाभरणी केली. यासाठी हजारो मुस्लीम बांधव डोक्यावर, गाड्यांतून बांधकामासाठी विटा घेऊन आले होते. हा अंगार भडकावा यासाठी पोलीस केवळ हा कार्यक्रम पाहत राहिले. कालच कोर्टानेही बाबरी मशीद बांधायला परवानगी दिली होती. त्यामुळे अयोध्येतील बाबरी मशीद पाडण्याच्या घटनेला ३३ वर्षे झाली असतानाच पश्चिम बंगालमध्ये बाबरीच्या उभारणीचा अंगार भडकू लागला आहे.**

**मुख्यमंत्री** ममता बॅनर्जी, काँग्रेस आणि भाजपासह सर्व पक्षांचा विरोध झुगारून आज मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बेलडांगा येथे अयोध्येतील बाबरी मशिदीसारख्याच बाबरी मशिदीची पायाभरणी समारंभ यशस्वी करून दाखवला. काल कोलकाता उच्च न्यायालयाने या शिलान्यास समारंभाला स्थगिती देण्यास नकार दिला होता. त्यामुळे कबीर यांच्या मार्गातील कायदेशीर अडथळा आधीच दूर झाला होता. मात्र या बाबरी शिलान्यास कार्यक्रमामुळे राज्यात प्रचंड तणाव निर्माण झाला होता. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. हुमायून यांनी शिलान्यास केला आणि ते मुर्शिदाबादच्या मुस्लिमांचे नवे हिरो बनले आहेत. ममता बॅनर्जी यांनी हुमायून यांना तृणमूल पक्षातून निलंबित केल्यामुळे त्यांच्याबाबत संताप व्यक्त करीत ममता बॅनर्जी यांना यावेळी मतदान करणार नाही असे प्रत्येक तरुण सांगत होता.

आज अयोध्येतील बाबरी मशीद पाडल्याच्या घटनेला

» पान २ वर

### अदिना मशीद मूळचे आदिनाथ मंदिर?

बेलडांगा येथे बाबरी मशीद बांधण्यावरून वातावरण तापले असताना पश्चिम बंगालचे भाजपा उपाध्यक्ष शमिक भट्टाचार्य यांनी राज्यसभेत मागणी केली की मालदा जिल्ह्यातील अदिना मशीद हे मूळचे आदिनाथ मंदिर आहे. या मशिदीवर कमळ, गणेशमूर्ती, लक्ष्मीचे हात आदि कोरीव काम आहे. याचा अर्थ हे मुळात मंदिर होते.

# उद्योगपती खा. जिंदालांच्या मुलीचे लग्न सुप्रिया सुळे आणि कंगनाचे नृत्य

■ नवी दिल्ली



**उद्योगपती** आणि भाजपा खासदार नवीन जिंदाल यांच्या मुलीच्या लग्नसोहळ्यातील संगीत सोहळ्यासाठी एकत्र डान्स रिहर्सल करतानाचा खासदार कंगना रनौत, महुआ मोईत्रा आणि सुप्रिया सुळे यांचा फोटो व्हायरल झाला आहे. कंगना रनौतने शेअर केलेल्या या फोटोमुळे राजकीय वर्तुळात आणि नेटिझन्समध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

कंगनाने इन्स्टाग्रामवर पोस्ट करत लिहिले होते की, सहकारी खासदारांसोबत काही फिल्मी क्षण. नवीन जिंदालजींच्या मुलीच्या लग्नाच्या संगीतासाठी रिहर्सल करत आहोत.

फोटोमध्ये रनौत, मोईत्रा आणि सुळे या तिघी मोठ्या उत्साहाने संगीत

» पान २ वर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# इंडिगो विमान रद्द प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका

■ नवी दिल्ली

**इंडिगो** एअरलाईन्सची मोठ्या प्रमाणावर उड्डाणे रद्द झाल्यामुळे निर्माण झालेल्या हवाई वाहतूक संकटावर आता सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला आहे. यासंदर्भात दाखल झालेल्या जनहित याचिकेची दखल घेत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी त्वरित सुनावणीसाठी तयारी दर्शवली असून, याचिकाकर्त्यांच्या वकिलांना आपल्या निवासस्थानी बोलावले. याचिकेत प्रवाशांना झालेला त्रास हे मानवी संकट असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच इंडिगोच्या अकार्यक्षम नियोजनामुळे प्रवाशांच्या संविधानिक अनुच्छेद २१ (जगण्याचा हक्क) मधील अधिकारांचे उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

» पान २ वर

# विरोधी पक्षनेतेपद नाही तर उपमुख्यमंत्रिपद रद्द करा

## उद्धव ठाकरे यांची मागणी

■ मुंबई

**आगामी** निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुण्यात भाजपा आणि अजित पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. आज मातोश्रीवर झालेल्या सोहळ्यात अजित पवार गटाचे माजी नगरसेवक सुनील गोगले, भाजपा माथाडी पुणे शहराध्यक्ष अक्षय भोसले आणि मातंग एकता आंदोलनाच्या आरती मिसाळ यांनी उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवबंधन बांधत शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी उद्धव ठाकरे विरोधी पक्षनेते पदावरून आक्रमक



झाले. त्यांनी विरोधी पक्षनेतेपद द्यायचे नसेल तर मग उपमुख्यमंत्रिपद रद्द करा, असे म्हणत सरकारला धारेवर धरले.

उद्धव ठाकरे म्हणाले की, सरकारला एक वर्ष पूर्ण झाले, पण जाहिरातींव्यतिरिक्त काहीही काम झालेले नाही. या एका वर्षात प्रथमच आपल्या विधिमंडळाच्या इतिहासात अशी वेळ आली आहे की, दोन्ही सभागृहांना विरोधी पक्षनेते नाहीत. विरोधी पक्षनेत्याला सरकार एवढे का घाबरते? तत्काळ दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते घोषित केले पाहिजेत. सरकार

» पान २ वर

# स्वराज्य संस्था निवडणूक याचिकांची ९ डिसेंबरला एकत्रित सुनावणी होणार

■ मुंबई

**राज्यातील** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित विविध याचिकांवर भिन्न खंडपीठांनी दिलेल्या स्थगिती आदेशांची माहिती मुख्य खंडपीठाला न देण्यात आल्याने उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली असून, आता सर्व याचिकांची एकत्रित सुनावणी ९ डिसेंबरला होणार आहे.

नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर खंडपीठांनी २ डिसेंबर रोजी मतमोजणी व निकालांना दिलेल्या अंतरिम स्थगितीची माहिती राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाकडून मुख्य खंडपीठाला न दिल्याने मुख्य न्यायमूर्तींनी तीव्र नाराजी व्यक्त केली. निवडणुकांशी संबंधित याचिकांवर विविध खंडपीठांत वेगवेगळे आदेश दिले जाणे योग्य नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. दरम्यान, बारामती निवडणुकीशी संबंधित तीन याचिकाही खंडपीठासमोर आल्या. नामांकन प्रक्रियेत अडथळे आल्याने सत्र न्यायालयाने दिलेल्या आदेशांवरून निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. यापुढे निवडणुकांशी संबंधित सर्व याचिकांची सुनावणी मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठातच केली जाईल, असे न्यायालयाने सांगितले आहे. पुढील सुनावणी ९ डिसेंबर रोजी होणार आहे.

# अमित ठाकरेंच्या मेहुण्याचे लग्न राज ठाकरे-मोदी दिल्लीत एकत्र

**नवी दिल्ली -** मनसे अमित ठाकरे यांची पत्नी मिताली ठाकरे यांचे भाऊ डॉ. राहुल बोरुडे यांचा विवाहसोहळा दिल्लीतील हयात हॉटेलमध्ये थाटामाटात पार पडला. या शाही सोहळ्याला अनेक राजकीय मान्यवरांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही विशेष उपस्थिती लावली. या विवाहसोहळ्यात राज ठाकरे आणि पंतप्रधान मोदी यांची भेट झाली. दिल्लीमध्ये या दोघांची भेट होण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे सांगितले जाते.

# पुढील वर्षी महापरिनिर्वाण दिनापूर्वी इंदू मिल स्मारक पूर्ण! मुख्यमंत्र्यांची ग्वाही

■ मुंबई



**बाबासाहेबांच्या** इंदू मिल स्मारकाचे काम पुढील वर्षीच्या महापरिनिर्वाण दिनापूर्वी पूर्ण केले जाईल, असे आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादरच्या चैत्यभूमी येथे शासनाचा अभिवादन कार्यक्रम पार पडला. याठिकाणी पहाटेपासून भीम अनुयायांची मोठी गर्दी उसळली होती. बाबासाहेबांचे नातू प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत समता सैनिक दलाच्या वतीने ध्वजारोहण करण्यात आले. त्याचबरोबर राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह

» पान २ वर

# लंडनमधील भाषणाचा मूळ व्हिडिओ सादर करा

■ पुणे

## कोर्टाचे राहुल गांधींना निर्देश

**स्वातंत्र्यवीर** सावरकर यांचा अवमान केल्याप्रकरणीच्या खटल्यात लंडनमध्ये राहुल गांधी यांच्या ज्या भाषणावर आक्षेप घेण्यात आला आहे त्या भाषणाचा मूळ व्हिडिओ सादर करा, असे निर्देश पुण्यातील विशेष आमदार-खासदार न्यायालयाने राहुल गांधी यांच्या वकिलांना दिले. सावरकर यांचे पणतू सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधी यांच्याविरुद्ध ही अवमान याचिका दाखल केली आहे. ५ मार्च २०२३ रोजी राहुल गांधी यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून त्यांच्या भाषणाचा एक व्हिडिओ शेअर करण्यात आला होता. या भाषणात राहुल गांधी यांनी सावरकर यांच्याबद्दल चुकीचे आणि अवमानकारक भाष्य केले होते. सात्यकी सावरकर यांनी त्या भाषणाची सीडी न्यायालयात सादर केली होती.

# आंबेगावात बैलगाडा शर्यतींची धूम

**झाली भिर्र... च्या निनादात पहाडी आवाजाने परिसर दुमदुमत टाकत उचल की टाक करत आंबेगाव येथे दत्तजयंती निमित्त भरलेल्या बैलगाडा शर्यतीचा थरार पाहायला गाडा शौकीनांनी मोठी गर्दी केली. यावेळी होणाऱ्या तीन दिवसांच्या बैलगाडा शर्यतीमुळे छोट्या व्यावसायिकांनी समाधान व्यक्त केले.**

■ मंचर

**वर्षानुवर्षे** चालत आलेल्या बैलगाडा शर्यतींची परंपरा यावर्षी या शर्यतीचे ४८ वे वर्षे होते. परंपरेप्रमाणे सकाळी गावामधून निशाणाची मिरवणूक काढून



शर्यतीला सुरुवात केली जाते. त्यानंतर दिवसभर बैलगाडा शर्यतींचा थरार रंगला. घोडेगाव येथील निसर्गरम्य वातावरणात घाटाच्या दोन्ही बाजूला बसून पाहता येणारी बैलगाडा शर्यत, आजूबाजूला छोट्या मोठ्या व्यावसायिकांची विविध खाद्यपदार्थांची दुकाने, लहान मुले, महिला व नागरिकांची झालेली गर्दी आणि अश्यातच भिर्रर झाली... सेकंद बारा अशा पहाडी आवाजाच्या दणदणाटाने परिसर दणाणून गेला. येथील यात्रेला पंचक्रोशी जुन्नर, खेड, आंबेगाव, मावळ, तसेच पुणे येथील बैलगाडा शर्यत पाहण्यासाठी हजारो प्रेक्षकवर्गाने कानाकोपऱ्यातून हजेरी लावली होती. बैलगाडा शर्यत चालू असल्यामुळे घाटातील परिसरात वडापाव, भेळ, आईस्क्रीम, रसवंतीगृह, पाणी व खेळणी विक्रेते जोमात आहे. सकाळी चालू झालेली बैलगाडा शर्यत, त्यानंतर होणाऱ्या अंतिम दौडीसाठी तरुणांची व गाडा शौकीनांची दुपारनंतर होणारी गर्दी, नावागावासाठी चाललेला हा मर्दानी खेळ, कमी सेकंदात येणाऱ्या बैलगाड्या मान मिळवून देत आहेत.

# मालवणी आरोग्य केंद्रावरून काँग्रेस-भाजपा कार्यकर्त्यांत राडा

■ मुंबई

**मालाड** मालवणी येथील महापालिकेच्या नवीन आरोग्य प्रशिक्षण केंद्राचा आज उद्घाटन सोहळा पार पडला. त्याच्या श्रेयवादावरून काँग्रेस आणि भाजपा कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला. त्यानंतर गोंधळातच भाजपा मंत्री मंगल प्रभात लोढा आणि काँग्रेस आमदार अस्लम शेख यांच्या उपस्थितीत आरोग्य केंद्राचे उद्घाटन पार पडले.

दरम्यान, या केंद्राचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. तरीसुद्धा एवढी घाई करून हा उद्घाटन सोहळा उरकण्याचे कारण काय, असा प्रश्न उपस्थित करून काँग्रेस आमदार अस्लम शेख यांनी भाजपा मंत्री लोढा यांच्यावर निशाणा साधला. गेले काही दिवस लोढा आणि अस्लम शेख यांच्यात आरोप-प्रत्यारोप होत आहेत. त्यांच्या कार्यकर्त्यांतही खटके उडत आहेत. त्यातच मालवणीतील केंद्राचे उद्घाटन भाजपा मंत्री लोढा यांच्या हस्ते होणार असल्याने या कार्यक्रमात काय होणार, असे विचारले जात होते.

# कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर कामाशी संबंधित फोन, ईमेल नको

■ नवी दिल्ली

## लोकसभेत खासगी विधेयक

**बऱ्याच** ठिकाणी कार्यालयाची वेळ संपल्यानंतर घरी गेलेल्या कर्मचाऱ्यांना कामाशी संबंधित फोन कॉल किंवा ईमेल केले जातात. त्यामुळे कर्मचाऱ्यांना खासगी आयुष्य जगताच येत नाही. याला आळा घालण्याची कायदेशीर तरतूद असलेले एक खासगी विधेयक आज लोकसभेत सादर करण्यात आले. शरद पवार गटाच्या खा. सुप्रिया सुळे यांनी हे विधेयक लोकसभेत मांडले. राईट टू डिस्कनेक्ट बिल-२०२५ असे या विधेयकाचे नाव आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याला आपले खासगी आयुष्य जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांना राईट टू डिस्कनेक्ट फ्रॉम वर्क म्हणजेच कार्यालयीन वेळ संपल्यानंतर संबंधित कामापासून दूर होण्याचा अधिकार देण्याची तरतूद या विधेयकात आहे. हे करण्यासाठी एक कर्मचारी कल्याण प्राधिकरणाची स्थापना करावी, असे विधेयकात सुचविण्यात आले. खासगी विधेयके ही सरकारकडून नव्हे तर सदस्यांकडून मांडली जातात. ती मंजूर होण्याची शक्यता नसते. केवळ सरकारचे लक्ष संबंधित मुद्याकडे वळवण्यासाठी अशी विधेयके सादर केली जातात.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

### पाहिजेत

मुली - हाउसकीपिंग, रिसेप्शनिष्ठ, सिक्युरिटी, पॅकिंग. 103, निर्मलाधाम, प्रभातनगर, गांवदेवी मैदान, ठाणे वेस्ट **7304179292** {NC253225}

मुंबईत घरकाम, कूक, मुलांची काळजी, रुग्णसेवा, यासाठी मुली/महिला पाहिजे. मोफत राहणे-खाणेची व्यवस्था, पूर्णवेळ/अर्धवेळ, चांगला पगार. **9819339480** {NC253233}

**हिंदुस्तान सिक्युरिटी फोर्स (हिंसेफ)**
Since 1976 Govt. Licensed & Regd.
Urgent मोठ्या संख्येने भरती
मुंबई, नवी मुंबई आणि पुणे साठी संपर्क साधा।
आवश्यक कागदपत्रे - आधार कार्ड, पॅन कार्ड, शिक्षण प्रमाणपत्र
**सुरक्षा रक्षक**
**कॉम्प्युटर ऑपरेटर**
पगार- २८,२८७/- रुपये
*वय - १८ ते ३५ वर्षे*
*शिक्षण आठवी पास*
दरमहा सरकारी सुविधा - (बेसिक + डीए + भत्ता) = १९,०००/-)
८ तासांची ड्युटी - पीएफ १२% + पेन्शन, बोनस, २१ दिवसांचा रजा पगार, ईएसआयसी, ग्रॅच्युइटी, ४ राष्ट्रीय सुट्ट्या
* संपर्क साधा - Sagar Samrat, 31A- M.K. Road, Opp-Charni Road Stn OPP Platform no 4, Charni Road-E, Mumbai - 400 004, वेळ - सकाळी ८:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत
फोन - 9322096476, 9324046014, 9867792509, 9930320513, 9892943329
ईमेल - <hinsef@hotmail.com>
कायम नोकरी, *भरती नेहमीच खुली असते.

PLANTS WORLD नर्सरीसाठी माळी पाहिजेत चर्नीरोड **9920297466/ 9022094909** {NC253255}

दैनंदिन व्यवहार पाहण्यासाठी विश्वासू व्यक्ती पाहिजे. पदवीधर, बारावी, स्त्री, पुरुष, ज्येष्ठ नागरिक सुद्धा चालतील. बायोडाटा what'sapp no. **9869045180** {NC253285}

डोंबिवली पश्चिम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये सिस्टर, वॉर्डबॉय, मावशी व कॉम्प्युटर ज्ञान असणारी व मेडीक्लेम केसेस हँडल करणारी रिसेपशनीस्ट पाहिजे. मोबाईल- **9869565152/ 9869184218.** {NC253274}

**ठाणे येथील सुसंस्कृत कुटुंबास 24 तासासाठी स्वयंपाकीण बाई पाहिजे. संपर्क - 9867086273, 9987546590** {NC253192}

दहिसर ईस्ट इमिटेशन कामासाठी मुली पगार 350-450. **9920062894/ 9833006198** {NC253297}

### पाहिजेत

भायंदर (ईस्ट) कोरुगेटेड मशीनसाठी मशीन ऑपरेटर, पेस्टींग मशीन आणि पिनींग मशीन ऑपरेटर पाहिजेत. **9619573873.** {NC253302}

२ वर्षाच्या बाळाला घरी सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे ग्रँटरोड **9867755709** {NC253312}

डायरेक्ट भरती NGO मध्ये सर्वेसाठी १०० मुले मुली पाहिजे दहावी ते पदवी ट्रेनिंग मध्ये २५०००/- नंतर ५०,०००/-राहणे प्रवास फ्री नो सेल. पनवेल **8291717196** {NC253319}

प्रिंटिंग प्रेससाठी बाईंडर, प्रिंटर फिडरमॅन, बॉयलर आणि ग्राफिक डिजायनर त्वरित पाहिजेत. मालाड पश्चिम. संपर्क **8909049090** {NC253324}

हिंडलबर्ग ऑफसेट (MOV) मशीनवर फिडरमन पाहिजे आहे कोल्हापूर **9423042344, 9420493001** {NC253322}

### Situation Vacant

Wanted Lift Supervisor, Security Guards. Experience 2-5 years. Area colaba Attractive Salary with all benefits. Contact No. **9920265246/ 9769733808** {NC253284}

### व्यवसायविषयक

घरबसल्या ड्रोण पेपरडिश बनवा. महिना 30-35 हजार कमवा दोन वर्षाचे ॲग्रीमेंट - **9028160157** {NC253323}

### वृद्धाश्रम

वृद्ध / बेडरिटर्न कायमस्वरूपी राहण्याची सोय कल्याण संपर्क **8652755280 / 9323198182** {NC252438}

### वधू वर मेळावा

सर्व जाती वधू-वर-मेळावा रविवार दिनांक २१ डिसेंबर २५ दुपारी ४ ते सायं. ८.३० पर्यंत कुमबी समाजोन्नती संघ (रजि.) मुंबई वाघे हॉल सेंट झेवियर स्ट्रीट रिटेल शोरूमचे मागे परेल मुंबई नोंदणीसाठी संपर्क **9082366230, 9372089989** {NCC250096}

चर्मकार समाजाचा वधू-वर मेळावा. १४/१२/२०२५ रोजी दुपारी ३ ते सायं. ६. गावस्कर सभागृह, शारदा टॉकीज, दादर-पूर्व. **9967505653**- माने. {NC253318}

### विवाहविषयक

सरिता मॅट्रिमोनी सर्वजातीय रजिस्ट्रेशन फी एका वर्षाची ५००/- संपर्क **8104445443** {NC253322}


# गिरीश महाजन यांचा झाडे तोडायचा अट्टाहास

पान १ वरून

आज मनसेच्या चित्रपट सेनेनेही तपोवनात होणार्या वृक्षतोडीला विरोध करीत आंदोलन केले. यावेळी चित्रपट सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर म्हणाले की,जागतिक स्तरावर नाशिकची ओळख सिंहस्थ मेळा नगरी म्हणून आहे. आपल्या आध्यात्मिक अस्तित्वाची प्रचिती देणारा मेळा हा परंपरेनुसार होत आहे. मात्र त्याआडून इतर प्रदर्शनासाठी हॉल बांधण्यासाठी वृक्षांचा बळी देण्याचे क्रूर नियोजन शासकीय यंत्रणेने केले आहे. हा भ्रष्ट व मनमानी शासकीय कारभार फक्त जमीन लाटण्यासाठी आहे, धर्माच्या नावाने, जातीपातीचे राजकारण करून हे भ्रष्ट सरकार आपले हित साधत आहे. येथे बँक्वेट हॉल, प्रदर्शन केंद्र, रेस्टॉरंट बांधण्याची योजना आहे. महाजन यांच्यावर कोणाचाही विश्वास नाही. राज ठाकरे यांच्या या आवडत्या शहराला भकास करण्याचा यांचा डाव आहे. आम्ही साधू-महंतांचे स्वागत करतो. पण उरावर बसून आम्ही कुंभमेळा होऊ देणार नाही. या तपोवनातील एकही झाड आम्ही तोडू देणार नाही. असा प्रयत्न झाल्यास मनसे स्टाईलने हा डाव उधळून लावू. सरकारने झाडावर फुलल्या मारल्या आहेत. हे आई-वडिलांवर फुल्ल्या मारल्यासारखे आहे. माझी मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की पार्थ पवारांना जसे माफ केले तसे झाडांनाही माफ करावे. झाडे तोडण्याचा प्रयत्न झाला तर मनसे आंदोलन उभारेल.

तपोवनात गेल्या अनेक दिवसापांसून आंदोलन करणारे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. तल्हा शाहीन गुलाम शेख यांनी नवाकाळ ला सांगितले की, मंत्री महाजन यांनी विकास प्रकल्पाच्या निविदा रद्द न करता स्थगित केल्या आहेत. परंतु केंद्र किंवा राज्य सरकार निर्णय स्थगित करतात आणि आंदोलन शिथिल झाले की, कोणत्यातरी मार्गाने तो निर्णय पुन्हा आणतात. त्यामुळे निर्णय जोपर्यंत पूर्णपणे रद्द होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहणार आहे. या प्रकल्पाला आमचा विरोध आहे. झाडांची कत्तल होऊ नये, अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. महाजन यांनी हजार झाडे लावण्यासाठीचा जो निर्णय दिला आहे तो हास्यास्पद आहे. त्यांनी लोकशाहीची थट्टा मांडली आहे. शासनाने हजार झाडे लावण्याच्या निर्णयाला कोणाचाही आक्षेप नाही. मात्र झाडे लावली म्हणजे वृक्षतोडीची परवानगी मिळते, असे नाही. त्यांनी गंगापूर गाव, कानिटकर उद्यान परिसरात खड्डे खोदले आहेत. परंतु त्या खड्ड्यांमध्ये अत्यंत कमी अंतर आहे . एक फुटाचे झाडही तेथे लावता येणार नाही. त्याचबरोबर खड्डे खोदले आहेत तिथे उच्च विद्युत प्रवाह वाहून नेणारी विजेची तार आहे. लावलेली झाडे जगवणे ही सरकारची भूमिका नाही. आंदोलक आजपासून रात्रीपण पहारा देणार आहेत. कारण आमचा शासन -प्रशासनावर विश्वास नाही. आरे जंगलतोडीचा अनुभव सर्वानाआहे. भाजपा आणि पालिका प्रशासन सोडून सर्वांचा तपोवन वृक्षतोडीला विरोध आहे. जर शासनाने वृक्षतोडीचा हट्ट केला तर आम्ही चिपको आंदोलन करू. नाशिककर त्यासाठी तयार आहेत.

# रॅपिडो कंपनीविरोधात वसईत पहिला गुन्हा दाखल

■ वसई

**ॲप** आधारीत खासगी बाईक टॅक्सी चालविणार्‍या रॅपिडो कंपनीविरोधात विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रादेशिक परिवहन विभागाने ही कारवाई केली असून अशाप्रकारचा हा शहरातील पहिलाच गुन्हा आहे.

खासगी कंपन्यांनी शहरात बेकायदेशीर बाईक टॅक्सी सेवा सुरू केली आहे. त्याविरोधात प्रादेशिक परिवहन विभागाने सर्वत्र मोहीम सुरू केली आहे. बाईक टॅक्सी सेवेला शासनाची तसेच प्रादेशिक परिवहन विभागाची मान्यता नाही. तरी देखील खासगी कंपन्या ॲप आधारीत बाईक टॅक्सी सेवा देत आहेत. या संदर्भातील तक्रारी प्रादेशिक परिवहन विभागाकडे आल्यानंतर कारवाई सुरू करण्यात आली आहे. विरार मध्ये प्रादेशिक परिवहन विभागाने रॅपिडो कंपनीच्या एका चालकावर कारवाई केली. त्याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ तसेच मोटार वाहतूक कायद्याच्या कलम ६६, ९३, १२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई विरार शहरातील खासगी बाईक टॅक्सीविरोधातील हा पहिलाच गुन्हा आहे.

# पालिका आयुक्तांचा छापा ९ हजार किलो प्लास्टिक जप्त

**दंड केवळ ५ हजार रुपये**

■ वसई

**प्रतिबंधित** प्लास्टीकचा वाढता वापर रोखण्यासाठी वसई विरार महापालिकेचे आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी स्वत: कारवाईसाठी रस्त्यावर उतरले आहे. आयुक्तांनी नालासोपारा येथील एका गोदामावर छापा टाकून ९ हजार किलो प्रतिबंधित प्लास्टीकचा साठा जप्त केला. मात्र पहिली कारवाई असल्याने केवळ ५ हजारांचा दंड आकारण्यात आला.

बंदी असूनही शहरातील विविध ठिकाणच्या भागात प्रतिबंधित प्लास्टिकचा सर्रास वापर सुरूच आहे. प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे दैनंदिन कचर्‍यात प्लास्टिकचे प्रमाण वाढले आहे. घनकचरा विभागाकडून करण्यात येणारी कारवाई समाधानकारक नसल्याने खुद्द पालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी रस्त्यावर उतरले आहेत. नालासोपारा पूर्वेच्या आचोळे येथील एका गोदामावर आयुक्तांनी पथकासह छापा टाकला. यावेळी ९ हजार किलो प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला. मात्र पहिल्यांदा प्लास्टिक आढळल्याने ५ हजार रुपये दंडाची कारवाई करण्यात आल्याचे पालिकेने सांगितले. प्लास्टिक विरोधातील कारवाईसाठी आयुक्तांचा प्रत्यक्ष सहभाग असण्याची ही पहिलीच वेळ होती.

मागील १० महिन्यात पालिकेकडून २ हजार ४०६ दुकानांची तपासणी करण्यात आली आहे. यापैकी १३६ दुकानांवर कारवाई करून एकूण १३ हजार ९२१ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करून ४ लाख ९२ हजारांचा दंड वसूल केला असल्याची माहिती पालिकेने दिली.

# कांदिवलीत युवकावर हल्ला उबाठा पदाधिकार्‍यांवर आरोप

■ मुंबई

**कांदिवली** पूर्व रामगड परिसरात एका युवकावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करण्यात आला असून हा हल्ला ठाकरे गटाच्या पदाधिकार्‍यांनी केल्याचा आरोप आहे. युवक रक्तबंबाळ झाल्यानंतरही मारहाण सुरूच असल्याचा व्हिडीओ स्थानिकांनी मोबाइलमध्ये चित्रित केला आहे.

स्थानिकांच्या

माहितीनुसार, झोपडपट्टी भागातील साईबाबा भंडार्‍याच्या कार्यक्रमात पदाधिकार्‍यांना अपेक्षित मान-सन्मान न मिळाल्यामुळे वाद निर्माण झाला. त्यातूनच रात्री उशिरा हा हल्ला झाला. हल्ल्यानंतर पीडित कुटुंबीयांनी कुरार पोलीस ठाण्यात धाव घेतली. मात्र काही पदाधिकारी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अद्याप गुन्हा नोंदवला नसला तरी पोलिसांनी आरोपींची ओळख पटवून कारवाई सुरू असल्याची माहिती दिली. या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाल्याने अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# उद्योगपती खासदार जिंदालांच्या मुलीचे लग्न

पान १ वरून

सोहळ्याच्या तयारीत सहभागी झाल्याचे दिसते. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा या भाजपाविरोधी भूमिकेसाठी ओळखल्या जातात. २०२० मध्ये कंगना यांना मिळालेल्या वाय प्लस सुरक्षेवरून त्यांनी केंद्र सरकारला लक्ष्य केले होते. सुप्रिया सुळेही भाजपाच्या धोरणांवर वारंवार टीका करत असतात.

जिंदाल यांची मुलगी यशस्विनी जिंदाल आणि सोमानी समूहाचे संदीप यांचा मुलगा शाश्वत सोमानी या जोडप्याचा विवाह ५ डिसेंबर रोजी दिल्लीतील जिंदाल हाऊस मानसिंह रोड येथे संपन्न झाला. या लग्नसोहळ्यात ४ डिसेंबरपासून संगीत आणि नृत्याचे कार्यक्रम झाले. शाश्वतने विदेशात बिझनेस स्ट्रॅटेजी आणि मॅनेजमेंटचे शिक्षण घेतले आहे. २०२४ पासून कुटुंबाच्या व्यवसायात आहे. तर वधू यशस्विनी जिंदाल कुचीपुडी नृत्यांगना आहेत.

# विरोधी पक्षनेतेपद नाही तर उपमुख्यमंत्रिपद रद्द करा

पान १ वरून

आम्हाला कायद्यांचा दाखला देत असेल, तर मग उपमुख्यमंत्रिपदही तत्काळ रद्द केले पाहिजे. कारण त्यासाठीही संविधानात कुठेच तरतूद नाही. त्यांनी उपमुख्यमंत्री हे पद लावता कामा नये. कायद्यानुसार लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सरकारने दोन्ही सभागृहांत विरोधी पक्षनेतेपद जाहीर केले पाहिजे, अशी आमची आग्रही मागणी आहे.

ते पुढे म्हणाले की, सत्ताधारी महायुतीमधील तिन्ही घटक पक्षांमध्ये सध्या हाणामाऱ्या सुरू आहेत. भाजपाच्या दोन्ही मित्रपक्षांच्या नाव व निशाण्या वेगळ्या असल्या तरी त्यांचा मालक एकच आहे. त्यामुळे भाजपाचा नाकोंडा या दोन्ही पक्षांना गिळल्याशिवाय राहणार नाही.


शनि १३ डिसें. संध्या ६ प्रज्ञा बोधिनी हायस्कूल, गोरेगाव

स्वरमुग्धा आर्ट्स निर्मित

**तुम्हें याद करते करते..**



"शंकरजयकिशनी" गीतांवर आधारित कार्यक्रम ति. ₹१००/-

सादरकर्ते : प्रा. कृष्णकुमार गावंड | तिकिटे प्रयोगाचे वेळी उपलब्ध संपर्क - ९८१९५१८६५३


# बाबरी मशीद बांधणार! हजारो विटा आणल्या

पान १ वरून

३३ वर्षे पूर्ण झाला आहेत. या दिवशी आपण मुर्शिदाबादमध्ये अयोध्येतील बाबरी मशिदीसारखीच मशीद बांधू अशी घोषणा हुमायून कबीर यांनी केल्यापासून राज्याच्या राजकारणात धार्मिक ध्रुवीकरणाचे वारे वाहू लागले होते. कबीर यांच्या या घोषणेमुळे तृणमूल काँग्रेस वारंवार अडचणीत येत होती. तृणमूलच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कबीर यांना विरोध केला. पण कबीर आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. अखेर गुरुवार ४ डिसेंबर रोजी ममता बॅनर्जी यांच्या मुर्शिदाबादमधील सभेच्या आधी कबीर यांना पक्षातून निलंबित करण्यात आले. तरीही कबीर मागे हटले नाहीत. सर्व विरोध डावलून त्यांनी आज पायाभरणी कार्यक्रम पुढे रेटला.

हा समारंभ भव्य दिव्य व्हावा असे नियोजन हुमायून कबीर यांनी केले होते. सुमारे तीन लाख मुस्लिम बांधव या कार्यक्रमाला उपस्थित राहतील या दृष्टीने सर्व नियोजन करण्यात आले होते. राज्यातील एकमात्र उत्तर-दक्षिण मुख्य राज्यमार्ग असलेल्या एनएच-१२ राष्ट्रीय महामार्गालगत मोरादघी येथे एका शेतजमिनीवर विशाल शामियाना उभारण्यात आला होता. या शामियान्यात १५० फूट लांब आणि ८० रुंद असा विशाल मंच उभारण्यात आला होता. या मंचावर एकावेळी ४०० पाहुण्यांची आसन व्यवस्था होती. कार्यक्रमासाठी येणार्‍यांसाठी बिर्याणीची ४० हजार पाकिटे तर स्थानिकांसाठी २० हजार पाकिटे तयार ठेवण्यात आली होती. या आयोजनावर सुमारे ६० ते ७० लाख रुपये खर्च करण्यात आला. शिलान्यास करताना धार्मिक विधी करण्यासाठी सौदी अरबियामधून काझी बोलावण्यात आले होते. या काझींना मिरवणुकीतून वाजत गाजत शिलान्यासच्या ठिकाणी आणण्यात आले. राष्ट्रीय महामार्गापासून पायाभरणीच्या ठिकाणी येणाऱ्या सर्व मार्गांवर प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांसह हुमायून यांचे तीन हजार स्वयंसेवक गर्दीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करत होते.

आज सकाळपासूनच राज्यातील कानाकोपर्‍यातून मुस्लिम बांधव डोक्यावर मातीच्या विटा घेऊन मुर्शिदाबादकडे येताना दिसत होते. काही जण दुचाकीवरून गळ्यात विटा लटकवून आले होते. नारा-ए-तकबीर, अल्ला हू अकबर अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. हे सर्व लोक हुमायून कबीर यांचा जयजयकार करत ममता बॅनर्जी यांचा धिक्कार करत होते. हुमायून कबीर वाघ आहेत, ते कोणाही समोर झुकणार नाहीत. ममता बॅनर्जी यांनी त्यांना पक्षातून निलंबित करून तमाम मुस्लिमांचा अपमान केला आहे. आम्ही येणाऱ्या निवडणुकीत ममता बॅनर्जी यांना धडा शिकवू. त्यांनी कबीर यांना निलंबित करून स्वतःच्या पायावर दगड मारून घेतला, असे काही लोक माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगत होते.

या पायाभरणी कार्यक्रमावरून भाजपा आणि काँग्रेसच्या नेत्यांनी हुमायून कबीर यांच्यावर सडकून टीका केली.

बाबरी मशिद हा विषय कधीच संपला आहे. तो पुन्हा उकरून काढू पाहाणारे हुमायून कबीर मूर्ख आहेत. मशिदीच्या आड ते गलिच्छ राजकारण करत आहेत. या देशात कित्येक वर्षे भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशाच प्रकारे दोन धर्मात तेढ निर्माण करून आपला राजकीय स्वार्थ साधत आले आहेत. तोच प्रकार आता कबीर करू पाहत आहेत, अशी टीका काँग्रेस खासदार इम्रान मसूद यांनी केली. तर भाजपाचे नेते मुख्तार अब्बास नक्की म्हणाले की, बाबरचा बाप जरी आला तरी बाबरी पुन्हा होणार नाही.

## निकाल — गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 06/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-08 : 9650**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 9471 | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3744 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर) | | | | | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2908 | 3729 | 4175 | 4667 | 5240 | 5587 | 5598 | 5817 | 8280 | 9532 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0277 | 1264 | 1548 | 1678 | 5907 | 6391 | 6837 | 7768 | 7995 | 9280 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1483 | 2520 | 4679 | 5050 | 5544 | 6051 | 6161 | 7353 | 9422 | 9485 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1927 | 2409 | 3362 | 4453 | 5731 | 6654 | 7420 | 8384 | 9265 |
| | | 1932 | 2442 | 3433 | 4523 | 5769 | 6660 | 7453 | 8418 | 9287 |
| | | 1944 | 2459 | 3453 | 4557 | 5805 | 6716 | 7466 | 8446 | 9291 |
| 0014 | 1012 | 1964 | 2508 | 3466 | 4565 | 5954 | 6721 | 7484 | 8456 | 9305 |
| 0030 | 1037 | 1971 | 2572 | 3482 | 4624 | 6045 | 6736 | 7542 | 8486 | 9397 |
| 0041 | 1092 | 1974 | 2622 | 3589 | 4834 | 6051 | 6743 | 7708 | 8582 | 9413 |
| 0045 | 1202 | 1981 | 2641 | 3633 | 4873 | 6080 | 6779 | 7712 | 8632 | 9472 |
| 0055 | 1256 | 2024 | 2687 | 3687 | 4926 | 6316 | 6789 | 7738 | 8761 | 9491 |
| 0165 | 1369 | 2032 | 2822 | 3776 | 5042 | 6319 | 6942 | 7743 | 8762 | 9525 |
| 0204 | 1604 | 2054 | 2886 | 3810 | 5053 | 6361 | 6947 | 7757 | 8826 | 9558 |
| 0225 | 1614 | 2187 | 2974 | 3868 | 5056 | 6362 | 7073 | 7779 | 8827 | 9614 |
| 0231 | 1617 | 2193 | 3096 | 3873 | 5117 | 6365 | 7075 | 7878 | 8843 | 9637 |
| 0304 | 1644 | 2200 | 3113 | 3943 | 5316 | 6430 | 7079 | 7968 | 8844 | 9729 |
| 0390 | 1713 | 2236 | 3130 | 3963 | 5328 | 6462 | 7100 | 7976 | 8868 | 9739 |
| 0604 | 1724 | 2241 | 3150 | 4050 | 5435 | 6478 | 7103 | 8039 | 8870 | 9788 |
| 0618 | 1801 | 2242 | 3179 | 4141 | 5449 | 6522 | 7117 | 8044 | 8891 | 9889 |
| 0676 | 1811 | 2256 | 3203 | 4168 | 5506 | 6524 | 7235 | 8047 | 8978 | 9906 |
| 0685 | 1838 | 2265 | 3290 | 4170 | 5529 | 6551 | 7278 | 8068 | 8982 | 9944 |
| 0974 | 1861 | 2281 | 3301 | 4204 | 5564 | 6561 | 7288 | 8124 | 9031 | 9949 |
| 0994 | 1875 | 2328 | 3316 | 4209 | 5565 | 6591 | 7400 | 8181 | 9061 | 9952 |
| 1011 | 1925 | 2351 | 3359 | 4223 | 5575 | 6619 | 7413 | 8295 | 9112 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • प्रभालक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 06/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SP-03 : 3263**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2632 | 4560 | 4588 | 4904 | 5060 | 5604 | 6444 | 7365 | 9881 (हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा) | 9979 (पवार लॉटरी, ठाणे) |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1797 | 2082 | 3857 | 4171 | 4315 | 4412 | 4914 | 5574 | 9335 | 9382 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0387 | 0418 | 0587 | 1008 | 2101 | 2365 | 2927 | 4177 | 6158 | 9757 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0639 | 2529 | 3703 | 5319 | 6604 | 7347 | 8767 | 9255 |
| | 1074 | 2662 | 3783 | 5438 | 6605 | 7351 | 8822 | 9293 |
| 0049 | 1132 | 2849 | 3816 | 5452 | 6621 | 7479 | 8829 | 9338 |
| 0077 | 1142 | 2928 | 3943 | 5489 | 6638 | 7614 | 8834 | 9415 |
| 0117 | 1231 | 3139 | 4074 | 5836 | 6652 | 7641 | 8858 | 9552 |
| 0123 | 1312 | 3172 | 4446 | 5945 | 6666 | 7757 | 8977 | 9672 |
| 0268 | 1856 | 3240 | 4472 | 6146 | 6681 | 7785 | 8980 | 9753 |
| 0281 | 1921 | 3309 | 4517 | 6156 | 6995 | 7887 | 8989 | 9787 |
| 0321 | 2219 | 3337 | 4536 | 6368 | 7029 | 7917 | 9060 | 9903 |
| 0369 | 2354 | 3347 | 4918 | 6437 | 7067 | 7959 | 9079 | 9929 |
| 0420 | 2355 | 3370 | 4986 | 6443 | 7147 | 8374 | 9096 | 9944 |
| 0450 | 2458 | 3373 | 5017 | 6467 | 7159 | 8557 | 9167 | 9971 |
| 0460 | 2491 | 3612 | 5263 | 6593 | 7328 | 8605 | 9194 | 9991 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## लॉटरी

### महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शनिवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 49 • सोडत दिनांक 06/12/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **ML-03 : 1334**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | 1334 (कपिल लॉटरी - कोल्हापूर) | | | | | | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1943 (प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण) | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1236 | 2931 | 3122 | 3338 | 6668 | 7313 | 7715 | 8339 | 8686 | 9935 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2064 | 2218 | 2273 | 3504 | 4176 | 4975 | 7603 | 8230 | 8299 | 8433 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2180 | 2286 | 2458 | 2847 | 4011 | 5974 | 7000 | 8093 | 8873 | 9058 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 3224 | 3794 | 4463 | 4818 | 5366 | 5404 | 6036 | 7259 | 9167 | 9655 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1122 | 1950 | 2953 | 3530 | 4274 | 4906 | 5593 | 6375 | 7057 | 7771 | 8700 | 9389 |
| | | 1129 | 1959 | 2992 | 3532 | 4286 | 4931 | 5595 | 6454 | 7075 | 7822 | 8735 | 9409 |
| | | 1192 | 1988 | 3001 | 3534 | 4310 | 4939 | 5605 | 6466 | 7125 | 7878 | 8738 | 9412 |
| | | 1211 | 1998 | 3010 | 3602 | 4315 | 4964 | 5659 | 6468 | 7156 | 7907 | 8776 | 9443 |
| | | 1212 | 2025 | 3073 | 3605 | 4329 | 5001 | 5665 | 6502 | 7170 | 7965 | 8788 | 9445 |
| 0002 | 0446 | 1217 | 2026 | 3087 | 3638 | 4344 | 5051 | 5670 | 6506 | 7172 | 7972 | 8800 | 9459 |
| 0003 | 0498 | 1221 | 2029 | 3103 | 3668 | 4349 | 5054 | 5675 | 6524 | 7184 | 8008 | 8811 | 9492 |
| 0014 | 0508 | 1231 | 2032 | 3109 | 3683 | 4356 | 5056 | 5696 | 6571 | 7216 | 8023 | 8818 | 9513 |
| 0021 | 0540 | 1237 | 2056 | 3139 | 3702 | 4372 | 5094 | 5740 | 6583 | 7227 | 8025 | 8823 | 9514 |
| 0025 | 0547 | 1261 | 2069 | 3143 | 3736 | 4401 | 5117 | 5755 | 6601 | 7234 | 8051 | 8827 | 9533 |
| 0036 | 0584 | 1293 | 2085 | 3154 | 3758 | 4412 | 5148 | 5816 | 6613 | 7276 | 8069 | 8828 | 9572 |
| 0043 | 0588 | 1297 | 2089 | 3203 | 3763 | 4419 | 5170 | 5817 | 6616 | 7307 | 8094 | 8835 | 9592 |
| 0047 | 0600 | 1311 | 2103 | 3206 | 3779 | 4422 | 5173 | 5844 | 6630 | 7337 | 8151 | 8847 | 9600 |
| 0054 | 0674 | 1313 | 2107 | 3221 | 3781 | 4424 | 5180 | 5845 | 6644 | 7345 | 8152 | 8854 | 9613 |
| 0056 | 0687 | 1323 | 2112 | 3232 | 3799 | 4425 | 5185 | 5853 | 6648 | 7365 | 8158 | 8861 | 9639 |
| 0063 | 0696 | 1349 | 2160 | 3234 | 3817 | 4430 | 5191 | 5856 | 6652 | 7367 | 8182 | 8870 | 9647 |
| 0072 | 0698 | 1357 | 2180 | 3267 | 3824 | 4442 | 5195 | 5872 | 6714 | 7379 | 8198 | 8891 | 9664 |
| 0079 | 0706 | 1358 | 2197 | 3268 | 3855 | 4447 | 5215 | 5882 | 6722 | 7422 | 8220 | 8897 | 9688 |
| 0090 | 0720 | 1372 | 2203 | 3283 | 3867 | 4455 | 5254 | 5899 | 6746 | 7433 | 8221 | 8899 | 9689 |
| 0119 | 0733 | 1421 | 2214 | 3295 | 3871 | 4486 | 5332 | 5917 | 6753 | 7474 | 8224 | 8913 | 9699 |
| 0177 | 0735 | 1430 | 2219 | 3300 | 3886 | 4507 | 5348 | 5935 | 6756 | 7476 | 8238 | 8923 | 9739 |
| 0182 | 0737 | 1431 | 2222 | 3303 | 3920 | 4515 | 5365 | 5952 | 6768 | 7517 | 8248 | 8927 | 9779 |
| 0201 | 0801 | 1441 | 2224 | 3307 | 3941 | 4517 | 5399 | 5962 | 6772 | 7569 | 8257 | 8959 | 9796 |
| 0207 | 0803 | 1461 | 2231 | 3312 | 3954 | 4537 | 5424 | 5975 | 6810 | 7578 | 8288 | 8984 | 9811 |
| 0213 | 0859 | 1485 | 2265 | 3327 | 4004 | 4540 | 5425 | 6069 | 6847 | 7590 | 8336 | 8995 | 9837 |
| 0214 | 0905 | 1501 | 2287 | 3332 | 4027 | 4554 | 5454 | 6082 | 6855 | 7599 | 8345 | 8996 | 9842 |
| 0227 | 0906 | 1502 | 2295 | 3339 | 4040 | 4555 | 5495 | 6114 | 6865 | 7617 | 8380 | 9020 | 9866 |
| 0230 | 0917 | 1541 | 2325 | 3356 | 4079 | 4566 | 5518 | 6131 | 6867 | 7622 | 8383 | 9050 | 9875 |
| 0280 | 0932 | 1542 | 2425 | 3358 | 4084 | 4594 | 5529 | 6137 | 6886 | 7627 | 8441 | 9096 | 9879 |
| 0288 | 0941 | 1610 | 2465 | 3388 | 4122 | 4640 | 5540 | 6162 | 6917 | 7629 | 8451 | 9120 | 9891 |
| 0302 | 0949 | 1629 | 2596 | 3395 | 4169 | 4664 | 5541 | 6178 | 6921 | 7646 | 8468 | 9139 | 9899 |
| 0305 | 0962 | 1641 | 2657 | 3424 | 4183 | 4709 | 5557 | 6190 | 6929 | 7666 | 8480 | 9160 | 9909 |
| 0309 | 0983 | 1676 | 2672 | 3431 | 4214 | 4735 | 5567 | 6196 | 6958 | 7679 | 8491 | 9176 | 9917 |
| 0320 | 1000 | 1714 | 2698 | 3434 | 4217 | 4749 | 5568 | 6200 | 6962 | 7697 | 8539 | 9213 | 9923 |
| 0346 | 1005 | 1717 | 2702 | 3443 | 4234 | 4758 | 5575 | 6238 | 6969 | 7720 | 8551 | 9221 | 9929 |
| 0352 | 1062 | 1763 | 2751 | 3450 | 4237 | 4768 | 5576 | 6266 | 6973 | 7729 | 8553 | 9239 | 9978 |
| 0365 | 1104 | 1812 | 2820 | 3456 | 4242 | 4848 | 5577 | 6282 | 6992 | 7732 | 8615 | 9251 | 9979 |
| 0390 | 1110 | 1815 | 2844 | 3464 | 4243 | 4849 | 5579 | 6341 | 7007 | 7756 | 8658 | 9290 | 9985 |
| 0396 | 1120 | 1926 | 2926 | 3466 | 4244 | 4867 | 5586 | 6352 | 7040 | 7757 | 8672 | 9324 | 9986 |
| 0445 | 1121 | 1941 | 2952 | 3470 | 4253 | 4903 | 5591 | 6365 | 7047 | 7762 | 8693 | 9349 | 9992 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

- मॅनेजर, 'नवाकाळ'


# इंडिगो विमान रद्द प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका

पान १ वरून

दरम्यान, विमान कंपनीतील गोंधळामुळे मुंबई-दिल्ली आणि मुंबई-पुणे मार्गावरील इंडिगो तिकीट दर ५० हजार ते १ लाखांपर्यंत गेले होते. केंद्र सरकारच्या हस्तक्षेपानंतर तिकीट दर पुन्हा खाली आले असून, आता ते ६-७ हजारांत उपलब्ध आहेत. त्याचबरोबर इंडिगो एअरलाइनने एक्स पोस्ट करत १५ डिसेंबरपर्यंत तिकिटाचे पैसे परत मिळतील असे आश्वासन देत, प्रवाशांना होणार्या त्रासाबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 06/12/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-01 : 1115**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0338 | 0680 | 1991 | 2972 | 3473 | 5033 | 6358 (ओम गं गणपतेय नमः लॉटरी, पुणे) | 6696 (सुमित एजन्सी, मुंबई) | 8251 | 8877 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1887 | 2192 | 3283 | 3468 | 3665 | 4706 | 6020 | 6976 | 7019 | 8337 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0191 | 0277 | 2357 | 5443 | 6106 | 6123 | 7066 | 8336 | 8849 | 9111 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0591 | 1065 | 2453 | 3520 | 3604 | 3911 | 4114 | 5608 | 9091 | 9256 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1388 | 2240 | 2709 | 3455 | 4447 | 5659 | 6550 | 7379 | 7977 | 8983 |
| | | 1399 | 2244 | 2716 | 3516 | 4474 | 5691 | 6586 | 7499 | 7979 | 9006 |
| 0001 | 0676 | 1418 | 2246 | 2750 | 3566 | 4498 | 5695 | 6601 | 7512 | 7998 | 9079 |
| 0046 | 0692 | 1463 | 2257 | 2833 | 3633 | 4540 | 5705 | 6616 | 7533 | 8008 | 9099 |
| 0048 | 0704 | 1519 | 2279 | 2844 | 3634 | 4604 | 5775 | 6631 | 7577 | 8017 | 9179 |
| 0050 | 0719 | 1531 | 2299 | 2871 | 3684 | 4614 | 5831 | 6632 | 7631 | 8088 | 9214 |
| 0078 | 0723 | 1611 | 2329 | 2946 | 3708 | 4695 | 5857 | 6641 | 7707 | 8111 | 9249 |
| 0102 | 0733 | 1746 | 2402 | 2973 | 3738 | 4931 | 5905 | 6659 | 7730 | 8157 | 9376 |
| 0109 | 0801 | 1813 | 2420 | 3069 | 3848 | 4944 | 5931 | 6682 | 7740 | 8160 | 9481 |
| 0113 | 0824 | 1822 | 2510 | 3085 | 3880 | 5049 | 5985 | 6691 | 7761 | 8218 | 9642 |
| 0208 | 0862 | 1848 | 2523 | 3133 | 3982 | 5136 | 6005 | 6726 | 7779 | 8397 | 9694 |
| 0248 | 0881 | 1857 | 2527 | 3168 | 4030 | 5214 | 6030 | 6869 | 7786 | 8434 | 9727 |
| 0304 | 1048 | 1921 | 2538 | 3213 | 4094 | 5312 | 6066 | 6901 | 7795 | 8480 | 9849 |
| 0330 | 1049 | 1931 | 2572 | 3216 | 4148 | 5334 | 6156 | 6906 | 7813 | 8481 | 9863 |
| 0332 | 1078 | 2019 | 2592 | 3235 | 4189 | 5362 | 6168 | 7047 | 7826 | 8581 | 9866 |
| 0397 | 1107 | 2120 | 2625 | 3281 | 4218 | 5393 | 6193 | 7102 | 7838 | 8642 | 9873 |
| 0401 | 1124 | 2126 | 2654 | 3295 | 4236 | 5502 | 6223 | 7148 | 7858 | 8787 | 9909 |
| 0451 | 1141 | 2128 | 2660 | 3309 | 4322 | 5505 | 6296 | 7174 | 7878 | 8849 | 9915 |
| 0529 | 1185 | 2147 | 2671 | 3310 | 4374 | 5540 | 6359 | 7193 | 7901 | 8865 | 9925 |
| 0605 | 1190 | 2152 | 2681 | 3337 | 4380 | 5559 | 6377 | 7274 | 7957 | 8873 | 9967 |
| 0644 | 1253 | 2197 | 2682 | 3352 | 4405 | 5571 | 6464 | 7276 | 7967 | 8889 | 9979 |
| 0669 | 1255 | 2225 | 2701 | 3380 | 4441 | 5621 | 6540 | 7374 | 7972 | 8968 | 9985 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# इंदू मिल स्मारक पुढील वर्षी महापरिनिर्वाण दिनापूर्वी पूर्ण

पान १ वरून

विविध मान्यवरांनी डॉ. आंबेडकरांना पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. त्यापूर्वी माजी मुख्यमंत्री आणि उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे व आ. आदित्य ठाकरे यांनीही चैत्यभूमी येथे उपस्थित राहून अभिवादन केले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे आणि लवकरच तिसऱ्या स्थानावर झेप घेईल. राष्ट्राच्या प्रगतीचा पाया बाबासाहेबांनीच घातला. राष्ट्रीय विद्युत ग्रीडची संकल्पना भारताने बाबासाहेबांमुळे वेळेत स्वीकारली. त्यातून देश ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे. भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी आणि सामान्य जनतेच्या हक्कांचे रक्षण हे बाबासाहेबांच्या संविधानामुळेच शक्य झाले.

अभिवादनानंतर उपमुख्यमंत्री शिंदे आणि मंत्री शिरसाट यांनी इंदू मिलची पाहणी केली. शिंदे यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवमुक्ती, न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष केला.

## भिमसैनिकांचा रास्ता रोको

महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमी येथे निघालेल्या भीमसैनिकांनी सायन येथे रास्ता रोको करून सरकारचा निषेध केला. तुर्भे परिसरातील काही अनुयायी लहान मुले आणि महिलांना घेऊन रिक्षाने चैत्यभूमीकडे निघाले होते. मात्र त्यांना सायन येथे पोलिसांनी अडवले. भीमसैनिक आणि पोलिसांमध्ये शाब्दिक वाद झाला. या गोंधळात एका पोलीस अधिकाऱ्यांच्या पायावरून वाहन गेल्याने परिस्थिती आणखी चिघळली. भीमसैनिकांच्या आंदोलनामुळे तीन तास वाहतूक ठप्प झाली होती. अखेर अनुयायांना रिक्षासह सोडण्यात आल्यावर वाहतूक कोंडी फुटली.

गेल्या काही दिवसांत इस्रोने ज्या वेगाने नवीन मोहिमा, तांत्रिक विकास आणि दीर्घकालीन लक्ष्ये निश्चित केली आहेत, त्यातून भारताचा अंतरिक्ष कार्यक्रम आता एका निर्णायक उंचीवर पोहोचल्याचे स्पष्ट दिसत आहे. मार्च २०२६ पर्यंत सात प्रक्षेपणे पूर्ण करण्याची तत्काळ योजना, २०२७ मध्ये मानवयुक्त मोहीम, २०२८ मधील नमुना-परतावा चंद्रमोहिम, २०३५ पर्यंतची भारतीय अंतरिक्ष स्थानकाची बांधणी आणि २०४० पर्यंत भारतीय अंतरिक्षवीरांना चंद्रावर पाठवण्याचे धाडस या सर्व योजना भारताला जागतिक अवकाश शक्तींच्या गटात स्थिरपणे स्थान देण्याच्या प्रक्रियेचा भाग आहेत. इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी दिलेल्या माहितीतून या व्यापक परिवर्तनाचे चित्र अधिक स्पष्ट होते.




# पाऊल पडते पुढे...

पायाभूत सुविधा, दळणवळण, सामरिक सुरक्षा, कृषी उत्पादन किंवा नैसर्गिक आपत्तीचा अंदाज असो या सर्वांसाठी अवकाश तंत्रज्ञान मोलाची भूमिका बजावत असून सातत्यपूर्ण संशोधन महत्त्वाचे ठरते. या दृष्टीने भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात 'इस्रो'ची वाटचाल देदीप्यमान राहिली आहे. जागतिक अंतराळ स्पर्धेमध्ये आपले स्थान अधिक भक्कम करण्यासाठी इस्रोकडून अनेक मोहिमा आखल्या जात आहेत. येत्या तीन वर्षांत अवकाशातील उपग्रहांची संख्या तीन पटीने वाढ करण्याचा निर्णय भारतीय अवकाश संस्थेची महत्त्वाकांक्षा सांगणारा आहे. भारताने यात यश मिळवले तर भारतीय अवकाश संस्था केवळ नासा व युरोपिय अवकाश संस्थांच्या बरोबरीने उभा राहणार नाही तर जागतिक अवकाश बाजारात प्रमुख दावेदार बनणार आहे.

**पुढील पाच वर्षांत ५० प्रक्षेपणे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली इस्रोला पुढील पाच वर्षांत ५० प्रक्षेपणे करण्याचे लक्ष्य देण्यात आले असून इस्रो हे लक्ष्य प्रत्यक्ष उद्योग-विस्ताराशी जोडण्याचा प्रयत्न करत आहे. उपग्रहांची संख्या आणि क्षमता अधिक वाढविण्याचा निर्णय घेणे हा देशाच्या बदलत्या सामरिक, शास्त्रीय आणि आर्थिक प्राधान्यक्रमाचा चेहरा आहे. भविष्यात अवकाश क्षेत्राची स्थिती पाहता त्यानुसार विकास करण्याची इच्छा 'इस्रो' बाळगून आहे.



अंतराळ संशोधन आणि प्रक्षेपणाच्या क्षेत्रातील खासगी कंपन्यांचा वाढता सहभाग पाहता आंतरराष्ट्रीय अवकाश क्षेत्रात सुरू असलेल्या स्पर्धेत भारत नवे मापदंड प्रस्थापित करण्यास सक्षम झाला आहे. उपग्रहांची संख्या वाढवत इस्रोला सर्वांत सामर्थ्यशाली अवकाश संस्था म्हणून प्रस्थापित करणे हा रणनितीचा एक भाग आहे. फाईव्ह जी नंतर सिक्स जीचा स्वीकार करायचा असेल तर शेकडो लहान उपग्रहांना अवकाशात सोडावे लागणार आहे. एवढेच नाही तर पृथ्वीची स्थिती जाणून घेण्यासाठी आणि हवामान बदलाचे परिणाम जाणून घेण्यासाठी भविष्यात उपग्रहांना असणारी मागणी वाढणार आहे.

**अनेक देश भारताकडे आकर्षित**

जागतिक अवकाश अर्थव्यवस्थेतही उपग्रह आणि त्याच्या सेवेच्या मागणीत अभूतपूर्व वाढ होत आहे. दळणवळण, पृथ्वी निरीक्षण, संरक्षण, देखरेख, नेव्हिगेशन, आपत्ती व्यवस्थापन, कृषी आणि ऊर्जा क्षेत्रात उपग्रहांची भूमिका अत्यंत कळीची ठरत असल्याने आगामी काळात हजारो नवीन उपग्रह अवकाशात झेप घेऊ शकतात. भारताकडे वाजवी दरात, वेगवान, कुशल आणि विश्वासार्ह अवकाश मोहीम फत्तेह करण्याची क्षमता आहे. चांद्रयान ३ सह अनेक मोहिमांनी इस्रोची विश्वासार्हता अव्वल स्थानी पोहोचली आहे. विकसित देशांचे उपग्रहही मागील काळात इस्रोने अंतराळात प्रक्षेपित केले आहेत. यामुळेच आजघडीला अनेक देश भारताकडे आकर्षित होत आहेत.

**१८ ते २० उपग्रहांची बांधणी आणि निर्मिती**

असे असले तरी सध्या उपग्रह निर्मितीची क्षमता मर्यादित असल्याने देशात कुशल मनुष्यबळ असतानाही या मागणीचा फायदा उचलता येत नसल्याची स्थिती आहे. इस्रो अजूनही वार्षिक सरासरी ६ ते ७ उपग्रहांची निर्मिती करते. ती वाढवून तिप्पट करण्याचा अर्थ दरवर्षी १८ ते २० उपग्रहांची बांधणी आणि निर्मिती केली जाणार आहे. सध्या भारतीय उपग्रहांची संख्या ५५ ते ६० च्या आसपास असून ती १८० पर्यंत नेण्याची योजना आखली आहे. ही क्षमता मिळवल्यानंतर भारत अन्य देशांचेही उपग्रहही अंतराळात प्रक्षेपित करु शकतो. सुविधांची कमतरता असल्याने इस्रोवर उपग्रह सोडण्याचे वेळापत्रक तयार करताना काहीसे दडपण असते. ते टाळण्यासाठी उपग्रहांची संख्या वाढविण्याबरोबरच सॅटेलाइट इंटीग्रेशन सेंटरची संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जागतिक उपग्रह सेवेच्या स्पर्धेत आजघडीला अमेरिकेच्या स्पेस एक्ससारख्या खासगी संस्थेची एकाधिकारशाही दिसून येते. पण भविष्यात इस्रो या मक्तेदारीला निश्चितच शह देईल.

**खासगी क्षेत्रांना प्रोत्साहन**

लवकरच भारताचे पहिले स्वदेशी प्रक्षेपक पीएसएलव्ही या बदलाचा नवा साक्षीदार ठरणार आहे. अवकाश संशोधनात खासगी कंपन्यांची संख्या वाढली तर इस्रोवरील कामाचा भार कमी होऊ शकतो. तंत्रज्ञान आणि निर्मिती कार्य या कंपन्यांवर सोपविल्यास प्रक्षेपण आणि संशोधन कार्यक्रमाकडे अधिक लक्ष देता येईल, असा इस्रोचा विचार आहे. इस्रोने खासगी आणि सरकारी कंपन्यांच्या सहकार्याने उपग्रहांची संख्या तिपटींनी वाढली तर त्याचा सकारात्मक परिणाम म्हणजे अवकाश मोहिमा वेगाने पूर्ण होण्यामध्ये दिसून येईल. त्यातून व्यावसायिक प्रक्षेपणांची संख्या वाढण्यास मदत होईल. परिणामतः भारत जागतिक उपग्रह निर्मिती आणि प्रक्षेपण क्षेत्रात आघाडीचे स्थान मिळवण्याबरोबरच चांगले उत्पन्नही मिळवू शकतो. याशिवाय या क्षेत्रात आत्मनिर्भरतेवर भर दिल्यास परकीय कंपन्यांवरचे अवलंबित्व कमी होईल. सध्याचे नियोजन पाहता भारताचे पाच मॉड्यूलचे अवकाश स्थानक वेळेवर स्थापन करण्याची शक्यता बळावली आहे.

**चांद्रयान-४चे आव्हान**

आगामी काळातील सर्वात गुंतागुंतीची आणि अत्याधुनिक मोहीम म्हणजे चांद्रयान-४ या मोहिमेंतर्गत चंद्रावरचे नमुने पृथ्वीवर आणले जातील आणि ते नमुने भारताच्या रिटर्न टेक्नॉलॉजीला प्रबळ करतील. हे तंत्रज्ञान सध्या जगातील तीन देशांकडेच आहे. जपानची अवकाश संस्था 'जाक्सा'समवेत आखलेली लुपेक्स मोहीम ही चंद्रावरच्या दक्षिण ध्रुवावरचे बर्फाचे अस्तित्व जाणून घेईल आणि त्याची उपयुक्तता समजण्यास हातभार लागेल. हे नमुने मानवी मोहिमासाठी इंधन आणि पाण्याचे स्रोत सांगण्यास मदत करेल.

भारतीय अवकाश स्थानकाचे पहिले मॉड्यूल २०२८ पर्यंत पूर्ण करून २०३५ पर्यंत पाच मॉड्यूलचे अवकाश स्थानक स्थापन करू इच्छित आहे.



**श्रीनिवास औंधकर**
खगोलशास्त्र अभ्यासक

इस्रोच्या महत्त्वाकांक्षा, त्या पूर्ण करण्यासाठीची तयारी विलक्षण आहे. केंद्र सरकारही याबाबत सकारात्मक आहे. तथापि, सरकारकडून इस्रोला दीर्घकाळापर्यंत निधी उपलब्ध करून देणे, स्टार्टअप इकोसिस्टिमला प्रोत्साहन देणे, अंतराळवीर मोहीम आखण्यासाठीची नियमित गुंतवणूक आणि खासगी भागिदारीला गती देणे याबाबत सकारात्मक पावले पडल्यास इस्रो अधिक प्रमाणात प्रक्षेपण आणि ट्रॅकिंग स्थानकाची निर्मिती करू करेल. याखेरीज आंतरराष्ट्रीय सहकार्यावरही भर द्यावा लागणार आहे.

आगामी काळात गगनयानसाठी अनेक मानवविरहित चाचण्या केल्या जाणार आहेत. मानवासह गगनयान, २०२८ मधील चांद्रयान ४, जपानसमवेतचे मिशन लुपेक्स, एसएसएलव्हीची निर्मिती, रि युजेबल लाँच व्हेईकलचा विकास, शुक्रयान, भारतीय अवकाश स्थानक, न्यू जनरेशन सॅटलाईटची निर्मिती यांसारख्या महत्त्वाच्या अभियानावर काम सुरू आहे. या सर्व योजनांबरोबरच भारताने २०४० पर्यंत भारतीय अंतरिक्षवीरांना चंद्रावर उतरवून सुरक्षितपणे पृथ्वीवर परत आणण्याचे ध्येय इस्रोने निश्चित केले आहे. तूर्त इस्रोचा निर्णय हा देशाला जागतिक अवकाश बाजारात प्रबळ शक्ती म्हणून नावारुपास आणणारा, मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीला चालना देणारा आणि देशातील प्रतिभावंत तरुण शास्त्रज्ञांना संधी देणारा आहे. इस्रोने दाखवलेली ही धाडसी वाटचाल भारताचे भविष्य नव्या उंचीवर नेणारी ठरेल.

## संधी आणि क्षमता

- आज भारताचा जागतिक अवकाश संशोधनाच्या अर्थव्यवस्थेत केवळ दोन टक्के हिस्सा आहे. इस्रोने २०३० पर्यंत तो आठ टक्क्यांपर्यंत नेण्याचा उद्देश ठेवला आहे आणि यादृष्टीने काम केले जात आहे. क्षमता वाढविणे, खासगी भागिदारीचे प्रमाण वाढविणे, नवीन तंत्रज्ञानाचा विकास यामुळे भारताकडून हे ध्येय साध्य होऊ शकते.
- इस्रोची रणनिती केवळ उपग्रहांची संख्या वाढविण्यापुरतीच मर्यादित नाही. आजघडीला देशात अनेक अवकाश स्टार्टअप वेगाने समोर येत असल्याचे पाहून इस्रोच्या नियोजनानुसार उपग्रह निर्मितीत मोठ्या खासगी कंपन्यांना सामावून घेण्याचा देखील विचार आहे.
- लार्सन अँड टुब्रो, गोदरेज, एचएएल, भारत इलेक्ट्रॉनिक्स, स्कायरुट, अग्निकुल, ध्रुव स्पेस तसेच अन्य लहान स्टार्टअपला देखील भागिदार करून घेण्याचे नियोजन होत आहे, जेणेकरून भारताच्या एरोस्पेस मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीचा विकास वेगाने होईल. त्याचवेळी नासा आणि स्पेस एक्ससारख्या सरकारी आणि खासगी संस्थांचे परस्पर सहकार्याचे मॉडेल हे भारतातही राबवण्याची मनीषा बाळगून आहे. त्यामुळे संबंधित कंपन्यांना आणि शेवटी इस्रोला चांगला फायदा होणार आहे.



एखाद्या चित्रपटाचा क्लायमॅक्स पाहायला मिळावा तशाप्रकारे मागील शनिवारी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी पत्रकार परिषद घेत आपल्यात कसलेही भांडण नसल्याचे जाहीर केले. या ब्रेकफास्ट डिप्लोमसीमुळे काँग्रेसजनांनी सुटकेचा निःश्वास टाकला असला तरी पक्षांतर्गत डावपेचांच्या लढाईत सिद्धरामय्यांनी बाजी जिंकली आहे. काय आहेत यामागची कारणे?

# सिद्धरामय्यांनी जिंकली बाजी!

शनिवार २९ नोव्हेंबरची सकाळ कर्नाटकच्या राजकारणात सुरू असलेल्या राजकीय डावपेचांना कलाटणी देणारी ठरली. आठवड्याभरापूर्वी काँग्रेसच्या आकाशात जमलेले संकटांचे काळेकुट्ट ढग अचानक दूर गेले व त्यांच्या जागी शांततेचे शुभ्र कपोत उडताना दिसले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या व उपमुख्यमंत्री डी.के.शिवकुमार यांनी मुख्यमंत्री निवासस्थानी एकत्र नाश्ता केला व या 'ब्रेकफास्ट डिप्लोमसी'नंतर

**>> रविवार विशेष**

पत्रकारांशी संवाद साधून पक्षात सर्वकाही सुरळीत असल्याचा संदेश दिल्याने काही दिवसांपूर्वी अडीच-अडीच वर्षांच्या कथित सत्तावाटप फॉर्म्युल्याच्या आधारे मुख्यमंत्रिपदाची मागणी करणारे डी.के. शिवकुमार या मागणीपासून मागे म्हटले आहेत का,असा प्रश्न निर्माण झाला आहे.


सध्याची परिस्थिती पाहता डी.के. शिवकुमारांनी आपली तलवार म्यान केल्याचे स्पष्ट दिसत असून त्यामागे काही ठोस कारणेही आहेत. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे जातीय संतुलन. सिद्धरामय्या हे मागासवर्गीय समाजातून आलेले नेते आहेत, तर डी.के. शिवकुमार हे वोक्कलिगा समुदायातून पुढे आलेले असून ते उच्चवर्णिय वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. काँग्रेस सध्या ज्या तीन राज्यांत सत्तेत आहे, त्यापैकी इतर दोन राज्यांमध्ये उच्चवर्णीय समाजाचे मुख्यमंत्री बसले आहेत. त्यामुळे सिद्धरामय्यांना हटवून त्यांच्या जागी शिवकुमारांना बसवणे म्हणजे मागासवर्गीयांना प्रतिनिधित्व देण्याच्या राहुल गांधींच्या राजकारणाला धक्का देणे ठरले असते. त्यामुळेच हा पर्याय काँग्रेस हायकमांडसाठी सध्या शक्य नाही.

याशिवाय सिद्धरामय्यांना पदावरून न हटवण्यामागे त्यांची वैयक्तिक राजकीय क्षमताही एक महत्त्वाचे कारण आहे. डी.के. शिवकुमार यांच्या अफाट आर्थिक साधनसंपत्तीचा लाभ काँग्रेस अनेक निवडणुकांपासून घेत आली आहे आणि त्यामुळे पक्ष त्यांच्या आर्थिक पाठबळाखाली काही प्रमाणात दडलेलाच आहे. तरीही, सिद्धरामय्या हे काँग्रेसच्या दरबारी शैलीतील नेत्यांपैकी कधीच नव्हते. जनता पक्ष आणि जनता दलात असल्यापासून तळागाळात काम करून ते काँग्रेसमध्ये आले आहेत. त्यामुळे त्यांची राजकीय शैली ना शिवकुमारांसारखी आहे, ना अशोक गेहलोत किंवा कमलनाथांसारखी आहे. याच कारणामुळे सिद्धरामय्यांना दिल्लीला तातडीने बोलावले जाण्याचे प्रसंग क्वचितच दिसतात. गेल्या दीड-दोन वर्षांतही फक्त पंतप्रधानांना भेटण्यासाठी किंवा नीति आयोगाच्या बैठकीसाठीच ते दिल्लीला आले. त्या भेटीच्या वेळीही त्यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची औपचारिक भेट घेतली होती. बरेचदा ते दिल्लीला आल्यावर खरगेंना न भेटताही जातात. राहुल गांधींना भेटण्यासाठीही ते इतर राज्यांतील नेत्यांसारखे कधीच आतुर नसतात. सिद्धरामय्या यांची ही स्वतंत्र, आत्मविश्वासपूर्ण शैली कर्नाटकात त्यांच्या स्वतःच्या वेगळ्या 'कल्ट'ला आकार देणारी ठरली आहे.

कर्नाटकातील काँग्रेसच्या आमदारांमध्येही आजही त्यांचा प्रभाव प्रचंड आहे. जर या आमदारांमध्ये खुले मतदान झाले (जे २०२३ मध्येही झाले नव्हते) तर सिद्धरामय्या सहजपणे कोणत्याही प्रतिस्पर्ध्यापेक्षा पुढे राहतील. लोकप्रियतेच्या निकषांवर ते काँग्रेससाठी अपरिहार्य आहेत. त्यामुळे त्यांना हटवणे त्यांच्या संमतीशिवाय कोणालाच शक्य नाही अशी स्थिती आज दिसून येते. परिणामी डी.के. शिवकुमार यांच्याकडे सध्या तरी प्रतीक्षा करण्याव्यतिरिक्त पर्याय नाही आणि भविष्यातही त्यांना प्रतीक्षाच करावी लागणार असे दिसते.

डी. के. शिवकुमार अनेकदा सांगतात की, २०२९ मध्ये राहुल गांधींना पंतप्रधान म्हणून पाहण्याची आपली इच्छा आहे. पण हाच धागा पकडत त्यांची समजूत काढली जाते. राहुल गांधींच्या राष्ट्रीय राजकारणाचा मार्ग सुकर करायचा असेल, तर सध्या त्यांनी स्वतःच्या महत्वाकांक्षांना लगाम घालून २०२८ च्या विधानसभा निवडणुकांपर्यंत प्रतीक्षा करावी, असा सल्ला त्यांना दिला जातो. काँग्रेसच्या काही गटांमध्ये अशीही भीती व्यक्त होत आहे की, शिवकुमार पुढे जाऊन ज्योतिरादित्य सिंधिया किंवा हिमंता बिस्वा सरमा तर ठरणार नाहीत ना? कारण त्यांच्याशी इतर पक्षांचे अनेक नेते संपर्कात असतात. पण शिवकुमार यांचे गांधी कुटुंबाशी वैयक्तिक स्नेहबंध आहेत. प्रियंका गांधी तर त्यांना मुख्यमंत्री करण्याच्या विचाराच्या बाजूने असल्याचेही म्हटले जाते. त्यामुळे ते तत्काळ बंड करतील अशी शक्यता अत्यल्प आहे.

एक फॉर्म्युला असा चर्चेत आहे की सोनिया गांधी स्वतः सिद्धरामय्यांना अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत मुख्यमंत्रिपदावर राहण्यास सांगतील आणि त्यानंतर त्यांनी स्वेच्छेने पदत्याग करावा अशा सूचना दिल्या जातील. त्यानंतर मुख्यमंत्रिपद शिवकुमारांना देण्यात येईल. पण कर्नाटकातील काँग्रेसची खरी समस्या म्हणजे येथे मुख्यमंत्रिपदाचे अनेक दावेदार आहेत. सिद्धरामय्यांचे पद गेल्यास गृहमंत्री जी. परमेश्वर यांच्यासह अनेक नेते दावेदारीसाठी सज्ज आहेत. खुद्द काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असणाऱ्या मल्लिकार्जुन खरगे यांनाही योग्य वेळ मिळाल्यास मुख्यमंत्रिपद स्वीकारण्याची इच्छा असल्याचे म्हटले जाते.



**रशिद किडवई**
ज्येष्ठ राजकीय विश्लेषक, नवी दिल्ली

या संपूर्ण अस्थिरतेच्या मुळाशी काँग्रेस हायकमांडचे आपल्या रणनीतिकारांवर असणारे अतिअवलंबित्व कारणीभूत आहे. सोनिया गांधींच्या काळात अहमद पटेल यांच्या रणनीतीने पक्षाला पाठबळ दिले होते. पण आज राहुल गांधींच्या आजूबाजूचे के.सी. वेणुगोपाल आणि रणदीप सुरजेवाला यांसारखे रणनीतिकार वारंवार अपयशी ठरत असूनही पदावर टिकून आहेत. इंदिरा गांधी आपल्या रणनीतिकारांमध्ये वेळोवेळी फेरबदल करून त्यांची जबाबदारी निश्चित करत असत; पण राहुल गांधींच्या व्यवस्थेत हे पूर्णतः दिसत नाही. याचा परिणाम असा की काँग्रेसमध्ये आत्मपरीक्षण करण्याची आणि पुनर्गठन करण्याची संस्कृती जवळपास अदृश्य झाली आहे. उदाहरणच घ्यायचे झाल्यास अलीकडेच पार पडलेल्या बिहार विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. यानंतरही पक्षाची समीक्षा समितीदेखील गठित न होणे हे पक्षातील गोंधळाचे सर्वात ठळक उदाहरण ठरले आहे. पराभवाची संपूर्ण जबाबदारी निवडणूक आयोगावर ढकलून पक्षाने स्वतःचे मूल्यमापन करण्याची संधी गमावली आहे. पक्षनेतृत्वाच्या अशा प्रकारच्या भूमिकांमुळे अंतर्गत वादळे उद्भवण्याच्या शक्यता वाढत जातात. कर्नाटकात उद्भवलेले वादळ तूर्त शमलेले असले तरी त्याचे कारण पक्षनेतृत्वाचे कौशल्य नसून सिद्धरामय्यांची ताकद हे आहे.



# चिंता कोठडीतील मृत्यूंची

**गेल्या २० वर्षांत देशभरातील कोठडीत असताना १८८८ लोकांचा मृत्यू झाल्याचे आकडेवारी सांगते; मात्र, या मृत्यूंबाबत झालेल्या कारवाईची आकडेवारी पाहिली, तर २० वर्षांत ८९३ प्रकरणांमध्ये पोलिसांवर गुन्हे दाखल करण्यात आले, ३५८ पोलिसांवर आरोपपत्रही सादर करण्यात आले; पण केवळ २६ जणांना कोठडीतील मृत्यूप्रकरणी दोषी ठरवण्यात आले आहे. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे या दोन दशकांमध्ये कोठडीत मृत्यू झालेल्यांपैकी ६० टक्के लोकांना मृत्यूपूर्वी एकदाही कोर्टात हजर करण्यात आले नव्हते.**

अलीकडील काळात देशभर ज्या प्रमाणात पोलीस कोठडीतील मृत्यूंचे अहवाल नोंदवले जात आहेत, त्यावरून तपास यंत्रणा आपल्या जबाबदाऱ्यांचे पालन पूर्णपणे करताना दिसत नाहीत हे स्पष्ट होत आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अहवालानुसार २०१७ ते २०२२ या पाच वर्षांच्या काळात देशात ६६९ जणांचा कारागृहात मृत्यू झाला. हा आकडा धक्का देणारा आहे. खुद्द केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार,२०२०-२१ मध्ये एकट्या उत्तर प्रदेशामध्ये ४५१ लोकांचा कोठडीत मृत्यू झाला, तर २०२१-२२ मध्ये हा आकडा ५०१ वर पोहोचला.

तपास यंत्रणा आरोपींना न्यायालयासमोर उभे करण्याच्या उद्देशाने चौकशी करत असते, परंतु संबंधित आरोपी न्यायालयापर्यंत पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला तर मूलभूत न्यायाच्या कल्पनेलाच धक्का बसतो. सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकारांबाबत अलीकडेच कठोर भूमिका घेतली आहे. राजस्थानमध्ये अवघ्या आठ महिन्यांत ११ जणांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याचा उल्लेख करून न्यायालयाने या घटनांना 'व्यवस्थेवरील डाग' म्हटले आहे. इतकेच नव्हे तर अशा प्रकारचे मृत्यू आता देश सहन करणार नाही, असे स्पष्ट शब्दांत यंत्रणांची कानटोचणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने फटकारण्याचे मुख्य कारण म्हणजे कोठडीतील मृत्यू हे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर थेट परिणाम करणारे आहेत.

विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने २०२० च्या परमवीर सिंग सैनी विरुद्ध बलजीत सिंग प्रकरणात स्पष्ट निर्देश दिले होते की सर्व पोलीस ठाण्यांत तसेच एनआयए, सीबीआय, ईडी, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो, डीआरआय आणि इतर अशा चौकशी व अटक अधिकार असलेल्या सर्व संस्थांमध्ये सीसीटीव्ही आणि रेकॉर्डिंग यंत्रणा बंधनकारक असावी, कारण हे मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आहे. या आदेशामागचा उद्देश म्हणजे ताब्यात असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर होणारी संभाव्य हिंसा, दबाव किंवा अमानवी वागणूक रोखली जावी आणि जर असा आरोप झालाच तर त्याची सत्यासत्यता तपासण्याचे विश्वसनीय साधन उपलब्ध असावे.

मात्र अनेक राज्यांत या आदेशांकडे गांभीर्याने पाहिलेच गेले नाही. परिणामी, आज देशातील बहुतांश राज्यांमध्ये अनेक पोलीस ठाण्यांमध्ये कॅमेरे बसवलेले नाहीत. काही ठिकाणी कॅमेरे असले तरी ते चालू नाहीत, काही ठिकाणी रेकॉर्डिंगची यंत्रणा बंद ठेवलेली आढळते. ही स्थिती अत्यंत चिंताजनक आहे.



**डॉ. जयदेवी पवार**

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे पोलीस प्रशासन, तपास यंत्रणा या आपल्या ताब्यातील व्यक्तींच्या हक्कांबद्दल संवेदनशील नाहीत.

**कोठडीतील मृत्यूंची कारणमीमांसा केली तर काही प्रमुख कारणे दिसून येतात.**

**पहिले कारण** शारीरिक अत्याचार. अनेक वेळा चौकशीदरम्यान आरोपींकडून माहिती मिळवण्यासाठी यंत्रणांकडून वापरले जाणारे दबावाचे मार्ग अत्यंत कठोर आणि अमानवी असतात.

**दुसरे कारण** आवश्यक वैद्यकीय सुविधांचा अभाव. तुरुंगामध्ये किंवा आपल्या ताब्यात ठेवताना तपास यंत्रणांनी संबंधित व्यक्तींची प्राथमिक आरोग्य तपासणी, औषधोपचार, मानसिक स्थिती तपासणे आणि सतत देखरेख करणे आवश्यक असते. अनेक मृत्यू या दुर्लक्षाचा परिणाम असल्याचेही दिसून आले आहे.

**तिसरे कारण** म्हणजे आत्महत्या. मनावरचा प्रचंड ताण, भविष्याची भीती, विविध मार्गांनी येणारा दबाव किंवा चौकशीचे भय यामुळे काही आरोपी स्वतःचाच घात करतात.

**चौथे कारण** अपघाती मृत्यू. कधी देखरेखीच्या अभावामुळे, तर कधी मूलभूत सुविधांची अनुपलब्धता असल्यामुळे हे मृत्यू घडतात.

पोलीस कोठडी असो वा न्यायालयीन कोठडी, त्यामध्ये आरोपीला न्यायालयीन आदेशानुसार तुरुंगात ठेवले जाते. या दोन्ही परिस्थितींमध्ये ताब्यातील व्यक्तीचे संपूर्ण संरक्षण हे अधिकाऱ्यांचे कायदेशीर कर्तव्य आहे. कोठडीतील व्यक्तींची देखरेख करणे, नियमांचे पालन होणे, दोषींवर कारवाई करणे याबाबतची जबाबदारी राज्य आणि केंद्र सरकारचीही आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, मानवाधिकार आयोगाच्या शिफारशी आणि कायदेशीर तरतुदी असूनही ते सर्व केवळ कागदावरच राहते. कोठडीतील मृत्यू ही केवळ एखाद्या अधिकाऱ्याची किंवा संस्थेची चूक नाही, तर ती संपूर्ण प्रशासकीय आणि राजकीय उदासीनतेचे प्रतिक आहे.

**समस्येवर उपाय शोधताना**

कोठडीतील मृत्यूंची वाढती संख्या यंत्रणांवरील विश्वासाला तडा देणारी आहे. या समस्येवर उपाय शोधताना दीर्घकालीन पावले उचलणे आवश्यक आहे. सर्वप्रथम संरचनात्मक पातळीवरील सुधारणा करताना सर्व पोलीस ठाण्यांत व तपास संस्था कार्यालयांत सीसीटीव्ही कार्यान्वित असणे, त्यांची नियमित तपासणी होणे, रेकॉर्डिंग राखून ठेवण्याची प्रणाली असणे आवश्यक आहे.दुसरा स्तर म्हणजे प्रशिक्षण.

ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची हाताळणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना मानवाधिकार, चौकशीचे कायदेशीर तत्त्व आणि अत्याचाररहित पद्धतींबाबत सखोल प्रशिक्षण दिले पाहिजे.

तिसरा स्तर म्हणजे जबाबदारी निश्चिती. ताब्यातील व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्या प्रकरणात दोषी ठरणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर आणि तातडीची कारवाई झाली पाहिजे. तरच भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठीचे गांभीर्य निर्माण होईल. या सर्व सुधारणांसोबत सरकारच्या भूमिकेचे महत्त्वही प्रचंड आहे. राज्य आणि केंद्र सरकारांनी कायद्याचे पालन, न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी आणि तपास यंत्रणांवरची देखरेख अधिक सक्रियतेने पार पाडली पाहिजे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# इंडिगोच्या इगोने प्रवासी वेठीला

भारताचा आर्थिक विकास वेगाने होतो आहे. तिसरी आर्थिक महासत्ता होण्याची घाई सरकारला झालेली आहे. हे सर्व उद्दिष्ट गाठण्याकरता सर्व स्तरावर विकासाच्या वेगवेगळ्या योजना राबवल्या जातात. आपण जगाच्या बरोबर राहिले पाहिजे आणि जागतिक स्तरावर आपली तितकीच दखल घेतली गेली पाहिजे अशा उद्देशाने सरकार वेगवेगळ्या स्तरावर प्रगतीचे टप्पे गाठतो आहे. म्हणूनच गेल्या काही वर्षात देशभरात अगदी हवाई वाहतूक क्षेत्रामध्ये मोठे परिवर्तन घडवून आणले जाते आहे. आज संपूर्ण देशामध्ये जवळपास छोटी-मोठी २०० विमानतळ बांधली जात आहेत. म्हणजे देशांतर्गत विमान वाहतुकीला मोठी चालना मिळेल आणि एकेकाळी श्रीमंतांचीच मक्तेदारी असलेला हवाई प्रवास सर्व स्तरातील सामान्य माणसाला सुद्धा तितकाच सहजतेने आणि स्वतःमध्ये उपलब्ध होईल अशा प्रकारच्या योजनाही आखल्या जात आहेत. एकीकडे हे प्रयत्न चालू असतानाच नवी मुंबईतले अगदी जागतिक दर्जाचे आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधले गेले त्याच्या पाठोपाठ आता वाढवणलाही त्यापेक्षाही अधिक आधुनिक विमानतळ तयार होईल. देशाच्या अन्य शहरांमध्ये अगदी दिल्ली, बंगलोर, अहमदाबाद, लखनऊ या ठिकाणची विमानतळही अत्याधुनिक स्वरूपाची केली जात आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये भारतातील हवाई वाहतूक जवळपास १०० पटीने वाढलेली आहे. म्हणजे विमानाने प्रवास करणाऱ्यांच्या प्रवासी संख्येमध्ये चक्क १०० पट वाढ झाल्याचे पाहायला मिळते आहे. वेगवेगळ्या कारणांमुळे ही वाढ नोंदली गेली ज्यामध्ये हवाई प्रवास काही प्रमाणात सुसह्य झाला. शिवाय वेळ वाचवण्यासाठी आणि उद्योग व्यवसायांचा विस्तार झाल्याने लोकांचा हवाई प्रवास वाढलेला आहे. कॉर्पोरेट क्षेत्रामध्ये हवाई प्रवासाला पर्याय राहत नाही. तिथे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना त्यांच्या हवाई प्रवासाच्या सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. अशा वेगवेगळ्या कारणांमुळे हवाई प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ज्या प्रमाणात ही प्रभावी संख्या वाढली त्या प्रमाणामध्ये भारतातील हवाई उद्योगासाठी किंवा हवाई प्रवासासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा भक्कम झालेल्या नाहीत हे अलीकडच्या काही ताज्या घटनांवरून स्पष्ट होते. गेल्या दोन-तीन दिवसांपासून भारतातल्या इंडिगो विमान कंपनीने प्रवाशांचे जे काही हाल केले आहेत त्यावरून हे स्पष्ट होते की, भारताच्या हवाई उद्योगावर सरकारचे अपेक्षेप्रमाणे नियंत्रण नाही.

### हवाई क्षेत्रातील बेशिस्त

हजारो प्रवाशांना वेठीला धरण्याचा प्रकार गेल्या काही दिवसात घडला आणि अनेकांचे आर्थिक नुकसान होण्यापासून, आरोग्याच्या बाबतीतही बराच मोठा त्रास अनेक प्रवाशांना सोसावा लागलेला आहे. इंडिगोने जवळपास आपली १००० ते १५०० उड्डाणे दोन दिवसांमध्ये रद्द केली. ज्यांना व्यवसाय उद्योग आणि अन्य कारणांसाठी प्रवास करायचा असतो ते किमान महिनाभर किंवा पंधरा दिवस अथवा एक आठवडा आधीच विमानांचे ॲडव्हान्स बुकिंग करून ठेवतात. जेणेकरून त्यांचा प्रवास अधिक सुसह्य आणि वेळापत्रकाप्रमाणे व्हावा हा उद्देश असतो. परंतु इंडिगो कंपनीने केलेला हलगर्जीपणा आणि एकूणच उड्डाण रद्द करण्याचा केलेला तमाशा हा लोकांसाठी अत्यंत जीवघेणा स्वरूपाचा ठरला. याचे कारण सांगताना त्यांच्याकडे कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने ही परिस्थिती उद्भवली. परंतु सरकारने १ नोव्हेंबरपासून विमान चालकांसाठी एक नवीन नियमावली तयार केली होती. ज्यामध्ये त्यांच्या कामाच्या वेळा मर्यादित करून त्यांना पुरेशी विश्रांती देणे आणि ज्याला नाईट लँडिंग म्हणतात त्याच्या संदर्भातही काही निकष आखून दिले होते हे निकष आखून दिल्याने कर्मचाऱ्यांची किंवा विमान चालकांची संख्या वाढवणे सुद्धा तितकेच गरजेचे होते. या संदर्भातील सगळी कल्पना सगळ्या विमान कंपन्यांना दिली गेली होती आणि त्यानुसार त्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करावी, असे सुद्धा सांगितले गेले होते. परंतु महिनाभराचा अवधी देऊनही इंडिगो विमान कंपनीने याबाबतीत फारसा उत्साह दाखवला नाही. परिणामी अचानकपणे जेव्हा कर्मचाऱ्यांची कमतरता भासू लागली त्यावेळेला धडाधड विमान रद्द करण्याचा सपाटा लावला. ज्यातून लोकांचे आर्थिक नुकसान झाले. ऐनवेळेला विमान उपलब्ध होत नसल्याने भाडे वाढत गेले. कारण विमान कंपन्यांना तशी मुभा दिली गेलेली आहे की, ज्या वेळेला प्रवाशांची मागणी जास्त असेल त्यावेळेला ते आपल्या पद्धतीने भाडे वाढवू शकतात आणि या सगळ्या परिस्थितीचा प्रचंड गैरफायदा इतर विमान कंपन्यांनी घेतला आणि अगदी मुंबई-दिल्ली विमान भाडे दहा ते पंधरा हजार असते ते तब्बल ३५-४० हजारांपर्यंत जाऊन धडकले. इंडिगो विमान कंपनीच्या या अत्यंत बेफिकीर प्रकाराने विमान उद्योगावरच एक मोठा परिणाम झालेला दिसून येतो. हवाई प्रवाशांना वेठाला धरण्याचा प्रकार त्यातून उघड झालेला आहे. इंडिगोने आपला हा इगो जपल्यानेच ही परिस्थिती उद्भवली आणि त्यातून प्रवाशांना आर्थिक आणि मानसिक त्रासही खूप सहन करावा लागला आहे.

### उत्तम दर्जाच्या सुविधा नाहीत


एकीकडे भारताला जागतिक स्तरावर स्वतःला विकसित म्हणून मिरवून घ्यायचे आहे, पण त्या तुलनेमध्ये जागतिक स्तरावर ज्या उत्तम दर्जाच्या हवाई किंवा विमान प्रवासाची आवश्यकता असते तो दर्जा अजून भारताने गाठलेला दिसत नाही. हा गोंधळ एकूणच भारताच्या हवाई उद्योगावर परिणाम करणारा ठरतो. लोकांमध्ये इंडिगो कंपनीविषयी असलेली लोकप्रियता आता संपुष्टात आल्यात जमा आहे. देशातील जवळपास ६० टक्के विमान ही इंडिगोची असतात आणि त्याला लोकांनी प्रतिसाद दिलेला होता. परंतु आता ज्या पद्धतीने प्रवाशांना गृहीत धरले गेले त्यावरून आता या कंपनीची विश्वासार्हता संपुष्टात आलेली आहे. मात्र देशभरातल्या या अभूतपूर्व गोंधळाने देशाच्या हवाई क्षेत्राला खूप मोठी शिस्त आणण्याची आवश्यकता आहे. सरकारने आता महिनाभरासाठी काही नियमात बदल केले ते तात्पुरत्या स्वरूपाचे जरी असले तरी एखाद्या कंपनीने घातलेल्या गोंधळापुढे सरकारला शरणागती पत्करावी लागलेली दिसते. या पद्धतीने हवाई क्षेत्र कंपन्यांच्या हवाली करून आणि प्रवाशांना भेटीला धरून चालवता येणार नाही हे या नव्या प्रकारातून स्पष्ट होते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

जिवनात वेगापेक्षा दिशा महत्त्वाची आहे.
जर दिशा योग्य नसेल तर वेगाचा काहीच उपयोग नाही.

## पंचांग



रवी उदय- ०७-००
रवी अस्त- १८-००

**रविवार, ७ डिसेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**मार्गशीर्ष कृष्ण तृतीया**
**नक्षत्र : पुनर्वसू**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २२-३८ मिथुन**
**२२-३९ ते २४-०० कर्क**

**संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय रात्री ८.३६, ध्वजदिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### उपवासाचे कोन



★ **साहित्य :-** वरईचे तांदूळ १ कप, साबुदाणा १/४ कप, उकडलेले बटाटे २-३ (सोलून), आलं-हिरवी मिरचीचा ठेचा १ चमचा, जिरे १/२ चमचा, भाजलेल्या शेंगदाण्याचे कूट, चवीनुसार सैंधव मीठ, तळण्यासाठी तेल.

★ **कृती :-** वरीचे तांदूळ आणि साबुदाणा एकत्र करून स्वच्छ धुवून घ्या आणि पाणी घालून ३-४ तास भिजत ठेवा. भिजवलेला वरीचा तांदूळ-साबुदाणा आणि उकडलेले बटाटे मिक्सरमध्ये जाडसर वाटून घ्या. त्यात आलं-मिरचीचा ठेचा, जिरे, शेंगदाणा कूट, मीठ आणि कोथिंबीर घालून चांगले मिसळा. या मिश्रणाचे छोटे, शंकूच्या आकाराचे (कोन) वडे बनवा. गरम तेलात हे कोन सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या. दह्यासोबत किंवा शेंगदाण्याच्या चटणीसोबत गरमगरम कोन सर्व्ह करा. चविष्ट उपवासाचे कोन खाण्यासाठी तयार आहेत.



# ग्रीव्हजच्या द्विशतक खेळीसमोर न्यूझीलंडचे लोटांगण
## वेस्ट इंडिजला पहिली कसोटी अनिर्णित राखण्यात यश

■ क्राईस्टचर्च

**वेस्ट इंडिज क्रिकेट संघाविरुद्ध घरच्या मैदानावर न्यूझीलंडला अशा कामगिरीची कल्पनाही करता आली नसती. तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात ५३१धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या पाहुण्या वेस्ट इंडिज संघाने दुसऱ्या डावात ६ बाद ४५७ धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून जस्टिन ग्रीव्हजने एका टोकाला ठामपणे फलंदाजी केली आणि द्विशतक झळकावले आणि सामना अनिर्णित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. शाई होपनेही (१४०) शतक झळकावले, तर केमार रोचने नाबाद ५८ धावा केल्या.**



**वेस्ट** इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. न्यूझीलंड पहिल्या डावात २३१ धावांवर सर्वबाद झाला होता.प्रत्युत्तरात वेस्ट इंडिज संघ १६७ धावांतच गारद झाला. यानंतर दुसऱ्या डावात न्यूझीलंडने ६ बाद ४६६ धावांवर डाव घोषित केला. पहिल्या डावात ६४ धावांच्या आघाडीवर त्यांनी वेस्ट इंडिजसमोर ५३१ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले. यानंतर वेस्ट इंडिजने फक्त ७४ धावांत चार विकेट गमावल्या. ज्यामुळे न्यूझीलंडचा विजय निश्चित मानला जात होता. मात्र जस्टिन ग्रीव्हज आणि शाई होप यांच्याकडे वेगळेच नियोजन होते. पाचव्या विकेटसाठी त्यांनी केलेल्या १९६ धावांच्या भागीदारीमुळे सामन्यात रंगत आली. होपने २३४ चेंडूंत १४० धावा केल्या. तो बाद झाल्यानंतर जस्टिन ग्रीव्हजने जबाबदारी स्वीकारली आणि शेवटपर्यंत नाबाद राहिला. जस्टिन ग्रीव्हजने ३८८ चेंडूंचा सामना केला आणि नाबाद २०२ धावा केल्या. त्याच्या डावात १९ चौकारांचा समावेश होता. यासह तो कसोटी सामन्याच्या चौथ्या डावात शतक करणारा इतिहासातील सातवा फलंदाज बनला आहे. फलंदाजी करताना त्याला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली. परंतु तो क्रीजवरच राहिला. त्याने आणि केमार रोचने सातव्या विकेटसाठी नाबाद १८० धावा केल्या, ज्याने सामना अनिर्णित ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. केमार रोचनेही २८२ चेंडूंत नाबाद ५८ धावा करत पहिले कसोटी अर्धशतक केले.

## थालीफेकपटू सीमा पुनियावर १६ महिन्यांची बंदी घातली

■ नवी दिल्ली

**आशियाई** क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी प्रसिद्ध भारतीय थालीफेकपटू सीमा पुनिया हिच्यावर डोपिंग प्रकरणी १६ महिन्यांची बंदी घालण्यात आली.४२ वर्षीय सीमा पुनियावरील बंदी १० नोव्हेंबरपासून लागू झाली.राष्ट्रीय डोपिंग विरोधी एजन्सीने (नाडा) जाहीर केलेल्या डोपिंग गुन्हेगारांच्या अद्ययावत यादीत ही माहिती समोर आली आहे.सीमा पुनिया कोणत्या प्रतिबंधित पदार्थासाठी पॉझिटिव्ह आढळली हे नाडाने स्पष्ट केलेले नाही.सीमा पुनियाने तिच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले आहेत.

## राज्यस्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेसाठी मुंबईच्या साक्षात साळुंखेची निवड

■ पालघर



**अहिल्यानगरात** २० ते १२ डिसेंबर रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय कबड्डी निवड चाचणी स्पर्धेसाठी मुंबई विभागीय संघ जाहीर करण्यात आला. या संघात शिरोडकर हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाचा साक्षात कपिल साळुंखेची निवड झाली असून या संघासाठी साक्षातच्या रुपात मुंबई शहरमधून एकमेव निवड झालेली आहे. त्याची मुंबईतून निवड होऊन अहिल्यानगर संगमनेर येथे होणाऱ्या कबड्डी चाचणी स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

साळुंखे कुटुंबात कुस्ती आणि कबड्डी खेळाची परंपरा खूप मोठी आहे. आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय, आशियाई सुवर्णपदक विजेते,शिवछत्रपती पुरस्कार विजेते असे नावलौकिक खेळाडू या घरात आहेत. शिवछत्रपती पुरस्कार विजेते संपतराव साळुंखे, आशियाई सुवर्णपदक विजेती स्नेहल साळुंखे, राष्ट्रीय खेळाडू सुजाता साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली तो सराव करत आहे.

## फिफा विश्वचषकाची गटवारी जाहीर
### मेक्सिको-द.आफ्रिका पहिला सामना



■ वॉशिंग्टन

**अमेरिका,** कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये पुढील वर्षी ११ जून ते १९ जुलैदरम्यान होणार्या फिफा विश्वचषकाची गटवारी घोषणा वॉशिंग्टनमध्ये करण्यात आली. ४८ संघांना १२गटांमध्ये (ए ते एल) विभागण्यात आले असून प्रत्येक गटात चार संघ आहेत. यावेळी विश्वचषकाचा उद्घाटनाचा सामना ११ जून २०२६ रोजी मेक्सिको सिटीमध्ये खेळवला जाईल. यात यजमान देश मेक्सिको आणि दक्षिण आफ्रिका आमनेसामने असतील.

अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा हे तीन देश विश्वचषकाचे यजमानपद भूषवत असल्याची ही पहिलीच वेळ असेल. या सोहळ्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना ‘फिफा पीस प्राइज’देण्यात आले. फिफाने नोव्हेंबरमध्ये हा नवीन वार्षिक पुरस्कार घोषित केला होता.

### गटवारी

**गट अ:** मेक्सिको,दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया, पात्रता फेरीसाठी एक संघ
**गट ब:** कॅनडा, कतार, स्वित्झर्लंड, पात्रता फेरीसाठी एक संघ
**गट क:** ब्राझील, मोरोक्को, हैती, स्कॉटलंड
**गट ड:** अमेरिका, पॅराग्वे, ऑस्ट्रेलिया, पात्रता फेरीसाठी एक संघ
**गट ई:** जर्मनी, कुराकाओ, आयव्हरी कोस्ट, इक्वेडोर
**गट फ:** नेदरलँड्स, जपान, ट्युनिशिया, पात्रता फेरीसाठी एक संघ
**गट जी:** बेल्जियम, इजिप्त, इराण, न्यूझीलंड
**गट एच:** स्पेन, केप व्हर्दे, सौदी अरेबिया, उरुग्वे
**गट आय:** फ्रान्स, सेनेगल, पात्रता फेरीसाठी एक संघ, नॉर्वे
**गट जे:** अर्जेंटिना, अल्जेरिया, ऑस्ट्रिया, जॉर्डन
**गट के:** पोर्तुगाल, पात्रता फेरीसाठी एक संघ, उझबेकिस्तान, कोलंबिया
**गट एल:** इंग्लंड, क्रोएशिया, घाना, पनामा

## ऑस्ट्रेलियाची विजयाकडे आगेकूच
### इंग्लंड अजूनही ४३ धावांनी पिछाडीवर

■ ब्रिस्बेन

**ब्रिस्बेन** क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या ॲशेस कसोटी मालिकेतील दुसर्या सामन्याच्या तिसर्या दिवशीही इंग्लंडविरुद्ध ऑस्ट्रेलियाने विजयाकडे आगेकूच केली.ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ५११ धावांवर आटोपला. त्यामुळे इंग्लंडवर ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात १७७ धावांची आघाडी घेतली. या प्रत्युत्तरात इंग्लंडने दिवसअखेर ६ गडी गमावून १३४ धावा केल्या. परिणामी इंग्लंडचा संघ ४३ धावांनी पिछाडीवर आहे. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने सर्वबाद ३३४ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाने आज तिसऱ्या दिवसाच्या खेळाची सुरुवात ६ बाद ३७८ या धावसंख्येने केली. पहिल्या सत्रात ऑस्ट्रेलियाला धक्का बसला. परंतु मिचेल स्टार्कने डाव सावरला आणि शानदार अर्धशतक झळकावले. ज्यामुळे संघाची धावसंख्या ५००च्या पुढे गेली. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाकडून स्टार्कनं सर्वाधिक ७७धावा केल्या. त्याच्याशिवाय जेक वेदरल्डने ७२, मार्नस लॅबुशानेने ६५आणि ॲलेक्स कॅरीने ६३ धावा केल्या.




जगप्रसिद्ध फुटबॉलपटू मुंबईच्या दौऱ्यावर येणार आहे. तो १४ डिसेंबर रोजी वानखेडे स्टेडियमवर एक क्रिकेट सामनाही खेळणार आहे. त्यानिमित्त मुंबईत ठिकठिकाणी पोस्टर लागली आहेत.

## धाराशिव-पुणे, सोलापूर-सांगली उपांत्य फेरीत भिडणार

■ अहिल्यानगर

**महाराष्ट्र** खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने बुऱ्हाणनगरमध्ये श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे सुरू झालेल्या ५१ वी मुले-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत उपांत्यपूर्व सामन्यांचा थरार शिगेला पोहोचला.कुमार गटात धाराशिव,पुणे,सांगली व सोलापूर संघानी तर मुलींच्या गटात धाराशिव,ठाणे,सोलापूर आणि सांगली संघानी उपांत्य फेरी गाठत आपले वर्चस्व सिद्ध केले.सर्व सामने उच्च दर्जाची झुंज,रणनीती व जिद्दीचा उत्तम मिलाफ घडवणारे ठरले.या स्पर्धेत वेग,चातुर्य आणि मनोबळाची खरी परिक्षा पाहायला मिळाली.



उपउपांत्य फेरीच्या मुलांच्या पहिल्या सामन्यात धाराशिवने मुंबईवर १ डाव ३३ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. मध्यंतरासच धाराशिवकडे ५ ड्रिम रनसह ४२-६ अशी मोठी आघाडी होती. धाराशिवकडून जितेंद्र वसावे (३.४० मि.संरक्षण व ६ गुण),विशाल वसावे (३.०० मि.संरक्षण व ४ गुण)राज जाधव (२.२० मि.संरक्षण व तब्बल १६ गुण)यांनी तर पराभूत मुंबईच्या प्रसाद घाडीगांवकर (४ गुण)सामन्यात एकार्फी कामगिरीची नोंद केली.दुसऱ्या सामन्यात सोलापूरच्या धारदार आक्रमणामुळे ठाण्याचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीतच संपुष्टात आले.सोलापूरने ४ गुणांनी निसटता विजय मिळविला. सोलापूरकडून शंभुराजे चंदनशिवने १.४० मि.संरक्षण करून आक्रमणात १० गुण मिळवले. सुहान आत्तारने २.१० मि;सिद्धार्थ मानेने १.५० मि. तर अकबर शेखने २.३० मि.संरक्षण केले. ठाण्याच्या आशिष गौतमने दोन्ही डावात प्रत्येकी २ मि.संरक्षण करून आक्रमणात ८ गुण संपादन करून एक हाती लढत दिली. ओंकार सावंतने १ , १.१० मि.संरक्षण करून आक्रमणात ६ गुण मिळवले.

# श्री लक्ष्मी चालीसा



**दोहा**

मातु लक्ष्मी करि कृपा करो हृदय में वास।
मनोकामना सिद्ध कर पुरवहु मेरी आस।।
सिंधु सुता विष्णुप्रिये नत शिर बारंबार।
ऋद्धि सिद्धि मंगलप्रदे नत शिर बारंबार।।

**सोरठा**

यही मोर अरदास, हाथ जोड़ विनती करूं।
सब विधि करौ सुवास, जय जननि जगदंबिका।।

**।। चौपाई ।।**

सिन्धु सुता मैं सुमिरौं तोही। ज्ञान बुद्धि विद्या दो मोहि।।
तुम समान नहिं कोई उपकारी। सब विधि पुरबहु आस हमारी।।
जै जै जगत जननि जगदम्बा। सबके तुमही हो स्वलम्बा।।
तुम ही हो घट घट के वासी। विनती यही हमारी खासी।।
जग जननी जय सिन्धु कुमारी। दीनन की तुम हो हितकारी।।
विनवौं नित्य तुमहिं महारानी। कृपा करौ जग जननि भवानी।
केहि विधि स्तुति करौं तिहारी। सुधि लीजै अपराध बिसारी।।
कृपा दृष्टि चितवो मम ओरी। जगत जननि विनती सुन मोरी।।
ज्ञान बुद्धि जय सुख की दाता। संकट हरो हमारी माता।।
क्षीर सिंधु जब विष्णु मथायो। चौदह रत्न सिंधु में पायो।।
चौदह रत्न में तुम सुखरासी। सेवा कियो प्रभुहिं बनि दासी।।
जब जब जन्म जहां प्रभु लीन्हा। रूप बदल तहं सेवा कीन्हा।।
स्वयं विष्णु जब नर तनु धारा। लीन्हेउ अवधपुरी अवतारा।।
तब तुम प्रकट जनकपुर माहीं। सेवा कियो हृदय पुलकाहीं।।
अपनायो तोहि अन्तर्यामी। विश्व विदित त्रिभुवन की स्वामी।।
तुम सब प्रबल शक्ति नहिं आनी। कहं तक महिमा कहौं बखानी।।
मन क्रम वचन करै सेवकाई। मन- इच्छित वांछित फल पाई।।
तजि छल कपट और चतुराई। पूजहिं विविध भांति मन लाई।।
और हाल मैं कहौं बुझाई। जो यह पाठ करे मन लाई।।
ताको कोई कष्ट न होई। मन इच्छित फल पावै फल सोई।।
त्राहि- त्राहि जय दु:ख निवारिणी। त्रिविध ताप भव बंधन हारिणि।।
जो यह चालीसा पढ़े और पढ़ावे। इसे ध्यान लगाकर सुने सुनावै।।
ताको कोई न रोग सतावै। पुत्र आदि धन सम्पत्ति पावै।
पुत्र हीन और सम्पत्ति हीना। अन्धा बधिर कोढ़ी अति दीना।।
विप्र बोलाय कै पाठ करावै। शंका दिल में कभी न लावै।।
पाठ करावै दिन चालीसा। ता पर कृपा करैं गौरीसा।।
सुख सम्पत्ति बहुत सी पावै। कमी नहीं काहू की आवै।।
बारह मास करै जो पूजा। तेहि सम धन्य और नहिं दूजा।।
प्रतिदिन पाठ करै मन माहीं। उन सम कोई जग में नाहिं।।
बहु विधि क्या मैं करौं बड़ाई। लेय परीक्षा ध्यान लगाई।।
करि विश्वास करैं व्रत नेमा। होय सिद्ध उपजै उर प्रेमा।।
जय जय जय लक्ष्मी महारानी। सब में व्यापित जो गुण खानी।।
तुम्हरो तेज प्रबल जग माहीं। तुम सम कोउ दयाल कहूं नाहीं।।
मोहि अनाथ की सुधि अब लीजै। संकट काटि भक्ति मोहि दीजे।।
भूल चूक करी क्षमा हमारी। दर्शन दीजै दशा निहारी।।
बिन दरशन व्याकुल अधिकारी। तुमहिं अक्षत दु:ख सहते भारी।।
नहिं मोहिं ज्ञान बुद्धि है तन में। सब जानत हो अपने मन में।।
रूप चतुर्भुज करके धारण। कष्ट मोर अब करहु निवारण।।
कहि प्रकार मैं करौं बड़ाई। ज्ञान बुद्धि मोहिं नहिं अधिकाई।।
रामदास अब कहाई पुकारी। करो दूर तुम विपति हमारी।।

**दोहा**

त्राहि त्राहि दु:ख हारिणी हरो बेगि सब त्रास।
जयति जयति जय लक्ष्मी करो शत्रुन का नाश।।
रामदास धरि ध्यान नित विनय करत कर जोर।
मातु लक्ष्मी दास पर करहु दया की कोर।।

**।। इति लक्ष्मी चालीसा संपूर्णम।।**



# सुख शांती समाधान

**मराठी वर्षातील सर्वोत्तम मानला गेलेला मार्गशीर्ष महिना सुरू आहे. संकष्टी चतुर्थी हा सण गणेशाला समर्पित आहे. या दिवशी श्रीगणेशाची आराधना करून संकटांपासून मुक्ती आणि यशाची कामना केली जाते. श्रीगणेश हे बुद्धिमत्तेचे देवता आहेत. मार्गशीर्ष महिन्यातील संकष्ट चतुर्थी ७ डिसेंबर २०२५ रोजी आहे. रात्री चंद्राला अर्ध्य देऊन, पूजा करून उपवास सोडला जातो. गणेशाची शाश्वत भक्ती लाभण्यासाठी गणपती उपासक प्रत्येक महिन्यातील संकष्ट चतुर्थीला गणेशाचे व्रत करतात. गणपती बाप्पा हे आबालवृद्धांचे आराध्य दैवत! संकष्ट चतुर्थी हे व्रत कोणीही करू शकतो. प्रत्येक संकष्टीला गणेशभक्त आपापल्या परिने आणि पद्धतीने गणपती बाप्पाची पूजा करतात. गणेश व्रतांमध्ये संकष्ट चतुर्थीचे व्रत आचरल्यामुळे विघ्नहर्ता बाप्पा लवकर शुभफल देतो, अशी धारणा आहे.**

## संकष्टी चतुर्थीला बाप्पाला असे प्रसन्न करा...

मार्गशीर्ष संकष्टी चतुर्थी गणपतीच्या पूजेसह श्रीविष्णू आणि लक्ष्मी देवीचे विशेष पूजन करावे. नामस्मरण, स्तोत्र पठण, मंत्र जप करावा, असे सांगितले जाते. असे केल्याने गणेशासह लक्ष्मी नारायणाचेही शुभाशिर्वाद प्राप्त होऊ शकतील, असे म्हटले जाते.

चंद्रदर्शन घेऊन चंद्राला अर्ध्य द्यावे, संकष्ट चतुर्थीच्या दिवशी दिवसभर उपवास करावा. गणपती बाप्पाची षोडशोपचार पूजा करावी. शुद्ध पाण्याने गणपतीच्या मूर्तीला अभिषेक करावा. अभिषेक करतेवेळी अथर्वशीर्ष पाठ येत असल्यास २१ वेळा आवर्तन करावे, अन्यथा 'ॐ गं गणपतये नम:' या मंत्राचा १०८ वेळा जप करावा. यानंतर फुले अर्पण करावीत. धूप, दीप, नेवैद्य अर्पण करून गणेशाचे नामस्मरण करावे. प्रसाद ग्रहण करून त्याचे वाटप करावे. यानंतर रात्री चंद्रोदयाची वेळ पाहावी. धूप-दीप लावून गणपती बाप्पाला नैवेद्य दाखवावा. चंद्रदर्शन घेऊन चंद्राला अर्ध्य द्यावे आणि गणपतीची आरती म्हणून जास्वंदाची फुले आणि दूर्वा वाहून उपवास सोडावा. उपवास सोडताना गणपतीला आवडणारे लाडू, मोदक असे पदार्थ नेवैद्यासाठी केले जातात. अगदीच शक्य नसल्यास एकदातरी भक्तिभावाने अथर्वशीर्ष म्हणावे अथवा श्रवण करावे.

बाप्पाला एक गोष्ट अर्पण करा; पुण्यफल, अपार लाभ मिळवा.

या दिवशी २१ दुर्वांची जोडी अर्पण केल्याने गणपती प्रसन्न होतात आणि भक्तांना सुख-समृद्धी आणि बुद्धिप्रदान करतात, असे सांगितले जाते. धार्मिक पुराणांमध्ये गणपतीला बुद्धिची देवता मानले गेले आहे. दुर्वा अर्पण केल्याशिवाय गणपती बाप्पाची पूजा पूर्ण होत नाही आणि पूजेचे पुण्यही लाभत नाही, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते. गणपतीला प्रिय असलेल्या वस्तू अर्पण केल्याने बाप्पा प्रसन्न होतो, असे मानले जाते

गणाधिप संकष्टी चतुर्थीच्या दिवशी अडथळे दूर करणाऱ्या गणेशाची पूजा केली जाते. असे मानले जाते की, ज्या लोकांच्या लग्नाला उशीर होतो. अशा स्थितीत गणाधिप संकष्टी चतुर्थीच्या दिवशी काही उपाय केल्याने श्रीगणेश प्रसन्न होतात आणि व्यक्तीच्या विवाहाच्या मार्गात येणारे अडथळेही दूर होतात.

पंचांगानुसार मार्गशीर्ष महिन्यातील कृष्ण पक्षातील चतुर्थी तिथीला गणाधिप संकष्टी चतुर्थीचे व्रत केले जाते. या दिवशी गणेशाची पूजा केल्याने मनुष्याला सर्व प्रकारच्या संकटांपासून मुक्ती मिळते. याशिवाय जीवनात सुख-समृद्धीही येते. ज्योतिषशास्त्रानुसार जर एखाद्याच्या कुंडलीत बृहस्पति म्हणजेच गुरू आणि शुक्र कमजोर असतील. त्यांच्या वैवाहिक जीवनात अडथळे येतात. अशा स्थितीत संकष्टी चतुर्थीच्या दिवशी काही विशेष उपाय केल्यास लवकर विवाह होण्याची शक्यता असते.

संकष्टी चतुर्थीच्या दिवशी विधीनुसार गणेशाची पूजा करावी. यानंतर मोदक आणि दुर्वा अर्पण करा. यानंतर गणेश चालिसाचा पाठ करा आणि मंत्रांचा जप करा.



## शंख फुंकण्याचे फायदे बघा...

घरात शंख फुंकणे शुभ मानले जाते. शंख फुंकल्याने निर्माण होणाऱ्या ध्वनी लहरी तणाव कमी करतात आणि मानसिक शांती देतात. शंखाच्या नादाने सकारात्मक ऊर्जा पसरते आणि नकारात्मक ऊर्जा दूर होते असेही मानले जाते. दररोज शंख फुंकल्याने श्वास घेण्याची क्षमता सुधारते. हे थायरॉईड ग्रंथी आणि स्वरयंत्राचा देखील व्यायाम करते. जेव्हा आपण शंख वाजवतो तेव्हा आपल्या चेहऱ्याचे स्नायू ताणले जातात, ज्यामुळे सुरकुत्या कमी होतात. शंख शिंपल्यामध्ये १०० टक्के कॅल्शियम असते. रात्री शंख पाण्याने भरून ठेवा आणि सकाळी त्वचेवर मालिश करा. यामुळे त्वचेशी संबंधित आजार दूर होतात.



**टीप-** या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

# सावंतवाडीत तिलारी रिंग रोड कामाला धरणग्रस्तांचा विरोध

**मोबदला दिल्याशिवाय काम होऊ देणार नाही**

■ सावंतवाडी

**तिलारी** रिंग रोड प्रकल्पाला स्थानिक धरणग्रस्त शेतकऱ्यांकडून विरोध होत आहे.ज्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळालेला नाही किंवा जमीन संपादनामुळे ज्यांना विस्थापित व्हावे लागत आहे,असे प्रकल्पग्रस्त शेतकरी कामाला विरोध करीत आहेत. या शेतकऱ्यांच्या वतीने शिवसेना ठाकरे पक्षाचे सासोली विभागप्रमुख व पाटये ग्रामपंचायतीचे सदस्य भिवा गवस यांनी नुकतीच या प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले.

पाटये, पाल, सरगवे, आयनोडे या भागांतील शेतकरी आक्रमक झाले आहेत. जमीन संपादित होऊनही या शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळालेला नाही. धरणाच्या बुडीत क्षेत्रामुळे आधीच विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांच्या उर्वरित जमिनीवरून हा रिंग रोड जात असल्याने त्यांना पुन्हा विस्थापनाचा धोका आहे. त्यामुळे जोपर्यंत मोबदला मिळत नाही तोपर्यंत काम सुरू करू देणार नाही, असा इशारा या धरणग्रस्त शेतकऱ्यांनी या निवेदनातून दिला आहे. सध्या सरगवे, आयनोडे, पाल,पाटये,शिंरगे या गावातील धरणग्रस्त शेतकरी एकत्र येऊन आंदोलने करत आहेत. कृषी युवा क्रांती संघटना सारख्या संघटनांनीही याला पाठिंबा दिला आहे.

# आज मुलुंडमध्ये चौकुळ ग्रामस्थ संघटनेचा हिरकमहोत्सवी सोहळा

■ मुंबई

**सावंतवाडी** तालुक्यातील चौकुळ गावातील मुंबईस्थित ग्रामस्थांच्याचौकुळ ग्रामस्थ संघटना,मुंबई या संघटनेचा हिरकमहोत्सवी सोहळा उद्या रविवार ७ डिसेंबर रोजी आर.आर. सभागृह मुलुंड (पूर्व) येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे खासदार नारायण राणे, सावंतवाडी व दोडामार्ग विधानसभा आमदार दीपक केसरकर,खासदार संजय दिना पाटील, महाराष्ट्र प्रदेश भाजपा अध्यक्ष रवींद्र चव्हाण, कुडाळ मालवण विधानसभा आमदार निलेश राणे, कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे, मुलुंड पूर्वचे नगरसेवक प्रभाकर शिंदे, डॉ. नयन गावडे व डॉ. महेश गावडे, ॲड. भास्कर परब, डॉ.विलास जाधव आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# हापूसवरही गुजरातचा दावा! कोकणवासीयांचा विरोध

■ मुंबई

**कोकणातील** हापूस आंब्याला देशातच नव्हे तर परदेशातही मोठी मागणी आहे. २०१८ मध्ये या आंब्याला कोकण हापूस नावाने भौगोलिक मानांकन मिळाल्यापासून त्याची शुद्धता, बाजारभाव यांना अधिक बळ मिळाले. परंतु आता गुजरातमधून याला स्पर्धक निर्माण झाला आहे. गुजरातच्या वलसाड जिल्ह्याने वलसाड हापूस नावाने भौगोलिक मानांकन मिळण्यासाठी २०२३ साली गांधीनगर आणि नवसारी येथील विद्यापीठांत अर्ज दाखल केले होते. या प्रकरणी पहिली सुनावणी पार पडली. या दाव्याला कोकण आंबा उत्पादक व विक्रेते संघटनेचे अध्यक्ष डॉ. विवेक भिडे यांनी कडाडून विरोध केला. डॉ. विवेक भिडे यांनी दावा केला की, समुद्रकिनारी असलेल्या महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांमध्ये पिकणाऱ्या विशिष्ट दर्जाच्या आंब्यासाठी जगात कोकण हापूस या नावाने मिळालेले पहिले आणि एकमेव भौगोलिक मानांकन सध्या लागू आहे. या मानांकनामुळे कोकणातील शेतकऱ्यांना सुरक्षित बाजारपेठ आणि आर्थिक सुरक्षा मिळते. यामुळे कोकण हापूस म्हणून कोकणात न उगवलेला आंबा विकला जाण्याच्या घटना वाढल्या आहेत. कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडूतील आंब्यांची कोकण हापूस म्हणून विक्री होत असते. त्यामुळे अस्सल हापूस ओळखण्यासाठी क्यूआर कोडप्रणाली सुरू केली. परंतु बाजारात फसवणुकीची समस्या कायम आहे. अशा परिस्थितीत वलसाड हापूसला स्वतंत्र मानांकन मिळाल्यास बाजारात गोंधळ वाढेल आणि कोकणातील उत्पादकांचे आर्थिक नुकसान होण्याचा धोका वाढण्याची शक्यता आहे.

राज्याचे उद्योगमंत्री आणि शिंदेसेनेचे नेते उदय सामंत म्हणाले की, वलसाड आंबा बाजारात आला तरी देवगड किंवा रत्नागिरी हापूसची चव कमी होणार नाही. वलसाड किंवा अन्य कोणताही हापूस आला तरी आमच्या कोकण हापूसला कोणीही बाजूला करू शकत नाही. परंतु यावर गुजरातच्या आक्रमणाचा काय संबंध आहे ? जर वलसाड हापूस रत्नागिरीत आणून लावला तर आपण आक्रमण मान्य करू. यावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी चेतक घोड्याची आई गुजरातची असू शकते तर हापूस आंबा का असू शकत नाही? असा उपरोधिक टोला लगावला.

# नाशिक पालिका निवडणूक! उमेदवारांना मागितला ते जिवंत असल्याचा पुरावा

■ नाशिक

**नाशिकच्या** निवडणूक मतदार यादीत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आगामी नाशिक महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या दोन उमेदवारांना ते मृत झाले असल्याचे दाखविण्यात आले आहे. मतदार यादीत त्यांना चक्क कागदोपत्री मृत केले असल्याचा दावा या दोघांनी केला आहे. आपण जिवंत आहात याचा पुरावा म्हणून कोर्टाचा आदेश घेऊन या, मगच तुमचे नाव मतदारयादीत समाविष्ट केले जाईल, असा भंपक सल्ला एका निवडणूक अधिकाऱ्याने दिल्याने हे इच्छुक उमेदवार चक्रावून गेले आहेत. आगामी स्थानिक पालिका निवडणुका तोंडावर आल्या आहेत. निवडणुकीची तारीख कधीही जाहीर होऊ शकते.यासाठी इच्छुक उमेदवारांची धावपळ सुरू झाली आहे. अशातच मतदार यादीतील घोळामुळे इच्छुक उमेदवार चक्रावून गेले आहेत. इच्छुक उमेदवारांची नावेच मतदार यादीतून गायब झाली आहेत. त्यांनी याबाबत चौकशी केली असता त्यांना सांगण्यात आले की, तुम्ही मृत झाला असून तसा कागदोपत्री पुरावा असल्याने तुमचे नाव मतदारयादीतून वगळण्यात आले आहे. आता तुम्हाला तुमचे नाव पुन्हा मतदारयादीत समाविष्ट करायचे असेल तर तुम्ही जिवंत असल्याचा पुरावा कोर्टाच्या आदेशान्वये तुम्हीच सादर करा. त्यामुळे आता या इच्छुक उमेदवारांना न्यायालयाचा दरवाजा ठोठवावा लागणार आहे.

# उबाठामुळे मराठी माणूस हद्दपार राधाकृष्ण विखे यांचा आरोप

■ वसई

**उद्धव** ठाकरे यांची शिवसेना मराठी माणसाच्या नावावर राजकारण करत आहे. ठाकरे यांच्या शिवसेनेमुळेच मुंबईत मराठी माणूस विस्थापित होत आहे, असा आरोप राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला आहे.

नालासोपारा येथील एका खासगी गृहप्रकल्पाचा शुभारंभ आणि पदाधिकारी मेळाव्यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील शनिवारी शहरात येथे आले होते. या मेळाव्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला मुंबई भाईंदरमध्ये मराठी माणसाला मांसाहारी असल्याच्या कारणावरून घर नाकारले जात असल्याचे प्रकरण समोर आले आहे. त्याबाबत विचारले असता त्यांनी याला उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला जबाबदार धरले आहे. मुंबईमध्ये मराठी माणसाच्या नावावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने नेहमीच राजकारण केलेले आहे. त्यामुळे असे प्रकार होत आहेत. त्यामुळेच उद्धव ठाकरे यांच्या काळामध्ये मुंबईमधून मराठी माणूस हा हद्दपार होत गेला असा आरोप त्यांनी केला. महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेला लोक हद्दपार करतील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# कोल्हापूर-वैभववाडी रेल्वे मार्गाला गती द्या

■ कोल्हापूर

**धनंजय महाडिकांची मागणी**

**संसदेच्या** हिवाळी अधिवेशनाचा आज सहावा दिवस होता. आज भाजपा खासदार धनंजय महाडिक यांनी राज्यसभेत कोल्हापूर-वैभववाडी रेल्वे मार्गाला गती द्या, अशी मागणी केली. धनंजय महाडिक म्हणाले की, कोल्हापूर-वैभववाडी रेल्वे प्रकल्प २०१७ च्या रेल्वे बजेटमध्ये तत्कालीन रेल्वे मंत्री यांनी ३५० कोटींच्या तरतुदीसह मंजूर केला होता. या मंजूर प्रकल्पाचा विकास आराखडा तयार आहे. हा रेल्वे मार्ग पश्चिम महाराष्ट्राला कोकणाला जोडेल आणि भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यांना थेट रेल्वे मार्गाने जोडण्याचे काम करेल. हा प्रकल्प मालवाहतूक, संरक्षण क्षमता तसेच महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मी सरकारकडे विनंती करतो की, कोल्हापूर मिरर सेक्शनची डबलिंग व इलेक्ट्रिफिकेशन कामे लवकर मंजूर करून ती सुरू करावी.

# दुचाकी चोराला पुण्यातून अटक

**वसई** - दोन महिन्यात ८ दुचाकी चोरणाऱ्या एका आरोपीला माणिकपूर पोलिसांनी पुण्यातून अटक केली आहे. यासाठी तब्बल ६०० हून अधिक सीसीटीव्ही तपासत पोलिसांनी त्याचा माग काढला. मागील दोन महिन्यात वसईच्या विविध पोलीस ठाण्यात मोटार सायकली चोरीचे ८ गुन्हे दाखल होते. चोरीला गेलेल्या दुचाकींमध्ये स्प्लेंडर आणि बुलेट या दुचाकींचा समावेश होता. कसलाही पुरावा नसल्याने पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे तपास करायला सुरवात केली. पोलिसांनी ६०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत थेट पुणे गाठले. पुढे तांत्रिक तपास केल्यावर आरोपी अविराज गायकवाड (३१) याला पुण्यातून अटक केली. त्याने चोरलेल्या ७ स्प्लेंडर आणि १ बुलेट अशा ८ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या.

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given to the Public at Large that I, GORAKH GOVIND MEGH, I.A.S. (Retired), aged about 77 years, state & confirms that I am not in good relations with my Son Mr. Jitendra Megh and I further confirm that I am not in touch with him due constant mental stress & physical agony that he has caused me through various Court Cases, for the past several years. I am very much unhappy with him and have filed many Police Complaints for such over the period of time and want to keep my distance from him and live my life peacefully alongwith my lawfully wedded wife Dr. Mandakini Megh and for such want to give this Public Notice to inform People at Large of such facts as stated hereinabove.

**MR. GORAKH MEGH,**
R/o. A-502, "A" wing, 5th Floor,
Amaltas Bldg., Juhu Versova Link Road,
Andheri (w), Mumbai - 400053,
(M) 9821624808.

**फॉर्म जी**
**मुंबई, महाराष्ट्र येथे गुंतवणूक कंपनी म्हणून कार्यरत**
**फ्यूचर कॉर्पोरेट रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड**
**करिता स्वारस्य अभिव्यक्तीच्या आमंत्रणाचे शुद्धीपत्रक**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए च्या उप-विनियमन (१) अन्वये)

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व त्यासह पॅन क्र. | फ्यूचर कॉर्पोरेट रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड सीआयएन: U74140MH2007PTC175603 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | तळमजला, दुकान क्र. १, लक्ष्मी नारायण स्टेशनरी, प्रेम नगर, मेघवाडीसमोर, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई ४०००६०, महाराष्ट्र. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | - |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | ही कंपनी समूह गुंतवणूक कंपनी म्हणून कार्यरत होती आणि लॉयल्टी प्रोग्राम, मीडिया रिलीझ आणि टेलिकॉम टॉक-टाइम यासारख्या व्यावसायिक उपक्रमांमध्ये देखील गुंतलेली होती. अधिक तपशिलाकरिता irp.fcrpl@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | कंपनी कार्यरत नाही. |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/ सेवांचे परिमाण आणि मूल्य | शुन्य |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | शुन्य |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी, प्रक्रियेच्या पुढील घटनांकरिता संबंधित दिनांक समाविष्ट असलेले पुढील तपशील उपलब्ध असलेले यूआरएल | भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळाच्या (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए आणि विनियमन ३६बी(६ए) नुसार कॉर्पोरेट कर्जदाराच्या वगळलेल्या मालमत्तेव्यतिरिक्त सर्व मालमत्तेसाठी स्वारस्य अभिव्यक्ती आमंत्रित करण्यात येत आहे. अधिक तपशिलाकरिता irp.fcrpl@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असणारे यूआरएल: | ठराव व्यावसायिक नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम २९ए अन्वये पात्र असावेत. तपशिलवार ईओआय आणि पात्रता निकषांकरिता, irp.fcrpl@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांक: | दि. १० डिसेंबर, २०२५ (याआधीचा दि. ०३ डिसेंबर, २०२५) |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | दि. १३ डिसेंबर, २०२५ (याआधीचा दि. ०६ डिसेंबर, २०२५) |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. १८ डिसेंबर, २०२५ (याआधीचा दि. ११ डिसेंबर, २०२५) |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | दि. २० डिसेंबर, २०२५ (याआधीचा दि. १३ डिसेंबर, २०२५) |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | दि. २० डिसेंबर, २०२५ (याआधीचा दि. १३ डिसेंबर, २०२५) |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | दि. १८ जानेवारी, २०२६ (याआधीचा १२ जानेवारी, २०२६) |
| १६. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्याकरिता प्रक्रिया ईमेल आयडी | irp.fcrpl@aegisipe.com |

एजिस रिझोल्यूशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड
फ्यूचर कॉर्पोरेट रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेडचे ठराव व्यावसायिक म्हणून
प्राधिकृत स्वाक्षरीकार अविल मेनेझेस यांच्या द्वारे
नोंदणी क्र. IBBI/IPE-0118/IPA-1/2022-23/50041
अभिहस्तांकनाकरिता प्राधिकृतता दि. ३० जून, २०२६ पर्यंत वैध
पत्ता: १०६, कनाकिया ॲट्रियम २, क्रॉस रोड 'ए',
चकाला एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३.
ईमेल: irp.fcrpl@aegisipe.com, avil@caavil.com

दिनांक: ०७ डिसेंबर, २०२५
ठिकाण: मुंबई

देश विदेश

# मॉडेल दिव्या पाहुजा हत्या प्रकरण ! आरोपीला जामीन

■ नवी दिल्ली

**गुरुग्राम** मॉडेल दिव्या पाहुजाची २ जानेवारी २०२४ रोजी गुरुग्राममधील सिटी पॉईंट हॉटेलच्या खोली क्रमांक १११मध्ये गोळ्या झाडून हत्या केली होती. या हत्या प्रकरणाला आता दोन वर्षे होत आहेत. या प्रकरणातील आरोपी अभिजीतला न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. दिव्या पाहुजाची गोळ्या झाडून हत्या केल्याचा आरोप अभिजीतवर होता. अभिजीतच्या म्हणण्यानुसार दिव्याने ३० लाख रुपये आणि लेस्बियन पार्टनरची मागणी केल्यामुळे त्याने संतापात हत्या केली. त्यानंतर मित्रांच्या मदतीने मृतदेह कालव्यात टाकल्याचा दावा केला होता. परंतु न्यायालयात साक्षीसाठी उभे राहिलेल्या १५ पैकी ९ साक्षीदारांनी आपले पूर्वीचे जबाब बदलले, ज्यात दिव्याची आई आणि बहीण यांचा समावेश आहे. त्यांनी आपल्या विधानात पोलिसांनी सांगितल्याप्रमाणे जबाब देण्यास भाग पाडण्यात आल्याचा आरोप करताना हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज खरे नसल्याचा दावाही केला.हॉटेलच्या पाच कर्मचाऱ्यांनी दिव्या त्या दिवशी हॉटेलमध्ये आलीच नव्हती आणि पोलिसांनी दाखवलेले फुटेज हॉटेलचेच नाही, असा दावा केल्याने तपासावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दिव्याची बहीण नैना यांनी अभिजीतवर कोणताही संशय नसल्याचे स्पष्ट करताना बहिणीला धमक्या गँगस्टर संदीप गाडोलीच्या कुटुंबाकडून येत असल्याचे न्यायालयाला सांगितले. दिव्या पाहुजा गाडोली एन्काउंटर प्रकरणात आरोपी होती आणि त्यामुळेच तिचे शत्रुत्व वाढले होते, असे कुटुंबाचे मत आहे.

# अफगाणिस्तानला मागे टाकत म्यानमारने अफू उत्पादन वाढवले

■ नायपिडॉ

**अनेक** दशकांपर्यंत अफगाणिस्तान हा जगातील सर्वात मोठा अफू उत्पादक देश म्हणून ओळखला जात होता. मात्र गेल्या काही वर्षांतील राजकीय बदलांनंतर आणि २०२१ मध्ये तालिबानने अफूच्या लागवडीवर घातलेल्या कडक निर्बंधांनंतर तेथील उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली. या घटीनंतर जागतिक बेकायदेशीर अफू आणि हेरॉईन बाजारात निर्माण झालेली पोकळी आता भारताच्या शेजारील म्यानमारने भरून काढली. संयुक्त राष्ट्रांच्या ड्रग्ज आणि क्राईम ऑफिसच्या ताज्या अहवालानुसार, म्यानमारमध्ये अफू लागवडीखालील क्षेत्रात २०२४ च्या तुलनेत तब्बल १७ टक्के वाढ झाली.

# असीम मुनीरना अटक करा पेंटागॉनच्या माजी अधिकाऱ्याची मागणी

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** माजी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बूश यांच्या काळात संरक्षण मंत्रालयाचे मुख्यालय असलेल्या पेंटागॉनची जबाबदारी सांभाळणारे माजी अधिकारी मायकल रुबिन यांनी विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पाकिस्तानविषयक धोरणावर कडाडून टीका केली आहे. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर अमेरिकेत येताच त्यांना त्वरीत अटक करा, अशी मागणी रुबिन यांनी केली आहे. रुबिन म्हणाले की, पाकिस्तानशी मैत्रिपूर्ण संबंध राखण्यात काहीही अर्थ नाही. कारण तो देश दहशतवादाचा पुरस्कार करतो. अवघे जग दहशतवादाचा सामना करत आहे. रुबिन यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या पुढील वर्षी जून महिन्यातील नियोजित अमेरिका दौऱ्यालाही कडाडून विरोध केला. मुनीर यांचे स्वागत करण्याऐवजी ट्रम्प प्रशासनाने त्यांना तत्काळ अटक केली पाहिजे, असे रुबिन म्हणाले.

# गोव्यात भाजपा जिल्हा पंचायत निवडणुकीत ४० जागा लढविणार

येत्या दोन दिवसांत जाहीरनामा प्रकाशित

■ पणजी

**गोव्यात** भाजपा जिल्हा पंचायत निवडणुकीसाठी एकूण ५० पैकी ४० जागा स्वतः लढवणार असून उर्वरित १० जागा इतरांना देईल.त्यामुळे आणखी दोन उमेदवार पक्षाकडून जाहीर होण्याची शक्यता आहे.



मोरजी,कवळे आणि वेलिंग-प्रियोळ हे तीन मतदारसंघ महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला देण्यात आले आहेत. उर्वरित सात मतदारसंघांमध्ये भाजपा अपक्षांना पाठिंबा देणार आहे,अशी माहिती प्रदेश भाजपा अध्यक्ष दामू नाईक यांनी दिली. आतापर्यंत पक्षाने ३८ उमेदवार जाहीर केलेले आहेत. सत्तेत मित्रपक्ष असलेल्या मगोपला तीन जागा देण्याचे आधीच ठरलेले आहे. मगोपने हे जागावाटप मान्य केले आहे. भाजपाला दक्षिण गोव्यात काही ठिकाणी उमेदवार मिळवणे कठीण गेले. नुवे, बाणावली, वेळ्ळी, गिर्दोली व इतर तीन मिळून सात ठिकाणी भाजपा अपक्षांना पाठिंबा देण्याची शक्यता आहे.दरम्यान, दवर्ली मतदारसंघातून सत्यविजय नाईक (ओबीसी) आणि नावेली मतदारसंघातून लक्ष्मी बाबुराव शेटकर (महिला ओबीसी) यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

# चंद्राबाबूंच्या बायोपिकमध्ये सुपरस्टार शिवा राजकुमार?

■ अमरावती

**आंध्र** प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या जीवनावर आधारित चित्रपटात (बायोपिक) कन्नड सुपरस्टार शिवा राजकुमार चंद्राबाबूंची व्यक्तिरेखा साकारणार, अशी चर्चा राजकीय आणि चित्रपट वर्तुळात गेले काही दिवस सुरू आहे. याबाबत शिवा राजकुमार याला माध्यमांच्या प्रतिनिधीने विचारले असता होकारार्थी संकेत दिले. सुपरस्टार राजकुमार आपली गीतासोबत पहिल्यांदाच विजयवाडातील इंद्रकिलाद्री येथील सुप्रसिध्द कनक दुर्गा मंदिरात दर्शनासाठी आला होता. त्यावेळी माध्यमांशी बोलताना त्याने चंद्राबाबूंच्या बायोपिकमध्ये काम करण्याची ऑफर आली आहे, असे सांगितले.

# इम्रान खान मानसिक आजारी! पाकिस्तानी लष्कराचा दावा

■ कराची

आदियाला तुरुंगात असलेले पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना पाकिस्तानी लष्कराने 'मानसिकदृष्ट्या आजारी' घोषित केले. याबाबत लष्कराच्या प्रवक्त्याने निवेदन जारी केले, ज्यामध्ये त्यांनी म्हटले की, इम्रान खान आता मानसिकरित्या आजारी आहेत. ते जी विधाने करत आहेत ते सर्वकाही देशविरोधी आहे. ते देशद्रोही लोकांची भाषा बोलू लागले आहेत. इम्रान खान तुरुंगातून नागरिकांना सैन्याविरुद्ध भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण हे आता सहन केले जाणार नाही.

लष्कराचे प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले की, इम्रान खान देशविरोधी भाषा बोलत आहेत. ते प्रत्येक वक्तव्यात शेख मुजीबुर रहमान यांचे



नाव घेत आहेत. हा देशाशी विश्वासघात आहे. १९७१ मध्ये पाकिस्तानची फाळणी मुजीबुर रहमान यांनीच केली होती. त्यांचा उल्लेख करणे देशविरोधी आहे. इम्रान खान आणि त्यांची बहीण उज्मा यांच्या भेटीनंतर अवघ्या तीन दिवसांतच इम्रान यांना 'वेडा' घोषित करण्यात आले. भावाला भेटल्यानंतर उज्मा यांनी त्यांना पूर्णपणे निरोगी असल्याचे म्हटले होते. मग प्रश्न असा आहे की, इम्रान खान अवघ्या तीन दिवसांत मानसिकरित्या आजारी कसे झाले? असा सवाल विचारला जात आहे.

# डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी समिती स्थापन

■ सातारा

**फलटण** तालुक्यातील महिला डॉक्टर संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणात राज्य शासनाने निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती गठित केली आहे.

फलटण येथील वैद्यकीय रुग्णालयातील महिला डॉक्टर संपदा मुंडे आत्महत्याप्रकरणी संशयित आरोपी बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक गोपाल बाळासाहेब बदने (रा. चांदापूर, ता. परळी,जि.बीड) व प्रशांत किसन बनकर (रा.बनकर निवास लक्ष्मीनगर, फलटण) हे दोघेही संशयित न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने यापूर्वी राज्य राखीव दलाच्या समादेशक तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक स्थापन केले आहे. राज्यातील विरोधी पक्ष,विविध सामाजिक संस्था व नातेवाईकांकडून निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत होती. त्यानुसार शासनाने निवृत्त न्या. संजय मेहरे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे.

# इचलकरंजीत नागरिकांना दुर्गंधीयुक्त दूषित पाणीपुरवठा

**इचलकरंजी** - मागील दोन महिन्यांपासून शहरातील जवाहर नगरातील स्वामी कारखाना परिसरात नळांना दुर्गंधीयुक्त दूषित पाणी येत आहे.त्यामुळे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन हा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल,असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे. शहरातील जवाहर नगरमधील स्वामी कारखाना परिसरात नळाला काळपट रंगाचे दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे.हा प्रकार गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असून याबाबत या परिसरातील नागरिकांनी पालिकेच्या अधिकार्यांकडे अनेकदा तक्रारी केल्या.

# शिवसेना-राष्ट्रवादी भाजपाच्या ताटाखालचे मांजर! वडेट्टीवारांची टीका

■ मुंबई

**मुंबईत** भाजपाचा महापौर झाला तर सर्वांची कॉलर टाईट होईल, असे मंगलप्रभात लोढा म्हणाले होते. यावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, आता अजित पवार गट आणि शिंदे गट हे दोन्ही पक्ष भाजपाच्या ताटाखालचे मांजर बनले आहेत. भाजपा जे सांगेल त्याप्रमाणे हे दोन्ही पक्ष वागतात. वडेट्टीवार पुढे म्हणाले की, भाजपाला आता कोणी थांबवू शकत नाही, पण अति तिथे माती हे विसरू नये. मुंबईच्या महापौरपदावर त्यांना भाजपाचाच प्रतिनिधी बसवायचा आहे. हा वरून आलेला आदेश आहे.



कारण मुंबई ही देशातील आर्थिक राजधानी आहे. येथे जमिनीची किंमत दीड लाख रुपये प्रति स्क्वेअर फूट आहे. अशा परिस्थितीत मुंबईवर ताबा गमावणे भाजपाला परवडणारे नाही, म्हणून दिल्लीतील आकांचा आदेश आहे की, कोणत्याही परिस्थितीत मुंबईचा महापौर भाजपाचाच करायचा.ते पुढे म्हणाले की, त्र्यंबकेश्वर येथे निवडणुकांत एका मतासाठी ५० हजार रुपये मोजले गेले. एका मतासाठी एवढी किंमत देणारा पक्ष हा देश किती लुटला असेल हे कळते. सत्ता मिळवण्यासाठी कोणत्याही थराला जायचे, पुन्हा सत्ता मिळवून पैसे लाटायचे आणि देश खिळखिळा करायचा हे प्रकार करून त्यांनी सामाजिक व्यवस्था बिघडवून टाकली आहे.

# मुंबई-ठाणे मेट्रो-४ मार्गाचे ३१ डिसेंबरपर्यंत लोकार्पण

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

■ ठाणे

**वडाळा,** घाटकोपर, गायमुख ठाणे या मुंबई मेट्रो- ४ प्रकल्पाचे लोकार्पण ३१ डिसेंबरपर्यंत करण्याचे नियोजन आहे,अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.यामुळे ठाणे आणि मुंबईतील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एमएमआरडीए,पालिका आणि इतर अधिकाऱ्यांची ओवळा-माजिवडा मतदारसंघातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी एक विशेष बैठक बोलावली होती. या बैठकीत सरनाईक यांनी ही माहिती दिली. मेट्रो-४ हा मार्ग मुंबईहून तीनहात नाका मार्गे घोडबंदरला जोडण्यात आला आहे. मेट्रोच्या कामामुळे दररोज घोडबंदर महामार्गावर वाहतूक कोंडी होत असून या कोंडीमुळे नागरिक अतिशय त्रस्त झाले आहेत.

# विद्यार्थ्यांनी हात दाखवूनही एसटी न थांबल्यास कारवाई

■ सोलापूर

**एसटी** महामंडळाच्या साध्या, मध्यम व लांब पल्ल्याच्या बसमधूनही शालेय विद्यार्थी प्रवास करू शकणार आहेत. याशिवाय शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी हात दाखवूनही गाडी न थांबल्यास विद्यार्थी १८००२२१२५१ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधू शकतील. तक्रारीची खात्री करून संबंधित चालक, वाहक व आगारप्रमुखांवर कारवाई केली जाणार आहे.

परिवहन महामंडळाने १५ दिवसांपूर्वी शालेय विद्यार्थ्यांसाठी खास हेल्पलाईन



उपलब्ध करून दिली होती. त्यावर राज्यभरातून ३३४ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यात सर्वाधिक ५२ तक्रारी सोलापूर विभागातून प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये वेळेवर बस येत नाही, हात दाखवला तर बस थांबत नाहीत, थांबा असूनही त्याठिकाणी बस थांबत नाही, अशा तक्रारींचा समावेश आहे. तसेच शालेय पास असूनही विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारला जातो, अशाही तक्रारी आहेत. या तक्रारींची गंभीर दखल परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतली आहे. तक्रारींच्या अनुषंगाने लवकर कार्यवाही तथा सुधारणा करावी. अन्यथा शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्यास संबंधित आगार व्यवस्थापक व पर्यवेक्षकांना निलंबित करण्यात येईल, असेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी म्हटले आहे.

# सांगली महापालिका ताफ्यातील सर्व वाहनांना जीपीएस बसवणार

■ सांगली

**सांगली** महापालिकेच्या ताफ्यातील सर्व २७५ वाहनांना अत्याधुनिक जीपीएस प्रणालीखाली आणण्याचे काम सुरू आहे. घंटागाडी, जेसीबी, पाणी टँकर्स, अग्निशमन वाहने ते अधिकाऱ्यांची वाहने या सर्वांना जीपीएस प्रणालीखाली आणले जात आहे. कचरा संकलन वाहनांचे लाईव्ह ट्रॅकिंग नागरिकांना पाहता येणार आहे. आयुक्त सत्यम गांधी यांच्या निर्देशानुसार महापालिकेच्या सर्व वाहनांना जीपीएस प्रणाली बसवली जात आहे. ई-गव्हर्नन्स, घनकचरा व्यवस्थापन सुधारणा आणि माझी वसुंधरा अभियानांतर्गत एक अत्यंत महत्त्वाकांक्षी निर्णय कार्यान्वित केला जात आहे. ही प्रणाली म्हणजे पालिकेच्या डिजिटल गव्हर्नन्समधील एक मोठी झेप आहे.

# डुक्कर समजून सहकाऱ्याची 'शिकार'! तरुण जागीच ठार

■ सावंतवाडी

**तालुक्यातील** ओवळीये येथील जंगलात डुकराची शिकार करताना एक अतिशय दुर्दैवी घटना घडली. एका शिकारी तरुणाने डुक्कर समजून झाडलेली बंदुकीची गोळी त्याच्या सहकाऱ्याला लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. मृत तरुणाचे नाव सचिन सुभाष मर्गज (२८) असे असून तो मर्गज वाडी वेर्ले येथील रहिवासी होता. पाच ते सहा तरुण काल सकाळी ओवळीये येथील जंगलात डुकराची शिकार करण्यासाठी गेले होते. त्यावेळी डुक्कर हाकवण्यासाठी रान काढत असतानाच अचानक डुकराच्या पावलांचा आवाज आला. त्यामुळे कोलगाव येथील शिप्रियान डॉन्टस नावाच्या तरुणाने त्या पावलांच्या आवाजाच्या दिशेने त्याच्याकडील बंदुकीतून गोळी झाडली. मात्र ती गोळी सचिन मर्गजला लागली आणि तो जागीच मरण पावला. त्याच्या हनुवटी, छाती आणि तोंडाला छरे लागले होते. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला व शिप्रियान डॉन्टस याला ताब्यात घेतले.

# दादर स्थानक नामांतरासाठी भीम आर्मीचे आंदोलन

■ मुंबई

**दादर** रेल्वे स्थानकाचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी टर्मिनस असे करावे, या प्रमुख मागणीसाठी आज भीम आर्मीचे राष्ट्रीय महासचिव अशोक कांबळे यांच्या नेतृत्वाखाली दादर येथे शांतीपूर्ण आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात आझाद समाज पार्टीचे कार्यकर्ते ही सहभागी झाले होते.

या आंदोलनासाठी दादर पूर्व स्वामीनारायण मंदिरासमोर दुपारी मोठ्या संख्येने भीमसैनिक उपस्थित होते. या ऐतिहासिक मागणीला पाठिंबा द्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# चेंबूरच्या आंबेडकर उद्यानात 'अखंड भीमज्योत' अर्पण

■ मुंबई

**महापरिनिर्वाण** दिनाच्या पूर्वसंध्येला चेंबूरच्या आंबेडकर उद्यानात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीला अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते समतेच्या विचारांची प्रेरणा देणारी 'अखंड तेवणारी भीमज्योत' महामानवाच्या स्मृतीला अर्पण करण्यात आली. काही वर्षांपासून परिसरातील आंबेडकरी अनुयायांनी केलेल्या मागणीनुसार माजी खासदार राहुल शेवाळे यांच्या संकल्पनेतून आणि नगरविकास विभागाच्या विशेष निधीतून ही भीमज्योत साकारण्यात आली.

यावेळी उपमुख्यमंत्र्यांसह रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर,माजी खासदार राहुल शेवाळे, स्थानिक आमदार तुकाराम काते, विभागप्रमुख अविनाश राणे,महिला विभागप्रमुख सुनीता वैती,विभागप्रमुख भास्कर शेट्टी,माजी नगरसेविका पुष्पा कोळी,अंजली नाईक, समृद्धी काते, संजय राठोड,सचिन यादव आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

समतेच्या विचारांची प्रेरणा देणारी अखंड भीमज्योत ही सुमारे ११ फूट उंच शुभ्र मार्बलच्या स्तंभावर उभारण्यात आली आहे. पंचधातूमध्ये घडविण्यात आलेल्या अडीच फूट ज्योतीच्या बाजूने सुमारे साडेतीन फुटांचे काचेचे आवरण आहे. भीमज्योतीची स्तंभासह एकूण उंची सुमारे १४ फूट आहे.महानगर गॅस कंपनीच्या पाईप गॅसच्या अविरत पुरवठ्याने भीमज्योत अखंड प्रज्वलित राहणार आहे.

# सारंगखेडा घोडे बाजारात २१ लाखांचा 'बाबा'

■ नंदुरबार

**शहादा** तालुक्यातील सारंगखेडा येथील चेतक महोत्सवात सध्या २१ लाख रुपये किमतीच्या बाबा घोड्याची चर्चा आहे. अवघ्या चार वर्षांच्या या घोड्याची ५ फूट ६१ इंच उंची आहे. त्याच्या शरीरावर एकही काळा डाग नाही. कमी वयात अधिक उंची असल्याने त्याची किंमत अधिक असल्याचे सांगितले जात आहे.

'बाबा' या देखण्या घोड्याच्या आहारात चणे, काजू, बदाम यांसारख्या पौष्टिक पदार्थांचा समावेश असतो. त्याच्या देखभालीसाठी पाच जणांची टीम तैनात असते.

# बाबा आढाव रुग्णालयात! शरद पवारांनी भेट घेतली

■ पुणे

**ज्येष्ठ** समाजसेवक प्रमुख डॉ. बाबा आढाव यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना पुण्यातील पुना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. गेल्या दहा दिवसांपासून तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आले असून प्रकृतीत चढ-उतार सुरू आहेत. त्यांच्या तब्येतीबाबत माहिती मिळाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आज रुग्णालयात गेले. त्यांनी



वैद्यकीय पथकाकडून संपूर्ण माहिती घेतली आणि कुटुंबाशी संवाद साधून धीर दिला. पवारांनी डॉक्टरांशी चर्चा करून उपचाराची प्रगती जाणून घेतली आणि गरज भासल्यास अधिक मदतीचे आश्वासन दिले. सामाजिक चळवळीतील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व असणाऱ्या बाबा आढाव यांच्या प्रकृतीबाबत अनेक नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि कामगार संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे.

# बागलाणतील ग्रामपंचायतींच्या ८५ सदस्यांना अपात्र ठरवले

■ नाशिक


**नाशिकच्या** बागलाण तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या तब्बल ८५ सदस्यांना अपात्र ठरविण्याचा धडक निर्णय अपर जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याने तालुक्यात खळबळ माजली आहे. विविध पक्षांच्या ३६ ग्रामपंचायतींमध्ये १ ते ९ सदस्यांपर्यंत मिळून एकूण ८५ सदस्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे. २०२१ च्या ग्रामपंचायत निवडणुकीत या सदस्यांनी आरक्षणाचा लाभ घेत निवडणूक लढवली होती, परंतु विजयानंतर १२ महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असतानाही अनेकांनी प्रमाणपत्र सादर केले नव्हते. त्यानंतर शासनाने १० जुलै २०२३ च्या अध्यादेशानुसार पुन्हा १२ महिन्यांची मुदतवाढ दिली. मात्र ही अंतिम मुदत ९ जुलै २०२४ रोजी संपली. निर्धारित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात अपयश आल्याने अपर

# सरकारच्या हातातील कठपुतळी बनू नका खा. प्रियंका चतुर्वेदींचा राष्ट्रपतींना सल्ला

■ मुंबई

**उबाठाच्या** खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहून भारतीय लोकशाहीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या पत्रातून सत्ताधारी भाजपाप्रणीत एनडीए सरकारवर जोरदार टीका करताना त्यांनी राष्ट्रपतींना सरकारच्या हातातील कठपुतळी न होण्याचा सल्ला दिला आहे. प्रियंका चतुर्वेदी यांनी पत्रात म्हटले आहे की, लोकशाहीत सत्ताधारी व विरोधक या दोन्ही अंगांची भूमिका समान महत्त्वाची आहे आणि घटनात्मक तत्वे जपणे हे राष्ट्रपतींचे दायित्व आहे. परंतु, रशियन अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांच्या भारत दौऱ्याच्या सन्मानार्थ राष्ट्रपती भवनात आयोजित स्नेहभोजनात विरोधी पक्षनेत्यासह इतर अनेक पक्षाच्या नेत्यांना निमंत्रित न करणे ही लोकशाहीसाठी दुर्दैवी बाब आहे. सरकारने विरोधकांना दूर ठेवण्यासाठी ही परंपरा मोडली आहे. राष्ट्रपती हे पद फक्त सत्ताधारी पक्षाचे नसून संपूर्ण देशाचे व संविधानाचे सर्वोच्च प्रतीक आहे. परदेशी पाहुण्यांच्या स्वागतासाठी आयोजित केलेले राजकीय भोजन सर्वपक्षीय असते. विरोधी पक्षनेत्यांना निमंत्रण देणे ही अनेक दशकांपासून चालत आलेली परंपरा आहे आणि ती मोडणे लोकशाहीसाठी खीळ बसवण्यासारखे आहे. सरकारच्या विरोधकांकडे दुर्लक्ष करून विरोधकांना सरकारी कार्यक्रमांपासून वंचित ठेवणे लोकशाहीच्या मूळ तत्त्वांविरुद्ध आहे आणि त्यामुळे राष्ट्रपतींनी सत्ताधारी पक्षाची कठपुतळी बनू नये.

# नवाकाळ शब्दकोडे-१४५३



**आडवे शब्द –**

२. कुस्तीगीर ६. धुके ८. दयनीय, दीनवाणा ११. सारांश १२. पंख असलेला निशाचर सस्तन प्राणी १३. सीतेला वाचवताना रावणाकडून मारला गेलेला पक्षी १४. कंठ १५. ज्ञात १७. कलावंतीण १९. चांदी २२. मैत्रीण, सखी २४. घरगुती शीतपेय २६. लबाड, लुच्चा २८. खोबण २९. ब्रह्मचारी ३१. थाटामाटात, मिरवणुकीने ३५. पती, नवरा ३६. चटकन प्रत्युत्तर देणारा ३९. करवंटी ४१. झावळीच्या पातीतील काडी ४३. पुस्तकाचे पृष्ठ ४४. लोभी ४६. शरीर सुदृढ ठेवण्याचा मार्ग ४८. शशी, चंद्र ५०. घसट ५२. सत्पुरुषांच्या देहत्यागाच्या जागी बांधलेले मंदिर किंवा चौथरा ५४. श्वासोच्छ्वासासाठी आवश्यक ५६. एकाएकी ५७. चार दिशांपैकी एक ५८. शक्यता ५९. मथळा, हेडलाईन ६०. वाहनांची जा ये, वाहतूक ६१. अर्थात ६३. भरतीची वेळ ६५. सुळका ६६. प्रहार, आघात ६८. घोडा ६९. जखमेतून वाहणारे रक्त ७०. भरपूर, विपुल ७२. शासक, शास्ता ७५. साधर्म्य ७६. ताकाचे पूर्वरूप ७७. धाक, भीती ७८. अंकित ७९. अगदी किंचित ८१. धुंदी, कैफ ८२. दलदलीची जागा ८४. कोपरा ८५. सरपण विक्रीचे दुकान ८७. दासी ८९. दुष्कृत्य ९०. याप्रमाणे ९१. छाया ९३. विशेष ९५. सीता, वैदेही ९७. काटकी ९८. तीन बाजूंना जमीन असलेला समुद्र ९९. हाताचे करंगळीजवळचे बोट १०१. नवरदेव १०२. अरेरावी, रगेलपणा १०३. ठोक, चोप १०४. अमान्य १०५. तीक्ष्ण १०६. गायीचे पिल्लू १०७. लष्कर १०८. शुष्कता १०९. नियंत्रण ११०. सत्याचा अंश

**उभे शब्द –**

१. विजेच्या दिव्यांची सजावट २. पोळीचा अमराठी प्रकार ३. अपेक्षेपेक्षा कमी वेळात ४. मार्ग ५. नुकताच आलेला ६. हलाहल पचवलेला महादेव ७. रात्र, निशा ८. बाजूबंद, वाकी ९. शेजारी, लागून असलेले १०. हिरव्या रंगाचे एक सरबत, खस १६. इक्षुदंड १८. रात्री रानात दिशाभूल होऊन वाट न सापडणे २०. सागरी प्रवासाचे एक वाहन २१. वनवासात असताना राम-लक्ष्मण-सीता नाशिकमधल्या या ठिकाणी राहिले होते २२. याची खिचडी उपवासाला चालते २३. त्वरित, ताबडतोब, लगेच २५. सुन्न, निःशब्द झालेला २७. ऐकलेले ३०. रानात पसरलेली आग ३२. घोळका, झुंड ३३. धेनू ३४. मुलगी, पुत्री ३७. गावाचा वार्षिक उत्सव ३८. जास्वंदीचे फूल ४०. चित्तथरारक, रोमांचकारी ४२. सूर्याचे किरण ४४. बाजार, मंडई ४५. गर्दभ, गाढव ४६. आजार, रोग ४७. आमंत्रण ४९. शेला, उपरणे ५१. हलगर्जीपणा, नजरचूक ५३. मावशीची कन्या ५५. वेड्यावाकड्या आकाराचा ५७. गणित, नमुना ५८. भक्तिमार्गाची शिकवण देणारे सत्पुरुष ६१. माफी नसलेला गुन्हा ६२. हनुमान, मारुती ६४. वस्तू, जिन्नस ६६. रागावणे, रागे भरणे ६७. खोकला, काष्टा, जनावराची ओटी ७०. स्वयंपाक करण्याची खोली ७१. अन्नाचा घास ७३. वर्तमानपत्रातला स्तंभ ७४. टेंभा ७५. पुन्हा पुन्हा ८०. संसाररूपी समुद्र ८३. चकित झालेला ८४. अवकृपा ८६. पृथ्वी, वसुधा ८८. निरंतर, सतत ८९. गोजी, कालवड ९०. असाधारण, लोकोत्तर ९२. अवांतर, बाकीचे ९४. यज्ञातील पवित्र इंधन ९६. राघू, पोपट ९७. पाण्याचा ओढा, नहर ९८. उत्कट इच्छा ९९. कुबेराची राजधानी १००. खुरासनी, याची चटणी करतात. १०२. शिक्षक १०४. स्त्री, महिला •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४५२ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. दुबार ४. असहाय ७. अंबारी ९. कालव १३. तोंडवळा १४. मर्दुमकी १६. चांगदेव १७. सागवान १९. धडपड २१. दीडदमडीचा २२. मंदाकिनी २४. नकार २६. तृप्ती २७. चरण २८. भुसभुशीत ३०. अनुमती ३३. भाक ३४. किमया ३६. रबडी ३७. पाश ३८. रजक ४०. सणवार ४१. बक ४३. किसान ४५. बडबड ४८. मचाण ५०. नवथर ५१. लकब ५३. ठपका ५५. ददात ५७. दरारा ५८. डागाळलेला ५९. धोशा ६१. नमक ६३. दोस्ती ६४. मध्ये ६६. कप ६७. आरव ६८. ठीक ६९. बिऱ्हाड ७१. यकृत ७४. टणक ७५. दाखला ७७. कायमचा ८०. पारवा ८१. दैव ८४. पर्ण ८६. लगाम ८८. संगमरवर ९१. बाल्य ९२. झोत ९३. तास ९५. तव ९६. टाक ९७. कव ९८. अपलाप १००. ध्यास १०३. गहाळ १०५. रवळनाथ १०६. वडवा १०८. धवल १०९. सवाल ११०. खवचट १११. वाटा ११२. शीलवान

**उभे शब्द** : १. दुतोंडी २. बाड ३. रवसड ५. सवंगडी ६. यमन ७. अंमलदार ८. बाकी १०. लचांड ११. वग १२. अवसर १५. झुंड १७. सामसूम १८. वाचाळ १९. धनी २०. परस २१. दीप्ती २२. मंचक २३. किणकिण २४. नशीब २५. कातडीबचाऊ धोरण २६. तृणपाते २८. भुयार २९. भुरळ ३१. नुकसान ३२. तीर ३३. भाकड ३५. मवाळ ३९. जबरदस्ती ४०. सडक ४२. कण ४४. नवरा ४६. बलराम ४७. आपलेपणा ४९. सदानकदा ५२. बडा ५३. ठळक ५४. काला ५६. तम ६०. शावक ६२. कबिला ६३. दोडका ६५. ध्येय ६७. आटवल ७०. जोम ७२. कृपा ७३. तरणतलाव ७६. खतम ७८. यक्ष ७९. चापल्य ८२. वसंत ८३. कवक ८५. माता ८७. गाल ८९. गवगवा ९०. रटाळ ९१. बावळट ९२. झोत ९४. सध्या ९७. कवच ९८. अथवा ९९. पडशी १०१. सधन १०२. शालक १०४. हाल १०५. रव १०७. वाल




# राशिभविष्य

**रविवार ७ डिसेंबर, २०२५ ते शनिवार १३ डिसेंबर २०२५**

## मेष

**आठवड्याची** सुरुवात व उत्तरार्ध चांगला जाईल. कामामध्ये येणारे अडथळे हळूहळू थोडे कमी होतील. आर्थिक स्थितीचा विचार करता आवक चांगली राहील. परंतु खर्च वाढल्यामुळे चिंता राहील. चुकीच्या व्यक्ती, चुकीचा सल्ला यापासून लांब राहा. तुम्ही करत असलेल्या कष्टाला भाग्याची साथ मिळेल. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक सावधगिरीने करावी. घरातील वातावरण संमिश्र राहील. मतभेद तीव्र होऊ नयेत यासाठी बोलण्यावर नियंत्रण ठेवा. विवाहाची बोलणी पुढे सरकतील. मुलांबरोबर वेळ घालवून त्यांचे प्रश्न समजावून घ्याल. कुटुंबाबरोबर केलेल्या धार्मिक यात्रा समाधान देतील.

कार्यक्षेत्रात प्रतिकूलता असली तरी तुमचा उत्साह व धडाडी कायम ठेवा. प्रतिस्पर्धी व हितशत्रूंवर बुद्धीचातुर्याने मात करू शकाल. भांडवल उभे करण्यासाठी जास्त प्रयत्न करावे लागतील. कर्ज हवे असल्यास त्यासाठीचे प्रयत्न यशस्वी ठरतील. कायदेशीर सल्ला जरूर घ्या. जुनी येणी वसूल होतील. प्रवासात काळजी घ्यावी. संशोधन, वैद्यकीय व्यवसाय, पर्यटन, डिजिटल मार्केटिंग, कायदेतज्ज्ञ, सीए यांच्यासाठी योग्य काळ आहे.

पित्तविकार, श्वसनविकार, डोकेदुखी, मधुमेह, मूत्रविकार या आरोग्याच्या तक्रारी दुर्लक्षित करू नये.
**शुभ दिनांक :** ७, १२, १३.

## वृषभ

**संमिश्र** ग्रहमान असलेला हा आठवडा आहे. विचारपूर्वक पण तातडीने निर्णय घ्या व कृतीला प्राधान्य द्या. परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल करण्याची तयारी ठेवावी. आर्थिक स्थितीबाबत थोडी चिंता राहील. आवक चांगली राहील. परंतु खर्चावर नियंत्रण ठेवा. क्षमतेचा विचार करून कार्य हाती घ्यावे. दुसऱ्यावर अवलंबून राहता येणार नाही. कौटुंबिक संपत्तीबाबत काही समस्या असतील तर त्यातून मार्ग निघेल. तुम्ही पुढाकार घेऊन इतरांना मार्गदर्शन कराल. बोलण्यातील आक्रमकता नियंत्रणात ठेवावी. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. परंतु त्याचे वर्चस्व मान्य करावे. संततीशी सुसंवाद ठेवा.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन प्रशिक्षण घेतल्यास उपयोगी पडेल. व्यावसायिकांना भांडवल उभे करताना अडचणी येतील. विरोधकांवर लक्ष ठेवा. राजकीय व सामाजिक क्षेत्र, भागीदारीतील व्यवसाय, प्रशासकीय अधिकारी, तंत्रज्ञ, खेळाडू, खाद्यपदार्थ, घाऊक व्यापारी यांच्यासाठी चांगला काळ आहे.

श्वसन विकार, मूत्रविकार, हार्मोन्स, मधुमेह, उष्णतेचे विकार, थायरॉईड यासारख्या आरोग्याच्या तक्रारींकडे लक्ष द्यावे.
**शुभ दिनांक :** ८, ९, १२.

## मिथुन

या आठवड्यात सुरुवात चांगली होईल व पुढे चढ-उतार राहतील. विनाकारण चिंता करण्याऐवजी आर्थिक आवक व खर्च याची सांगड घालावी लागेल. अतिविचार व द्विधा मनस्थिती यामुळे नियोजित कार्यास उशीर होऊ शकतो. अनुभवी व्यक्तीचा सल्ला उपयोगी पडेल. विचारांना योग्य दिशा देऊन कामाची गती वाढवावी लागेल. घरातील ज्येष्ठांच्या, मातेच्या आरोग्याची काळजी घ्यावी. भावंडांबरोबर व्यवहार करताना भावनाशील होऊ नका. संततीकडे लक्ष द्यावे. जोडीदाराच्या मदतीने प्रश्न मार्गी लावू शकाल.

कार्यक्षेत्रामध्ये शक्य असेल तिथे स्पर्धकांना टाळून कामावर लक्ष केंद्रित करा. त्यामुळे तुमची क्षमता पूर्णपणे कामासाठी वापरता येईल. भागीदारीतील व्यवसाय नव्याने सुरू करू नका. जुना प्रकल्प पुन्हा सुरू होऊ शकतो. रेंगाळलेली कर्जप्रकरणे मार्गी लागतील. संवादकौशल्य, मास मीडिया, विदेशी क्षेत्र, वैद्यकीय व्यवसाय, रसायन, जमीन, आयटी या क्षेत्रासंबंधित व्यक्तींना यश मिळेल. आरोग्याच्या तक्रारींमुळे कामात अडथळे येणार नाही यासाठी त्वरित उपाययोजना करा. कमी प्रतिकारशक्ती, मधुमेह, मूत्रविकार, उष्णतेचे विकार याकडे दुर्लक्ष करू नका.
**शुभ दिनांक :** ७, ११, १२.

## कर्क

**भावनेवर** नियंत्रण ठेवल्यास संमिश्र ग्रहमान असलेला हा आठवडा तुम्हाला अपेक्षित यश देईल. आत्मविश्वास कायम राखून तुमच्या क्षमतेचा पूर्ण वापर करा. नवीन प्रयोग सध्या टाळणे योग्य ठरेल. आर्थिक उलाढालीमध्ये पूर्ण सावधगिरी बाळगावी. कुटुंबाच्या हितासाठी अलिप्त धोरण ठेवून व्यावहारिक निर्णय घेणे योग्य ठरेल. जोडीदाराची साथ व त्याचा सल्ला उपयोगी ठरेल. प्रिय व्यक्ती, मित्रांबरोबर आनंदात वेळ घालवाल. मुलांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी वाढणाऱ्या खर्चाचा विचार करून ठेवा.

कार्यक्षेत्रामध्ये कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. हितशत्रू त्रास देऊ शकणार नाहीत तरीही सावधगिरी बाळगणे योग्य ठरेल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. वाटाघाटी करताना योग्य परंतु सौम्य शब्द वापरा. अति धाडस, अति घाई त्रासदायक ठरू शकेल. शैक्षणिक, आर्थिक क्षेत्र, परदेशाशी संबंधित व्यापार, सल्ला, सेवा, संशोधन या क्षेत्रासाठी चांगला काळ आहे.

श्वसनविकार, नेत्ररोग, रक्तदाब, हृदयविकार, मज्जातंतू, मानसिक स्वास्थ्य यासंबंधी तक्रारी उद्‌भवण्याची शक्यता आहे.
**शुभ दिनांक :** ८, ९, १३.

## सिंह

**मन** स्थिर ठेवून व नियमांचे पालन केल्यास आठवडा सर्वसाधारणपणे चांगला जाईल. अपेक्षित लाभ मिळण्यासाठी थोडी वाट बघावी लागेल. सर्व आघाड्या सांभाळण्यासाठी कामाचे नियोजन योग्य तऱ्हेने करावे लागेल. अनपेक्षित अडचणीवर मात करण्यासाठी विचार करून ठेवा. आर्थिक अंदाज चुकण्याची शक्यता आहे. घरामध्ये मिश्र वातावरण असेल. कर्तव्यनिष्ठा महत्त्वाची ठरेल. अहंकार बाजूला ठेवून मनाविरुद्ध गोष्टी कराव्या लागतील. संततीच्या प्रगतीसाठी मार्ग सापडेल.

कार्यक्षेत्रामध्ये व्यवहाराची बोलणी करताना कायदेशीर बाजू लक्षात घ्यावी. प्रवासातून फायदा होईल. नोकरदारांनी विरोधकांपासून सावध राहावे. व्यावसायिकांना नवीन संधीचा फायदा घेता येईल. भागीदाराशी गैरसमज टाळण्यासाठी पारदर्शक व्यवहार ठेवावा. घरगुती व्यवसाय, तंत्रज्ञ, कलाक्षेत्र, नेतृत्व, अधिकारी, व्यापारी यांच्यासाठी योग्य काळ आहे.

झोपेच्या समस्या, संसर्गजन्य आजार, श्वसन विकार, मज्जातंतू, रक्तदाब, स्नायू विकार, त्वचाविकार याबाबतीत आरोग्य सांभाळा.
**शुभ दिनांक :** ७, ११, १२.

## कन्या

**एकंदरीत** आठवडा चांगला जाईल. महत्त्वाची कामे नियोजनबद्ध रीतीने पूर्ण करा. प्रगतीचे नवीन मार्ग मिळतील. नैराश्य टाळा. कामाची गती वाढवावी लागेल. कागदपत्रांची योग्य ती काळजी घ्या. प्रवासाचे योग आहेत. तुमच्या चिकित्सक वृत्तीचा उपयोग करून नवीन व्यवहार करावेत. अति धाडसीपणा किंवा अति आत्मविश्वास घातक ठरेल. आर्थिक आवक चांगली राहील. घरामध्ये धार्मिक वातावरण राहील. धार्मिक कार्यामुळे मनाला समाधान मिळेल. जोडीदार कामामध्ये व्यस्त राहील. मुलांबरोबर सुसंवाद राहील. भावंडांशी मतभेद टाळावेत.

नोकरदारांना छुप्या कारवायांना तोंड द्यावे लागेल. त्यावर यशस्वीपणे मात करता येईल. व्यावसायिकांना मदतनीसांच्या सहकार्यामुळे कामाचा वेग वाढवता येईल. मास मीडिया, सल्लागार, आर्थिक क्षेत्र, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्र, पर्यटन, कलाकौशल्य यासाठी चांगला काळ आहे.

जखमा होणे, भाजणे, छोटे अपघात, नेत्रविकार, आजाराचे योग्य निदान न होणे या दृष्टीने काळजी घ्यावी
**शुभ दिनांक :** ७, ८, ९, १३.

## तूळ

**आठवड्याचा** मध्य महत्त्वाच्या कामांसाठी चांगला आहे. निर्णय घेताना योग्य व्यक्तीचा सल्ला, मदत घ्यावी. पूर्ण माहिती मिळवूनच पुढे पाऊल टाकावे. अति धाडस त्रासदायक ठरेल. आर्थिक व्यवहार करताना पूर्ण सावधगिरी बाळगावी. जुनी येणी वसूल होतील. परंतु अनपेक्षित खर्चांना आठवड्याच्या शेवटी तोंड द्यावे लागेल. त्यादृष्टीने काळजी घ्या. कुटुंबामध्ये वडिलोपार्जित संपत्तीबाबतचे प्रश्न ज्येष्ठांच्या सल्ल्याने सोडवता येतील. बोलताना अहंकार बाजूला ठेवा. जोडीदाराशी मतभेद संभवतात. संततीचे प्रश्न समजून घेतल्यास मार्ग काढू शकाल.

नोकरदारांनी वाढलेल्या जबाबदारीस योग्य न्याय द्यावा. विरोधकांना ठामपणे परंतु संयमाने उत्तर द्यावे लागेल. व्यावसायिकांना मदतनीसांचे सहकार्य लाभेल. योग्य दिशेत प्रयत्न करावेत. भांडवल उभे करण्याचा मार्ग मिळेल. खाद्यपदार्थ, संवाद, धार्मिक, सल्लागार, पर्यटन, कायदा, सेवा क्षेत्र, स्थावर या क्षेत्रातील व्यक्तींसाठी योग्य काळ आहे.

मधुमेह, श्वसनविकार, नेत्रविकार, ॲलर्जी, हार्मोन्स, थायरॉईड या संबंधित आरोग्याच्या तक्रारी राहतील.
**शुभ दिनांक :** ८, ९, ११, १२.

## वृश्चिक

**महत्त्वाची** कामे आठवड्याच्या उत्तरार्धात करा. अनेक आघाड्यांवर काम करण्यासाठी तयार राहावे. कामाचा प्राधान्यक्रम ठरवून घ्यावा. आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी योग्य सल्ला घ्या व बचतीचा मार्ग स्वीकारा. मनाची अस्थिरता, अति आत्मविश्वास त्रासदायक ठरेल. तुमची ऊर्जा योग्य ठिकाणीच वापरली जाईल याची काळजी घ्यावी. कुटुंबाशी संबंधित समस्या योग्य तऱ्हेने जाणून घेणे आवश्यक ठरेल. वडिलोपार्जित संपत्तीसंबंधी प्रश्न मार्गी लावण्यासाठी सुसंवाद, संयम आवश्यक आहे. संततीचे प्रश्न जोडीदाराच्या मदतीने सोडवू शकाल.

व्यवसायधंद्यात एखादे काम नव्याने मुळापासून सुरू कराल. जुना अर्धवट प्रकल्प पूर्ण करू शकाल. योग्य लोकांची निवड गरजेची राहील. वरिष्ठांची नोकरदारांना साथ राहील. विनाकारण होणारे मतभेद टाळावेत. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. तंत्रज्ञ, खेळाडू, अधिकारी वर्ग, संशोधन, वैद्यकीय व्यवसाय यासाठी योग्य काळ आहे.

त्वचाविकार, मूत्रविकार, खाद्यपदार्थातून संसर्गजन्य आजार, कफवृद्धी, पित्त, संधिवात यापासून जपा.
**शुभ दिनांक :** ११, १२, १३.

## धनु

**आठवड्याची** सुरुवात व उत्तरार्ध तुमच्यासाठी योग्य ठरणार आहे. कुठल्याही आमिषाला बळी न पडता नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. सकारात्मक दृष्टिकोन अडचणींवर मात करण्यासाठी उपयोगी पडेल. घाईगडबडीत निर्णय घेऊ नका. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. गुंतवणूक करताना मोठ्या कालावधीसाठी व योग्य व्यक्तीच्या सल्ल्याने करा. घरापासून लांब जावे लागले तरीही जबाबदारी पार पाडावी लागेल. त्यासाठी संयमाची आवश्यकता आहे. तात्पुरते उपाय करण्यापेक्षा समस्येचे मूळ शोधा व उपाययोजना करा. त्यात तुम्हाला यश मिळणार आहे. कोणाचेही सहकार्य गृहीत धरू नये. संतती व जोडीदाराचे हट्ट पुरवावे लागतील.

नोकरदारांना वरिष्ठांच्या नाराजीला तोंड द्यावे लागेल. संयमाने स्वतःची बाजू मांडावी. व्यावसायिकांना अचानक मिळणाऱ्या संधीसाठी तयार राहावे लागेल. तुम्ही केलेल्या कामाचे श्रेय मिळण्यासाठी थोडी वाट पाहावी लागणार आहे. सरकारी क्षेत्र, पोलीस खाते, कायदा, परदेश, घरगुती व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय या क्षेत्रासाठी योग्य काळ आहे.

अनुवंशिक आजार, झोपेच्या समस्या, पित्तविकार, त्वचा, नेत्रविकार, थायरॉईड याबाबतीत आरोग्य सांभाळावे.
**शुभ दिनांक :** ७, १२, १३.

## मकर

**महत्त्वाची** कामे आठवड्याच्या पूर्वार्धात करून घ्यावीत. राशीस्वामी शनी मार्गी झाल्यामुळे तुमच्या कामांना योग्य ती दिशा मिळेल. आर्थिक आवक वाढली तरी अनावश्यक व अनपेक्षित खर्च होण्याची शक्यता आहे. वाणीवर नियंत्रण ठेवावे. नियोजित कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी उत्साह वाढवावा लागेल. संयम व कष्टाची तयारी हे तुमचे गुणवैशिष्ट्य उपयोगी पडेल. मुलांची प्रगती समाधानकारक राहील. कौटुंबिक नात्यांमध्ये अहंकार येऊ देऊ नका. गैरसमज होणार नाही याकडे विशेष लक्ष द्यावे. जोडीदाराच्या मताचा आदर करा. नवीन नात्याची सुरुवात आनंद देईल.

नोकरीव्यवसायात विरोधकांना नियंत्रणात ठेवण्यासाठी तुमचे कौशल्य वापरावे लागेल. गरज लागेल तेव्हा आक्रमकता वापरणे योग्य ठरेल. नोकरीत बदल करायचा असल्यास त्या दृष्टीने प्रयत्न वाढवावेत. व्यावसायिकांना नवीन संधीतून फायदा होईल. कार्यक्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर उपयोगी ठरेल. त्यादृष्टीने प्रशिक्षण घेण्याचा विचार करावा. आयटी क्षेत्र, जाहिरात, कायदा, कमिशन, स्थावर, वैद्यकीय व्यवसाय यांच्यासाठी चांगला काळ आहे.

अनुवंशिक आजार, खाण्यातून संसर्ग, श्वसनविकार, त्वचारोग याकडे दुर्लक्ष करू नये. वाहन चालवताना काळजी घ्यावी.
**शुभ दिनांक :** ७, ८, ९.

## कुंभ

**आठवड्यातील** मधले दिवस महत्त्वाच्या कामांसाठी चांगले आहेत. आळस झटकून कामाला लागा. जबाबदारी वाढणार आहे. मनामधील शंकाकुशंका काढून टाका. कामावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. आर्थिक स्थिती सुधारेल. बचतीचा मार्ग सोडू नका. अडकलेली कामे पुढे सरकतील. कुटुंबाच्या समस्या पुढाकार घेऊन सोडवू शकाल. ती जबाबदारी टाळता येणार नाही. जोडीदार व भावंडांचे सहकार्य राहील. कौटुंबिक एकत्रित व्यवसाय असल्यास यश मिळेल. मित्रांची मदत उत्साहवर्धक ठरेल.

नोकरदारांना विरोधकांचे डावपेच ओळखून कामाचे नियोजन करावे लागेल. व्यावसायिकांनी नियोजित कार्यामध्ये विलंब होणार नाही याकडे लक्ष द्यावे. स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी थोडे धाडस दाखवावे लागेल. आर्थिक व्यवहारात मात्र फसगत होणार नाही, याची काळजी घ्यावी. धाडसी क्षेत्र, सरकारी व सामाजिक विभाग, घरगुती व्यवसाय, कलाकौशल्य, इंटिरियर डेकोरेटर शैक्षणिक क्षेत्र, सल्लागार यांच्यासाठी योग्य काळ आहे.

मानसिक आरोग्य जपण्यास प्राधान्य द्यावे. अचानक थकवा जाणवणे, दंतरोग, गुडघेदुखी, यकृत यासंबंधित तक्रारींकडे वेळीच लक्ष द्यावे.
**शुभ दिनांक :** ८, ९, ११, १२.

## मीन

**आठवड्याचा** उत्तरार्ध महत्त्वाच्या कामांसाठी चांगला आहे. राशीस्वामी गुरु मिथुन राशीत आले आहेत. जबाबदाऱ्या वाढतील तरी व योग्य प्रकारे पूर्ण कराल. मानसिक अस्वस्थता, नैराश्य यावर नियंत्रण ठेवा. योग्य वेळी निर्णय घेण्यासाठी अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्यावा. भावनिक आंदोलने वाढणार आहेत, व्यावहारिक भूमिका विसरू नका. भाग्याची साथ आहे. गृहकर्तव्य व कार्यक्षेत्रातील वाढलेली जबाबदारी पार पाडताना थोडी तारांबळ होणार आहे. योग्य नियोजन केल्यास दोन्हीकडे न्याय देता येईल. सर्वांना बरोबर घेऊनच पुढे जाण्याचे धोरण उपयोगी राहील. जोडीदाराचे सहकार्य उत्साह वाढवेल.

कार्यक्षेत्रामध्ये कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी विश्वासू सहकाऱ्यांची मदत घेणे गरजेचे राहील. कामाचा वेळ वाढवावा. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. नोकरदारांनी स्वतःच्या कामावर लक्ष केंद्रित करावे. घरगुती व्यवसाय, पर्यटन, आयटी, जाहिरात विभाग, डिजिटल मार्केटिंग, लॅब टेक्निशियन, आधुनिक तंत्रज्ञान या क्षेत्रासाठी चांगला काळ आहे.

पित्ताशय, ॲलर्जी, मानसिक अस्वास्थ्य, अनुवंशिक आजार, हार्मोन्स, वातविकार यासारख्या आरोग्याच्या तक्रारी राहतील.
**शुभ दिनांक :** ११, १२, १३.

**- ज्योतिषपंडित प्रज्ञा धनंजय, पुणे**

## विश्व हिंदू परिषदेला सायनचा ४ एकरचा भूखंड

### व्यापारी तत्त्वावर देण्यास राज्य सरकारची मंजुरी

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या मालकीची असलेली सायन येथील ७५५८.३३ चौरस मीटर म्हणजेच ४ एकर जागा विश्व हिंदू परिषद या संघटनेला देण्याच्या प्रस्तावाला नुकतीच राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे ही जागा भाडेतत्त्वावर न देता व्यापारी तत्त्वावर देण्यात आली आहे. वार्षिक १०,१८६ रुपये इतक्या किरकोळ भाड्यावर ही जागा ३० वर्षांसाठी दिली आहे.



व्यापारी तत्त्वाच्या तरतुदीनुसार ज्याला भूखंड मिळाला आहे तो जवळजवळ त्या जमिनीचा मालक असतो आणि त्याला त्या जागेच्या वापराचे सर्व अधिकार प्राप्त होतात. यावर्षीच्या ऑक्टोबर महिन्यात सायनमधील ४ एकर भूखंड विश्व हिंदू परिषदेला देण्याचा प्रस्ताव पालिकेने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असलेल्या नगरविकास खात्याकडे मंजुरीसाठी पाठवला होता. या प्रस्तावाला नगरविकास विभागाने ४ डिसेंबर रोजी मंजुरी दिली आहे. ही मंजुरी देताना नगरविकास खात्याने स्पष्ट केले आहे की, या जागेचा व्यापारी हक्क औपचारिकपणे २५ जून २०२५ पासून म्हणजे ज्या तारखेला पालिकेने मंजुरी दिली त्या दिवसापासून ३० वर्षांसाठी सुरू होईल. या भूखंडाचे वार्षिक भाडे केवळ १०,१८६ रुपये निश्चित करण्यात आले आहे. ही असामान्य बाब आहे. कारण, व्यापारी तत्त्वावर दिलेल्या जमिनीला सहसा वार्षिक भाडे आकारले जात नाही.

## अदानीच्या दिघी बंदरावरून २ लाख वाहनांची निर्यात

■ नवी दिल्ली

**महाराष्ट्रातील** रायगड जिल्ह्यात असलेले दिघी बंदर दरवर्षी दोन लाख वाहने हाताळण्याकरिता सज्ज झाले आहे. त्यासाठी मदरसनने आपल्या 'समवर्धन मदरसन हामाक्युरेक्स इंजिनिअर्ड लॉजिस्टिक्स लिमिटेड' कंपनी मार्फत दिघी पोर्ट लिमिटेडसोबत भागीदारी करार केला. दिघी पोर्ट लिमिटेड ही अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेडची उपकंपनी आहे. या करारानुसार महाराष्ट्रातील दिघी बंदरावर वाहन निर्यातीसाठी सुविधा उभारली जाणार आहे.

या धोरणात्मक भागीदारीमुळे मुंबई-पुणे ऑटो बेल्टमधील वाहन उत्पादकांसाठी दिघी बंदर हे महत्त्वाचे ऑटोमोबाईल निर्यात केंद्र बनेल. १५ महत्त्वाच्या बंदरांपैकी एक असलेल्या दिघी बंदराने आता 'मेक इन इंडिया' उपक्रमाखाली भारताच्या वाढत्या ऑटोमोबाईल उद्योगाला पाठबळ देण्यासाठी आपली क्षमता वाढवली आहे. त्यामुळे जागतिक बाजारात वाहनांची निर्यात आणि आयात अधिक सुरळीत होवू शकणार आहे.




राज्यात तापलेल्या तपोवन वृक्षतोड मुद्यावरून महाराष्ट्र काँग्रेसने एक्सवर फोटो पोस्ट करून महायुती सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर व्यंगचित्रातून उपरोधिक टीका केली.

## आर्यन खान पुन्हा वादात पबबाहेर अश्लील हावभाव

■ बंगळुरू

**बॉलिवूड** अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान पुन्हा वादात अडकला आहे. बंगळुरूमधील एका पबमधून बाहेर पडताना त्याने हाताचे मधले बोट दाखवल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर एका वकिलाने त्याच्याविरुद्ध अश्लील हावभाव केल्याची तक्रार दाखल केली आहे.

आर्यन खासगी पार्टीसाठी बंगळुरूला गेला होता. अशोक नगर पोलीस स्टेशनजवळील पबमधून बाहेर येताना त्याने सुरुवातीला चाहत्यांना अभिवादन केले. त्यानंतर तो अचानक मिडल फिंगर दाखवताना दिसला. व्हिडिओमध्ये त्याच्यासोबत कन्नड अभिनेता झैद खान व काँग्रेस नेते मोहम्मद नालापद आणि काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार एन. ए. हरिस यांचा मुलगाही दिसत आहे. आर्यनच्या आसपास अनेक राजकीय नेत्यांची मुले असल्याने ही



व्हिडिओ व्हायरल

घटना राजकीय पातळीवरही चर्चेचा विषय ठरली आहे. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी पबमध्ये जाऊन चौकशी केली असून, आर्यन खानच्या मॅनेजरची विचारपूस करण्यात आली आहे. सोशल मीडियावर या घटनेवर जोरदार टीका होत आहे.

## अनिल अंबानींची आणखी १,१२० कोटींची मालमत्ता जप्त

■ मुंबई

**येस** बँक घोटाळा व रिलायन्स होम फायनान्स, रिलायन्स कमर्शिअल फायनान्स या रिलायन्स समूहाचे अनिल अंबानी समूहाशी संबंधित कंपन्यांची चौकशी सुरू असताना ईडीने आणखी १,१२० कोटींची मालमत्ता जप्त केली आहे. यामुळे अनिल अंबानी समूहाशी संबंधित जप्त मालमत्ता १०,११७ कोटींवर पोहोचली. या मालमत्तांमध्ये रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.च्या अंधेरीतील इमारती, बॅलार्ड इस्टेटमधील रिलायन्स सेंटर, सांताक्रूझमधील सदनिका, अतिथीगृह, रिलायन्स पॉवर लि.च्या दोन मालमत्ता व रिलायन्स व्हॅल्यू सर्व्हिस प्रा. लि.चा चेन्नईतील २३१ भूखंड तसेच ७ सदनिकांचा समावेश आहे. रिलायन्स व्हॅल्यू सर्व्हिस, रिलायन्स वेंचर अॅसेट मॅनेजमेंट, मे. फी मॅनेजमेंट सोल्युशन्स, मे. अघार प्रॉपर्टी कन्सल्टन्सी, मे. गमेसा इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट या कंपन्यांमध्ये असलेल्या मुदत ठेवी व समभागांवरही टाच आणण्यात आली आहे.

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार नाहीत पवारांच्या भेटीनंतर जगतापांचे वक्तव्य

■ पुणे

**स्थानिक** स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये एकत्र येण्याबाबत वाद सुरू आहे. पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी स्थानिक पातळीवर दोन्ही गट एकत्र येण्याला कडाडून विरोध केला. त्यांनी दोन गट एकत्र आल्यास राजीनामा देण्याची भूमिका मांडली होती. याच पार्श्वभूमीवर आज ज्येष्ठ नेते शरद पवार आणि प्रशांत जगताप यांची भेट झाली. या भेटीनंतर राष्ट्रवादीचे दोन्ही गट पुण्यात एकत्र येणार नसल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय राज्यातही



एकत्र येण्याबाबत अध्यक्ष पवार यांनी याच सूचना दिल्या आहेत.

शरद पवार भेटीनंतर प्रशांत जगताप यांनी सांगितले की, शरद पवार यांनी प्रांताध्यक्ष शशिकांत शिंदे यांना कॉलवरून या संदर्भातील सूचना दिल्या आहेत. पक्षाच्या निर्णयासाठी स्थानिक कार्यकर्त्यांचे मत महत्त्वाचे आहे. पुण्यातील कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीलाच समर्थन दर्शवले आहे. त्यानुसार निर्णय घेण्यात येईल. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची महाविकास आघाडी पुण्यात लढण्यास सज्ज आहे. स्थानिक आणि वरिष्ठ नेत्यांचा समावेश करून अंतिम निर्णय घेण्यात येईल. कोणत्याही व्यक्तिगत मतामुळे पक्षाचे धोरण बदलणार नाही. काही ज्येष्ठ नेते किंवा कार्यकर्त्यांचे वेगळे मत असू शकते. पण पक्षाचे हित व धोरण हे सर्वोच्च आहे. नाराजी व्यक्त करणाऱ्या कार्यकर्त्यांना शरद पवार यांनी वेळ देऊन त्यांचे मुद्दे ऐकले. परंतु पक्षाची भूमिका स्पष्ट आहे आणि महाविकास आघाडी म्हणूनच पुण्यात लढाई होईल.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## राज्यातील अपघातांत १३ ठार

### ३० पेक्षा जास्त जखमी

■ मुंबई

**राज्यात** आज वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातांत १३ जण ठार झाले. तर ३० पेक्षा जास्त जखमी झाले आहेत. मृतांमध्ये महिलांचा समावेश आहे. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यामुळे राज्यभरात हळहळ व्यक्त होत आहे.

परभणी-वसमत राष्ट्रीय महामार्गावरील रहाटी गावाजवळ स्विफ्ट डिझायर आणि क्रेटा कारची टक्कर झाली. यामध्ये बाबाराव साखरे, विमलबाई जाधव, कांताबाई कातोरे या तिघांचा मृत्यू झाला. तर साईनाथ काकडे आणि हरी जाधव हे जखमी झाले. गोंदियात देवरी राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रक आणि ट्रॅव्हल्सची जोरदार धडक झाली. या अपघातात एका महिलेसह ३ जणांचा मृत्यू झाला. तर ११ जण जखमी झाले आहेत. लातूरमध्ये अहमदपूरजवळ कार-ट्रकची धडक झाली. यामध्ये रवीकुमार दराडे आणि सागर ससाणे या २ तरुणांचा



मृत्यू झाला. जळगाव जिल्ह्यातील पिंप्राळा भागातील भाविकांचा ग्रुप अयोध्या-प्रयागराज यात्रेसाठी जात असताना सुलतानपूरजवळ त्यांच्या वाहनाला अपघात झाला. यामध्ये छोटीबाई पाटील यांचा मृत्यू झाला, तर २५-३० महिला आणि पुरुष जखमी झाले. रायगड येथे कोलाड-संभे स्टॉपदरम्यान छोट्या पुलावर दोन मोटारसायकलची धडक झाली. यामध्ये दिनेश पवार आणि जाबेर शाह ठार झाले. तर लोणावळ्यात लायन्स पॉइंट परिसरात कार आणि टेम्पोची समोरासमोर धडक झाली. त्यात २ जणांचा मृत्यू झाला. पुणे-खोपोली मार्गावर टेम्पो-कारची धडक झाली. या अपघातात ३ जण जखमी झाले.

## मिरा-भाईंदरमध्ये ४० हजार दुबार मतदार

■ वसई

**मिरा**-भाईंदर शहरात तब्बल ४० हजार दुबार मतदार आहेत. त्यामुळे निवडणुकीतील गैरप्रकार रोखण्यासाठी पालिकेने घरोघरी जाऊन मतदारांची चाचपणी सुरू करण्यात आली आहे. ज्या मतदारांची दुबार नावे आहेत त्यांच्याकडून हमीपत्र लिहून घेण्यात येत आहे.

मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात ८ लाख १९ हजार १५३ मतदार आहेत. त्यापैकी ४० हजार मतदारांची दुबार नावे आहेत. त्यामुळे पेच निर्माण झाला आहे. या संदर्भात विविध राजकीय पक्षांकडून तक्रारी येत आहेत. या तक्रारीच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त राधा बिनोद शर्मा यांनी दुबार मतदारांची यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. प्रारूप मतदार यादीवर अखेरच्या दिवसापर्यंत एकूण ७४० हरकती आणि सूचनांची नोंद झाली आहे.

### हमीपत्र लिहून घेण्याची पालिकेची मोहीम

या तक्रारींची दखल घेण्यासाठी पालिकेने प्रभागनिहाय १३ पथके स्थापन केली आहेत. दुबार नावे आढळलेल्या पत्त्यांवर पालिकेचे कर्मचारी प्रत्यक्ष भेट देऊन शहानिशा करत आहेत. दोन पत्ते असल्यास, मतदाराने कोणत्या पत्त्यावरील नोंद कायम ठेवायची याची माहिती देणे आवश्यक आहे. कुठे मतदान करणार त्याबाबत हमीपत्र लिहून घेतले जात आहेत. अंतिम मतदार यादी १० डिसेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज दादरच्या चैत्यभूमीवर त्यांच्या अनुयायांची मोठी गर्दी उसळली होती. या गर्दीचे वरून टिपलेले छायाचित्र. (छाया-दीपक साळवी)

## माजी आमदार रमेश कदम यांच्याविरूद्ध खटला सुरू

### अण्णाभाऊ साठे महामंडळ गैरव्यवहार प्रकरण

■ मुंबई

**साहित्यरत्न** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळातील ३१३ कोटींच्या कथित गैरव्यवहार प्रकरणी महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार रमेश कदम यांच्यासह अन्य नऊ आरोपींविरुद्ध विशेष आमदार-खासदार न्यायालयात (एम-एलए कोर्ट) आरोपनिश्चिती करण्यात आली आहे. त्यामुळे हा खटला सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

कदम आणि अन्य आरोपींनी महामंडळात सुमारे ३१३ कोटी रुपयांची अफरातफर केल्याचा अमलबजावणी संचलनालयाचा (ईडी) आरोप आहे. ईडीने या प्रकरणी मनी लाँड्रिंगचा गुन्हा दाखल केला आहे. अण्णा भाऊ साठे महामंडळ हे मातंग समाजाचा सामाजिक आणि आर्थिक विकास करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आले आहे. मातंग समाजासाठी विविध योजना या महामंडळाच्या वतीने राबविल्या जातात. त्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारकडून महामंडळाला निधी दिला जातो. या निधीचा कदम आणि त्यांच्या अन्य साथीदारांनी अपहार केला. मातंग समाजाच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी दिलेला निधी कदम आणि इतरांनी वेगवेगळ्या संस्थांकडे वळवला आणि त्याचा वापर ज्या कारणांसाठी करणे अपेक्षित होते त्या कारणांसाठी केला नाही, असा ईडीचा आरोप आहे.

## कंगना राणौतला कोर्टात हजर राहण्याचे आदेश

■ चंदिगड

**एका** मानहानीच्या खटल्यात बॉलिवूड अभिनेत्री आणि भाजपाची खासदार कंगना राणौत हिला १५ डिसेंबर रोजी सुनावणीदरम्यान प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश भटिंडा जिल्हा विशेष न्यायालयाने दिले आहेत.

२०२१ मधील हे प्रकरण आहे. एका वृद्ध शेतकरी महिलेने कंगना विरोधात हा मानहानीचा दावा केला आहे. या खटल्याच्या मागील सुनावणीस कंगना न्यायालयात हजर राहिली नाही. लोकसभेचे अधिवेशन सुरू असल्यामुळे आपण सुनावणीस प्रत्यक्ष हजर राहू शकत नाही, अशी सबब तिने सांगितली होती.

## जलजीवन कंत्राटदारांचा आंदोलनाचा इशारा

■ छत्रपती संभाजीनगर

**सर्व** प्रलंबित देयके शंभर टक्के पारित करण्याच्या प्रमुख मागणीसह इतर न्याय्य मागण्यांची पूर्तता न झाल्यास येत्या २० डिसेंबरपासून काम बंद आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेने आज दिला.

संघटनेची राज्यस्तरीय बैठक आज येथे पार पडली. या बैठकीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील प्रतिनिधी व सदस्यांच्या उपस्थितीत मागण्यांचे निवेदन तयार करून ते सरकारला सादर करण्यात आले.

यामध्ये जलजीवन योजनेच्या सर्व कामांना केंद्र सरकारप्रमाणे २०२८ पर्यंत विनादंड मुदतवाढ देणे, कंत्राटदारांची अनामत स्वरूपात शासनाकडे जमा असलेली रक्कम परत मिळावी, लोकवर्गणी कंत्राटदाराच्या बिलातून वजा करू नये अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

## पुणे-मुंबई रेल्वेचा आज मेगाब्लॉक

■ पुणे

**मध्य** रेल्वेने देखभाल आणि आवश्यक दुरुस्तीचे काम करण्यासाठी उद्या रविवारी पुणे-मुंबई रेल्वे मार्गावर मेगा ब्लॉक



जाहीर केला आहे. या ब्लॉकदरम्यान लांब पल्ल्याच्या गाड्या आणि लोकल गाड्यांच्या सेवेवर मोठा परिणाम होणार आहे. यामुळे लांब पल्ल्याच्या एकूण १७ गाड्या रद्द केल्या आहेत. यामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांचे नियोजन विस्कळीत होण्याची शक्यता आहे.

सिंहगड एक्सप्रेस, डेक्कन क्वीन, प्रगती एक्सप्रेस, मुंबई-पुणे इंटरसिटी, इंद्रायणी एक्सप्रेस गाड्या पूर्णपणे रद्द राहणार आहेत.

### १७ गाड्या रद्द

याशिवाय पुणे-लोणावळा लोकलच्या काही फेऱ्या रद्द केल्या आहेत. काही फेऱ्या तळेगाव दाभाडे स्थानकावरून सुरू होतील किंवा तेथेच संपतील. त्या पुणे-लोणावळा पूर्ण मार्गावर धावणार नाहीत. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना वेळापत्रक तपासूनच प्रवास करण्याचे आवाहन केले.

## राज्यातील पोलीस पाटील संघटना ११ डिसेंबरला अधिवेशनावर धडकणार

■ मुरबाड

**राज्यातील** पोलीस पाटलांच्या प्रलंबित विविध मागण्याच्या पूर्ततेसाठी पोलिस पाटील संघटना येत्या ११ डिसेंबर रोजी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावर धडकणार आहे. गावकामगार पोलिस पाटील संघटनेचे राज्य अध्यक्ष शिवाजीराव कोलते यांच्या नेतृत्वात राज्यातील पोलीस पाटील या धडक मोहिमेत सहभागी होणार आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून पोलीस पाटलाच्या विविध मागण्या प्रलंबित आहेत. परंतु त्या मागण्याचा शासनाने गांभीर्याने विचार केलेला नाही. गावकामगार पोलीस पाटील संघटना यामुळे आक्रमक झाली आहे. गावकामगार पोलीस पाटील संघटनेचे राज्य अध्यक्ष शिवाजीराव कोलते आणि संस्थापकीय सचिव कमलाकर मांगले, कार्यकारी अध्यक्ष बळवंतराव काळे, उपाध्यक्ष अरुण बोडखे, जब्बार पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती या मागण्यांचा मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करीत आहे. यात प्रामुख्याने पोलीस पाटलाचे निवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्यात यावे, पहिल्या पाच वर्षांनंतर नूतनीकरण बंद करून नियुक्तीची मुदत सेवानिवृत्तीपर्यंत कायम ठेवण्यात यावी, आरोग्य विमा सुरू करण्यात यावा. वाढलेल्या मानधनाच्या पटीने वाढवावा, शासनातर्फे पोलीस पाटलांचा २५ लाख रूपयांचा विमा देण्यात यावा, निवृत्तीनंतर विमा रकमेइतकीच ठोस रक्कम मिळावी किंवा मानधनाच्या ५० टक्के टक्के रक्कम निवृत्ती सन्मान मानधन सुरू करण्यात यावी, पोलीस पाटील वेल्फेअर फंडाची स्थापना करण्यात यावी, १६ ऑगस्ट २०२४ पूर्वी नियुक्त झालेल्या पोलीस पाटलांना लहान कुटुंबाच्या अटीतून वगळण्यात यावे अशा अनेक मागण्यांचा समावेश आहे.